शनिवार । २ जानेवारी १९८२ । एक रुपया

माणूस

# मुंबई साहित्यसंमेलनाचा वैचारिक आधार कोणता ?

'महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. अंतुले यांच्या साहित्यक्षेत्रातील हस्तक्षेपाचा आम्ही निषेध करतो,' असा एक ओळीचा ठराव मुंबईला भरलेल्या साहित्यसंमेलनात, एकमताने संमत झाला असता तर हे संमेलन पूर्ण यशस्वी ठरले, असे म्हणता आले असते. असा काही नेमका मध्यबिंदू पकडला न गेल्यामुळे, वातावरणनिर्मितीशिवाय या अधिवेशनाने काय साधले, असा प्रश्न पडतो. वातावरणनिर्मितीही महत्त्वाची आहे व वाढत्या सरकारीकरणाबद्दल मुंबईच्या, जवळजवळ पर्यायी ठरलेल्या साहित्यसंमेलनात असंतोष व्यक्त झाला, त्याचे मोल निश्चितच कमी नाही; परंतु दुर्गाबाई भागवत यांचा अपवाद वगळता, मुंबईला जमलेल्या सर्व साहित्यिकांनी, शासनाशी अजिबात संबंध नको, अशी भूमिका घेतली नाही. स्वाभिमान न सोडता शासनाशी संबंध ठेवण्यास, अनुदाने स्वीकारण्यास, शासकीय समित्यांवर कामे करण्यास कुणाचाच विरोध नव्हता. नेहरूंसारखे, काकासाहेब गाडगीळ किंवा यशवंतराव चव्हाण यांच्यासारखे, सुसंस्कृत व साहित्य-संस्कृतीची जाण असलेले राज्यकर्ते साहित्यसंमेलनाला उपस्थित राहिले तरी चालतील, अशीही मुंबईला जमलेल्या अनेक साहित्यिकांची भावना होती. रसिक म्हणून तर कुणालाही—अगदी मंत्र्यांनाही—साहित्यसंमेलनात मज्जाव नसावा, असेच सर्वांचे मत होते. मग वादाचा, मतभेदाचा मुद्दा नेमका कोणता उरतो ! अंतुल्यांसारखा एखादा राज्यकर्ता अनाठायी हस्तक्षेप करतो, साहित्यिकांच्या स्वायत्ततेला, स्वाभिमानाला यामुळे धक्का पोचतो! मग अंतुल्यांचा निषेध करणारा एक ओळीचा ठराव करून या विषयावर पडदा टाकता आला असता. कारण मतभेदाचा मुद्दा तात्त्विक नव्हताच. दुर्गाबाईंची भूमिका बरोबर असो, चूक असो, ती तात्त्विक आहे; पण एकदा अनुदान स्वीकारणे, समित्यांवर कामे करणे, शासनाशी सहकार करणे, ह्या गोष्टी मान्य केल्या की, मतभेद फक्त तपशिलाचे, कार्यपद्धतीचे, व्यक्तीव्यक्तींमधल्या संबंधापुरतेच उरतात. अंतुले हस्तक्षेप करतात, प्रथम तसा ठराव होऊ द्या. मग त्यांचा निषेध जरूर करा ! उगाच 'शासन आणि साहित्य' हा विषय वेठीला धरण्याचे आणि नसलेली तात्त्विकता त्यात कोंबण्याचे कारणच काय ? शासकीय पारितोषिके सगळ्यांना हवी आहेत. अंतुल्यांनी ढवळाढवळ केली म्हणून सगळ्यांचा त्यांच्यावर राग आहे. मग हा राग एखाद्या ठरावात व्यक्त व्हायला हवा होता. नामवंत साहित्यिक स्वखर्चाने उपस्थित होते. हजारो रसिक जमले होते. गंभीर वातावरणात असा निषेध-ठराव एकमुखाने संमत झाला असता तर या संमेलनाची परिणामकारकता आणखी वाढली नसती का ?

□

या संमेलनाला उपस्थित असलेले किंवा संयोजनात पुढाकार घेतलेले बरेचसे साहित्यिक-पत्रकार समाजवादी विचारसरणी मानणाऱ्यांपैकी होते. समाजवाद म्हटला की, स्वातंत्र्यावर बंधने आलीच. शासनाचे महत्त्व व नियंत्रण समाजवाद गृहीतच धरतो; परंतु मुंबई साहित्यसंमेलनात पुरस्कार मात्र झाला तो स्वायत्ततावादाचा, विचारस्वातंत्र्याचा ! म्हणजे मागणी एक आणि विचारसरणी दुसरीच, अशी गत झाली. विचारस्वातंत्र्याच्या मुळाशी व्यक्तीच्या सार्वभौमत्वाची कल्पना आहे. उलट समाजवादाचे पर्यवसान अपरिहार्यपणे सर्वंकष सत्तावादात होते असा आजवरचा अनुभव आहे. म्हणून तर जयप्रकाश समाजवादाला शेवटी शेवटी राज्यवाद म्हणू लागले होते. हा राज्यवाद आणि मुंबईला जमलेल्या साहित्यिकांना हवा असलेला स्वायत्ततावाद, ही परस्परविरोधी दिशांची वाटचाल आहे. 'शासन आणि साहित्य' या विषयावरील या संमेलनातील चर्चा अधिक खोलवर गेली असती तर कदाचित हा परस्परविरोध उघडही झाला असता; पण वैयक्तिक उखाळ्यापाखाळ्या, आरोपप्रत्यारोपांनीच चर्चा गाजली ! विचारांच्या सुसंगतीकडे कुणी पाहिलेच नाही.

तरीही मुंबई-अधिवेशन हा एक यशस्वी प्रयोग होता. रायपूरच्या अधिवेशनावर या प्रयोगाचा निश्चितच प्रभाव पडला. मुंबई संमेलन झाले नसते तर रायपूरला अकोल्याचीच पुनरावृत्ती झाली असती, ती टळली. गंगाधर गाडगिळांनीही दोन्ही संमेलनातील दरी कमी करण्याचा चांगला प्रयत्न केला. खरे म्हणजे त्यांचे रायपूरला झालेले अध्यक्षीय भाषण मुंबई संमेलनाला एक चांगला वैचारिक आधार ठरू शकते. असा आधार लागतोच. नसल्यास नुसती बंडखोरी तात्पुरती ठरण्याचा संभव अधिक.

— श्री. ग. मा.

# चाहूल : वैचारिक अवनतीची

'होणार होणार!' म्हणून दीर्घकाळ निरनिराळ्या कारणांनी गाजलेले मुंबईचे साहित्य संमेलन अखेर पार पडले. 'साहित्यिक, प्रकाशक, ग्रंथविक्रेते आणि साहित्यरसिक' यांनी आयोजित केलेले हे संमेलन त्यांच्याच शब्दात सांगायचे, तर 'आपल्या पायावर उभे रहाता येते का याची चाचपणी करण्यासाठी प्रयोगादाखल केलेले संमेलन' होते. आणि श्री. पु. भागवतांनी समारोपाच्या भाषणात म्हटल्याप्रमाणे ते यशस्वी झाले असे म्हणायलाही काही हरकत नाही समारंभाला डाम-डौल नव्हता वगैरे खरे. पण एकूण कार्यक्रमात तोटा आला नाही, उलट तेरा-चौदा हजारांची शिल्लकच उरली. पुष्कळ नामवंत साहित्यिकांनी हजेरी लावली साहित्याच्या दृष्टीने अर्थपूर्ण विषयावर तीन परिसवाद झाले आणि त्यातही विद्वान विचारवंतांचे विचार ऐकायला मिळाले. तेव्हा यशस्वितेच्या दृष्टीने तशी कुठे उणीव पडली नाही. अध्यक्षीय भाषण, परिसंवाद याचे गोषवारे आणि संमेलनाचा, तेथील घटनाचा एकूण साद्यंत वृत्तात वर्तमानपत्रे, दैनिकांनी अगदी बारीक-सारीक तपशिलासह अग्रलेख, खास लेख, 'क्षणचित्रे' व विस्तृत बातम्यांमधून वाचकांना पुरवला आहे. फार काय, हा मजकूर हाती पडेपर्यंत मुंबईचेच नव्हे तर रायपूरचे संमेलनही जुने झाले असेल तेव्हा या संमेलनाचे हेतू, तपशील, वृत्तान्त किंवा त्याबद्दलची काही भाष्ये याना तसा अर्थ उरलेला नाही.

तेव्हा, बिझी बी च्या शब्दात सांगायचं, तर आता या शनिवारसाठी 'अ फ्यु स्ट्रे थॉटस् अँड आयडियाज'. बिझी बीप्रमाणे हे विचार 'ऑल ओरिजिनल अँड एंटायरली माइन' असल्याचा दावा मला करता येणार नाही, पण त्यामुळे फारसे काही बिघडते असे नव्हे.

प्रायोगिक, पर्यायी, स्वतंत्र, उपनगरी इत्यादी शीर्षकांखाली हे साहित्य संमेलन भरले आणि तडीस गेले. आता येत्या वर्षांत किंवा येणाऱ्या वर्षात ते भरते किंवा नाही हा तपशील अजून स्पष्ट व्हायचा आहे. पण गेली छपन्न वर्षे चालत आलेल्या परंपरेला आणखी एक फाटा फुटला. (हे म्हणजे थेट राजकीय पक्षाच्या भारतीय परंपरेला साजेसे झाले!) अशी फूट-तूट ही काही मोठी आनंदाची बाब नव्हे. समेलने भरतील तितकी हवीच असली, तर एक-दुसऱ्याच्या विरोधात, निषेधात संमेलन भरणे ही मोठी क्लेशकारक गोष्ट आहे. मालतीबाई बेडेकरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हटले— 'आमच्या साहित्यात केवळ मूठभराचेच प्रतिबिंब पडले आहे. आम्ही दलिताना न्याय दिला नाही. ग्रामीणाकडे, आदिवासीकडे फिरकलोही नाही . . . समानता नाकारली इतर धर्मीयांची बंधुता ठेवण्याचा प्रयत्न केला नाही. म्हणूनच एकाच मराठी भाषेच्या संमेलनात या साऱ्याना नांदता आले नाही. दलित संमेलन वेगळे, ख्रिस्ती संमेलन वेगळे अशी समेलनांना भाऊबंदकी आल्यासारखे झाले. ही भाऊबंदकी पुरी झाली नाही म्हणून की काय, आज हे आणखी एक स्वतंत्र संमेलन करण्याची पाळी आली आहे. आमच्या मराठी भाषिकाच्या शब्दाला वजन येण्यासाठी आम्ही साऱ्यांनी आमच्या स्वतंत्रतेला जपणाऱ्या प्रज्ञेचा एकत्र उपयोग केला पाहिजे' परिस्थितीची पावले मात्र याच्या बरोबर उलट दिशेने पडत आहेत. वेगळा घरठाव मांडण्याच्या या सर्वच प्रवृत्ती चिंताजनक आहेत, आणि ही प्रवृत्ती बळावण्यास भाग पाडणारी परिस्थिती तर त्याहूनही अधिक चिंताजनक आहे!

हे संमेलन भरवले गेले ते शासनाकडून साहित्यक्षेत्रात होणाऱ्या हस्तक्षेपाच्या निषेधार्थ. शासनाचा साहित्यक्षेत्राशी संबंध आताच एवढा निषेधार्ह का वाटू लागला? असा संबंध पूर्वीपासून अस्तित्वात होता. धनिकाच्या किंवा राजाच्या आश्रयासाठी कलानिर्मिती करणे हे आम्हा भारतीयांना अपरिचित नाही आणि गैरही वाटणारे नाही. मग आता शासक बदलले की साहित्यिक बदलले म्हणून शासनाची ढवळाढवळ आपणास पटेनाशी झाली? शासन असहिष्णु आणि संस्कृतीची कदर नसलेले आहे हा झाला उत्तराचा एक पैलू आणि कणाहीन, स्वत्वहीन साहित्यिक, शासनापुढे लाचार होणारे साहित्यिक हा अधिक अस्वस्थ करणारा दुसरा पैलू. संमेलनास नामांकित साहित्यिक येतात. काही थाटाचा समारंभ घडतो. शिवाय जाण्यायेण्याच्या भाड्यात सूट मिळते. चार दिवसांची मजेची सहल होते, इत्यादी इत्यादी. या साऱ्याला प्रचंड खर्च येतो, म्हणून शासकाची मदत लागते आणि त्या मोबदल्यात त्याची ऊठबस करावी


## साप्ताहिक माणूस

वर्ष : एकविसावे

अंक : एकतिसावा

२ जानेवारी १९८२

किंमत : एक रुपया

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

लागते. संमेलनाना हे उत्सवी स्वरूप येण्याची आवश्यकता आहेच का ? जाहीरपणे भरणारे हे साहित्य संमेलन अधिक अभ्यासू स्वरूपाचे आणि साहित्य विषयाला वाहिलेले असावे की जत्रेसारखे थोडे मौजमजेचे स्वरूप ठेवून त्याने अधिकाधिक रसिकाना आकर्षित करून घ्यावे ? साहित्यप्रेमात होणारी अशी सख्यात्मक वाढ गुणात्मक वाढही ठरेल का ? या प्रश्नाला ठाम उत्तर शोधणे मोठे कठिण आहे, पण उत्तर शोधले जाणे तितकेच तातडीचे आहे. कारण दिवसेंदिवस हा प्रश्न अधिकाधिक महत्त्वाचा ठरत जाईल असे दिसते. साहित्यिकानी हस्तीदंती मनोऱ्यातून उतरणे महत्त्वाचे. लोकात साहित्यप्रेम रुजणेही महत्त्वाचे; पण गर्दी म्हटली की राजकारण आले. गर्दी म्हटली की अॅडजस्टमेंट आली. दर्जाशी जुळवून घेणे आले. मूल्याशी फेरफार आला. खेरीज शासनाची लाचारी येईल ती निराळीच. पण मग त्यासाठी साहित्य समाजापासून अलग करावे काय ? याचा सुवर्णमध्य कुठे असेल ? या संमेलनाने तो गवसला आहे का ?

साहित्यिकेतर माणसे संमेलनास येतात ती कशासाठी ? तर त्याना साहित्याविषयी आस्था वाटते म्हणून आणि अशाच माणसाचा संमेलनात भरणा अधिक असतो. ती मोठी विचारवत असतात किंवा त्याची अभिरुची उच्च असते असे नव्हे; पण साहित्य आणि साहित्यिक यांच्याविषयी त्यांना प्रेम असते, औत्सुक्य असते. वा. ल. कुलकर्णी म्हणतात की, समाजाच्या लेखी साहित्यिकांना एक स्टार व्हॅल्यू असते. हा साहित्यिक दिसतो कसा, बोलतो कसा, वागतो कसा हे बघण्यासाठी म्हणून माणसं येतात.

पण साहित्यिक त्याना काय देतात ? उदाहरणादाखल हे संमेलन घ्या. इतर कार्यक्रमाबरोबर 'साहित्य आणि शासन', 'दलित साहित्य, अनुभव आणि आविष्कार' आणि 'मराठी भाषेचे भवितव्य' या तीन विषयावर परिसंवाद झाले आणि त्यामध्ये पुष्कळ प्रतिष्ठित विचारवंतांनी भाग घेतला. हे विषय वादग्रस्त, वादळी आहेत, हे ठीक. त्याच्यावर बोलताना तीव्र मतभेद संभवतात हेही ठीक; पण त्यांना केवळ तात्त्विक पातळीवर मर्यादित ठेवण्याची लोकशाही सस्कृती आमच्या साहित्यिकांनी का दाखवू नये ?

'साहित्य आणि शासन' हा परिसंवाद कशा प्रकारच्या अटीतटीचा झाला, ते वृत्तपत्राच्या 'खास चौकटी 'मधून सर्वांपर्यंत पोचले आहे. —'मला या संमेलनाचे-परिसंवादाचे निमंत्रण मिळाले नाही, फडक्यांचा प्रास्ताविक निबंधही मला वाचायला मिळाला नाही —' असा — दुर्गाबाईंनी मुळातच लावलेला टीकेचा सूर. दुर्गाबाई—पाध्ये, पुरोहित—फडके याच्यात झडलेल्या चकमकी, आरोप-प्रत्यारोप, ग. वा. बेहेरे, गो. नी. दांडेकर यांनी व्यासपीठावर येऊन केलेले नाट्यमय खुलासे यानी चर्चा गाजवली. खरे म्हणजे मालतीबाईंनी अध्यक्षीय भाषणात इशारा दिला होता... 'हा विषय नाजूक आहे, वादग्रस्त झालेला आहे, भावनावशतेला आवाहन देणारा आहे. या वादावादीत तत्त्वाच्या चर्चेची पातळी सोडून वैयक्तिक टीकेच्या पातळीवर वारंवार उतरावे लागण्याचा धोका आहेच...' आणि नेमकी हीच गोष्ट घडून आली. सामान्य माणसाच्या मनात या सर्वांबद्दल सरसकट आदराची एक भावना आहे, ती या झंझावातात कशी टिकून रहाणार ? साहित्यिकाची स्टार व्हॅल्यू म्हणजे सिने कलाकाराची स्टार व्हॅल्यू नव्हे ! एखादा नट बायको सोडून आणखी कोणाबरोबर राहू लागला किंवा दुसऱ्या कुणी प्राप्तीकर चुकविला तर त्याच्या चाहत्यांना त्यात काही खास वाटत नाही; पण साहित्यिकांची स्टार व्हॅल्यू ही अधिक नैतिक मूल्यानी युक्त असते, याची जाणीव या साहित्यिकांना फारशी असावी असे वाटले नाही. प्रेक्षक-श्रोत्यानी हा साराच करमणुकीचा कार्यक्रम समजून आनंद लुटला ते निराळेच !

खरे म्हणजे साहित्य आणि शासन या विषयाला स्फोटक बनविले ते सद्यःपरिस्थितीने; न पेक्षा त्यात मूलभूत मतभेद होण्यासारखे काय आहे ? कोणीही सुजाण, समंजस आणि सारासार विचाराची थोडीफार क्षमता असणारी सामान्य (अॅवरेज) व्यक्तीही सागू शकेल की, शासनासमोर लांगूलचालन करणे गैर, तसा शासनाशी संपूर्ण असहकारही निरर्थक आणि वांझोटा. लोकनियुक्त शासन हे आपलेच शासन आणि त्याने दिलेले पुरस्कार हेही स्वीकारार्ह उत्तेजन होय. कॉमन सेन्सच्या आधारे ज्या गोष्टी इतक्या सोप्या वाटतात, त्या जटिल करून विद्वान मंडळी त्यावर इतकी माथाफोड करतात आणि तरीही वैयक्तिक वैगुण्यापलीकडे त्याच्या हाती काही लागत नाही ! असे वांझोटे शरसंधान ऐकले की, आपल्या वैचारिक अवनतीचा, ऱ्हासाचा काळ सुरू झाला आहे की काय अशी वैफल्याची भावना मनाला ग्रासू लागते. हे समेलन एका विचाराच्या लोकांनी, एका विशिष्ट हेतूने जाणीवपूर्वक घडवलेले संमेलन होते आणि तरीही तिथे अशा मतभेदाचा तमाशा घडून यावा ! वैचारिक जीवन निकोप न राहिल्याचाच हा पुरावा नाही का ?

¤

'दलित साहित्य : अनुभव आणि आविष्कार' हा तसाच एक अस्वस्थ करणारा परिसंवाद. शतकानुशतके दलितांवर साहित्यच काय पण जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत अन्याय होत आला आणि आता त्याची भरपाई आवश्यक आहे हे कोणीही सहृदय माणूस अमान्य करणार नाही; पण परिसंवादात बोलणाऱ्या दलित लेखकाची भूमिका बेतालपणे आक्रमक आहे हे सतत जाणवत राहिले. आश्चर्य आणि दुःखाची गोष्ट म्हणजे अ-दलित वक्त्याची भूमिका अतिशय कोरडी, भावनेचा फारसा लवलेश नसलेली ! चर्चा किंवा वाद-विवादात माडायच्या असल्यामुळे या दोहोंनीही इतक्या टोकाच्या भूमिका घेतल्या की काय हे मला माहीत नाही; पण सरोजिनी वैद्य, बाळकृष्ण कवठेकर इत्यादीनी कलात्मक मूल्ये आणि आदर्शांचा अतिरेकी आग्रह धरला, तर कलात्मक मूल्ये म्हणजे 'बाष्कळपणा' आहे असे दलित साहित्यकानी ठामपणे सागितले. 'मी रॅश बोलतो आणि कुठलीही गोष्ट स्पष्ट करायला वेळ अपुरा पडणार आहे, तेव्हा माझ्या बोलण्याने अनेक गैरसमज होतील' अशी सूचना देऊन लक्ष्मण मान्यांनी दलित साहित्याच्या स्वातंत्र्याचा आणि स्वायत्ततेचा असा सूर लावला की.— 'इतकी वर्षे आम्ही अन्याय आणि हाल सोसले. आमच्या जाणिवा वेगळ्या आहेत. आमच्या लेखनावर टीका करण्याचा हक्क पाढरपेशी टीकाकाराना पोचत नाही. आमच्या लेखनाला कमअस्सल म्हणताना आमच्या परिस्थितीचा अस्सलपणा जाऊन पडताळून पहाण्याची तयारी आहे त्याची ? एका हृदयाच्या वेदनेची दुसऱ्या

हृदयाला सहवेदना पोचविते. यालाच तर साहित्य म्हणतात. नाही तर ते दुसऱ्या कुठल्या गाढवीचे नाव आहे? आमच्या बापाने कधीच पाहिले नव्हते आणखी कुठले साहित्य. आम्ही साहित्य जाणत नाही आणि मानतही नाही. आम्ही आधी कार्यकर्ते आहोत आणि मग असलोच तर साहित्यिक. आम्हाला व्यक्तिगत जीवनात रस नाही. केवळ समूहजीवन, सामूहिक जाणिवा आणि दुःखे आम्हाला भिडतात. आंतरिक वेदनेने कळवळून आम्ही बोंब मारतो ती कलात्मक कशी असणार?'

पण तरीही ही दलित मंडळी मध्यम-वर्गीय पांढरपेशा आणि अधिक तरल पातळीवरच्या दुःखातही वाटा मागतात आणि 'दुःखाने गदगदलेल्या झाडाची' आपली प्रतिमा कायम ठेवू बघतात. दया पवारांचा प्रास्ताविक निबंध म्हणतो– 'आजचा दलित लेखक हा भिन्न पातळीवर नाही. दलितेतर लेखकासारखाच तो ऐहिक सुख भोगतो, चांगल्या घरात राहतो, स्वातंत्र्योत्तर काळात त्याला काहीच दुःखे भोगावी लागली नाहीत, असेही बोलले जाते; (पण) दलित लेखकाचे बालपण, त्याने भोगलेला जीवघेणा भूतकाळ हा क्रूसासारखाच खांद्यावर तो वागवीत असतो.' म्हणजे हा एक न सुटणारा प्रश्न झाला. कारण वर्तमान किंवा भविष्यकाळ काहीही असला, तरी भूतकाळ त्याने पुसला जाऊ शकत नाही. तेव्हा हा 'केवळ आर्थिक व सामाजिक लढा नाही, तर सांस्कृतिक नीतिमूल्यांचा लढा आहे.' आणि आपली संस्कृती वेगळीच ठेवण्यासाठी लढा आहे. हा वाद ऐकताना वाटले की, ही चर्चा आता ब्लाइंड ॲलीमध्ये येऊन पोचली आहे. दोन्ही बाजूंची मते तीव्र आणि ठाम आहेत आणि त्यांच्यात फारसा संवादच नाही, तिथे चर्चा कसली? 'ट्रॅडिशन ॲण्ड इंडिविज्युअल टॅलंट' या आपल्या निबंधात टी. एस. एलियटने सर्व साहित्याला सामावून घेणाऱ्या वैभवशाली साहित्यपरंपरा व परंपरा समृद्ध करणारे साहित्य यांच्याबाबत महत्त्वाचे विवेचन केले आहे. इतके दिवस उपेक्षेने वेगळी ठेवलेली दलितांची चूल, आता त्यांना हट्टाने व जाणीवपूर्वक वेगळी ठेवायची असेल, तर पूर्वीच्या परिस्थितीत त्याने कोणती सुधारणा घडून येणार आहे? कलात्मक मूल्यांना बाष्कळपणा म्हटल्याने काय साध्य होणार आहे? गं. बा. सरदारांनी, दलितांचीही काही सामाजिक बांधिलकी आहे याची आठवण करून दिली हे बरे झाले. खेरीज साहित्याची स्वायत्तता महत्त्वाची. ती टिकविण्यासाठीच तर हे संमेलन भरले आहे. या स्वायत्ततेवर राजकारणाचे आक्रमण नको, तसे समाजकारणाचेही नको. साहित्याचे निकष साहित्यिकच असले पाहिजेत, हेही त्यांनी आग्रहाने सांगितले. मालतीबाई समारोपाच्या भाषणात म्हणाल्या, 'रुझवेल्टच्या घरी आठवड्यातून एक दिवस निषेध-दिन असे आणि ठराविक टोप्या घातल्या की अगदी लहान मुलेही आपला विरोध व टीका करू शकत. हे संमेलन ही एक तशीच निषेध नोदवण्याची जागा झाली तरी चालेल; पण यानंतर समाजात वावरताना मात्र आम्ही सर्वांनी एक असले पाहिजे!'

असे एक असण्याच्या दृष्टीने टाकलेले हे संमेलन हे पहिले पाऊल म्हणता येईल का? ◻

आणि आता हा शेवटचा विचार.

संमेलन भरण्याआधी मी माधव गडकरींची भेट घेतली होती. तेव्हा ते म्हणाले होते की, या संमेलनातून पुढे कायम स्वरूपाची संस्था वगैरे उभारण्याचा आमचा विचार नाही. कारण संस्थांची संस्थाने होतात. संस्थानात राजकारणे शिरतात आणि ती आम्हालाही टळणारी नाहीत. त्यामुळे आम्ही मुळात संस्थाच उभारणार नाही!

संस्थांची संस्थाने होत असतील तर ती शरमेची बाब आहे आणि ती विचावंतानाही चुकू नयेत याने तर मनाला केवळ उद्विग्नताच येते. या संमेलनातून एखादी कायम स्वरूपाची संस्था का उभी राहू नये? ॲम्नेस्टी इंटरनॅशनल जशी जगभरच्या कोणाही कैद्याच्या दुरवस्थेबद्दल काही करू शकते, तशी साहित्याची स्वायत्तता कुठल्याही आक्रमणापासून कायम ठेवणारी संस्था का उभारता येऊ नये? सरकारला पाठिंबा देणारी एखादी 'प्रोग्रेसिव्ह रायटर्स युनियन' रशियात असू शकते; त्या चालीवर साहित्याला पाठिंबा देणारी एखादी युनियन असणे ही काळाची गरज आहे, साहित्याची आणि साहित्यप्रेमींची गरज आहे. विघटनाची परंपरा राजकीय पक्षांनी घालून ठेवलीच आहे; पण या संमेलनाच्या निमित्ताने, स्वयंस्फूर्तीने एकत्र झालेल्या विचारवंत साहित्यिकांनी संघटनेची एक नवीन परंपरा घालून द्यायला हवी; आपला हा निषेध एका संमेलनापुरता मर्यादित न ठेवता, अधिक व्यापक कार्यक्रम असणारी एखादी संस्था त्यातून उभारली गेली पाहिजे. तर हे संमेलन सुफल संपूर्ण झाले असे म्हणता येईल.

—ललिता बर्वे

# मधल्या भिंती

मोहन शंकर कुलकर्णी

मुलुंड-भांडुप ज्ञानदीप मंडळाने आयोजित केलेला 'मधल्या भिंती' हा उद्बोधक उपक्रम नुकताच मुलुंडमध्ये पार पडला. तीन तास रंगलेल्या या समारंभाचे अध्यक्षस्थान महाराष्ट्राचे ख्यातकीर्त नटश्रेष्ठ श्री. मामा पेंडसे यांनी भूषविले होते. ख्यातनाम लेखक श्री. शं. ना. नवरेही या कार्यक्रमाला उपस्थित होते.

आजकालच्या समाजात दोन पिढ्यांमध्ये जी मधली भिंत उभी राहात आहे तिची कारणे, तिला जबाबदार असणाऱ्या गोष्टी आणि ती नाहीशी करण्यासाठी उपाययोजना हाच या कार्यक्रमाचा मूळ हेतू होता. ही मधली भिंत कोणाकोणामध्ये उभी राहते तर– सासू-सुनेत, सासरे आणि इतर कुटुंबातील व्यक्तीत, नवरा-बायकोत आणि अशा कित्येक गोष्टीत! ही मधली भिंत उभी राहिल्यामुळे कुटुंबामध्ये दिवसेंदिवस तेढ वाढत जाते, एकमेकांविषयी मने दूषित होतात आणि पाहता पाहता हा संसार आणि पुढे हे जीवनच नकोसे होते!

आजकालच्या महागाईच्या दिवसात मिळवती मुलगी मिळावी ही जशी मुलाची इच्छा असते तशी मिळवती सून मिळावी ही सासू-सासऱ्यांचीही इच्छा असते. या लोकांप्रमाणे संपूर्ण आयुष्य मुला-बाळात आणि स्वैपाकात काढण्यास कोणतीही

मुलगी आजकाल सहसा तयार नसते. आयुष्यातील प्रारंभीची वर्षे आई वडिलांच्या देखरेखीखाली गेली. कोणतीही गोष्ट घ्यावयाची झाल्यास सदैव आई वडिलांच्या-कडेच हात पसरावा लागत असे. आता याच्याही पुढे तो नवऱ्याकडे, सासू-सासऱ्या-कडे पसरावयाचा का? म्हणजे संपूर्ण जीवनात स्वतंत्रता आहे की नाही? का प्रत्येक वेळी दुसऱ्याकडे हात पसरतच बसावयाचे? हाच हल्लीच्या मुलींसमोरचा प्रश्न असतो. संपूर्ण जीवन धुण्याभांड्यात खर्च करण्यास ह्या मुली तयार नसतात म्हणूनच त्यांना नोकरी करावीशी वाटते.

मुलीला नोकरी करावीशी वाटली काय किंवा सासुसासऱ्यांना मिळवती सून हवीशी वाटली काय, दोन्हींचा अर्थ एकच! या लग्नानंतरच मधल्या भिंतीला खऱ्या अर्थाने सुरुवात होते. सकाळी उठल्या-उठल्या नोकरीला गेलेल्या सुनेची अपेक्षा असते की, संध्याकाळी आपण कामावरून दमून घरी परतताच सासूने आपणास गरमगरम एक कप चहा करून द्यावा; तर इकडे सासूला वाटत असते की, निदान संध्याकाळचा स्वैंपाक तरी सुनेने करावा आणि आपणाला देवधर्म करण्यास मोकळीक करावी. दोघींमध्ये उभी राहणारी ही मधली भिंत होय!

मुले मोठी झाली, घरी सुना आल्या की, घरातील कर्त्या सवरत्याला वाटत असते की, हेच आपले आयुष्यातील आनंदाचे दिवस! या कर्त्यापुरुषाला वाटत असते की, आपण हाक देताच सूनबाईने गरमगरम चहा करून द्यावा. मुलाने प्रत्येक गोष्टीत आपला आदर राखावा, बायकोने आपली सेवा करावी, नातवंडांनी आपल्या अंगाखांद्यावरती खेळावे; पण?-- पण प्रत्यक्षात हे काहीच होत नाही. सूनबाईकडून चहाची अपेक्षा करणाऱ्या सासऱ्याला स्वतःच तिला चहा करून द्यावा लागतो! वार्धक्यामुळे मुले विचारीनाशी होतात. बायको आपल्या आणि मुलांच्याच ऐश्वर्यात नाचत असते. नातवंडाबद्दल म्हणावे तर शाळेतून आलेली तीही टी.व्ही.त मग्न होऊन जातात. मधली भिंत ती येथे उभी राहते!

ही भिंत सासू-सुनेत, नवरा-बायकोत, सासऱ्यांत, नातू-नातवंडांत अशा सर्वांत उभी राहते. एकदा ही भिंत उभी राहिली की, संसारातील हास्य मावळतं. कुटुंबातील प्रत्येक-जण दिवस ढकलायचा म्हणून वेळ काढू लागतो आणि पाहता पाहता संपूर्ण जीवनच नैराश्यमय वाटू लागतं.

याच अनुषंगाने मुलुंड-भांडूप ज्ञानदीप मंडळाने हा उद्बोधक समारंभ घडवून आणला. मंडळातील सभासदांनी घराघरां-मध्ये जाऊन या कार्यक्रमाचा प्रचार केला. परिसंवादात बोलणाऱ्या नवनवीन व्यक्तींना, त्यांच्या विचारांना उजेडात आणलं. कार्य-क्रमासाठी वर्गणीही जमवली.

तीन तासांच्या या कार्यक्रमात दोन सासरे, दोन सासवा, दोन सुना आणि नात व नातू यांची भाषणे झाली.

८५ वर्षांचे एक सासरे बोलावयास उभे राहिले. मुलांकडून, सुनेकडून, नातवाकडून आपणाला कसलंही सुख मिळत नाही हे त्यांनी डोळ्यांत अश्रू आणून सांगितलं. त्यांची कहाणी अतिशय विदारक होती. याच वयाचे दुसरे एक सासरे उभे राहिले मात्र त्यांनी आपण खूप सुखी असल्याचे सांगितलं.

सून नोकरी करत असल्याने घरातील आणि त्याचबरोबर सुनेचीही कामे आपणास करावी लागतात अशी तक्रार एका सासूने केली. सून नोकरीला गेल्याने तिच्या मुलांना सांभाळावं लागतं; घड तासभर देवालाही जावयास मिळत नाही, अशी तक्रार या सासूने केली, तर दुसरी एक सासू म्हणाली की, विधवा असलेली आपली सासू केव्हा एकदा मरते आणि तिची संपत्ती आम्हाला केव्हा एकदा मिळते याचीच सून वाट पहात असते. सासूबद्दल तिला यत्किंचितही प्रेम नाही अशी या सासूची तक्रार होती.

सासूच्या या बोलण्यावर चवताळलेली एक सून म्हणाली की, आजच्या या सासवा भेदभाव करतात. स्वतःच्या लेकीचं तोंड भरून कौतुक करतात, तिच्या मैत्रिणींना अगत्याने आत घेतात; पण तिच्याच वयाच्या सुनेला मात्र काहीच किंमत देत नाहीत. आम्ही नोकरी परिस्थितीमुळे करतो आहो याची आठवण या सुनेने करून दिली. सासूने भेद-भाव सोडून द्यावा असं दुसऱ्याही सुनेने सांगितले.

आठ वर्षांची एक नात व नातू बोलण्या-साठी उभे राहिले. दोघांनीही सांगितलं की, नोकरीमुळे आमचे आई-बाबा सदैव बाहेरच असल्याने आम्हाला आजी-आजोबांनीच मोठं केलं, प्रेम दिलं. आमच्यावर चांगले संस्कार केले.

वर सर्वांनी उभ्या केलेल्या मधल्या भिंती तोडण्यासाठी अखेर धारपबाई उभ्या राहिल्या. त्यांनी सांगितलं की, एकमेकांनी एकमेकाला जर समजावून घेतले तर ही मधली भिंत उभीच राहणार नाही! त्या म्हणाल्या की, सुनेने सासूला प्रेमाने जिंकले पाहिजे तर सासूने सुनेला स्वतःच्या मुलीसारखीच वाग-णूक दिली पाहिजे.

अखेर समारोपाचे भाषण करण्यासाठी डॉ. ना. मवरे उभे राहिले. या मधल्या भिंतीवर अतिशय परखड भाष्य करताना ते म्हणाले की, वडीलधाऱ्या सासू-कडून हल्लीच्या या मुलींनी एक कप चहाची अपेक्षाच का धरावी? सासूकडून अशा अवास्तव अपेक्षा करण्यात काहीच अर्थ नाही. या सर्व भिंतीचे निरीक्षण करून ते म्हणाले की, वास्तविक या भिंती स्त्रियांच्या नोकरीमुळेच तयार होतात. नोकरी लागली की तिला घरी परतल्यावर सासूच्या हातचा चहा लागतो. सहा तासांच्या ऑफिसमध्ये निम्माअधिक वेळ गप्पात आणि चहात काढणाऱ्या या मुलींना घरी आल्यावर चहाची आवश्यकताच काय? असा रोखठोक सवाल त्यांनी केला. आपल्या स्वतःच्या आयुष्यात आपण बायकोला कधी नोकरी करावयास सांगितलं नाही म्हणूनच आमचा संसार सुखाचा झाला व या असल्या भिंती आपल्या संसारात कधी उभ्या राहिल्या नाहीत, असेही त्यांनी सांगितले. स्त्रीने जर नोकरीच केली नाही तर अशा भिंती उभ्या राहणार नाहीत, हे त्यांनी उदाहरणानं पटवून दिले.

नटवर्य मामा पेंडसेंनी सांगितलं की, चैनीच्या गोष्टी स्त्रीने सोडून द्याव्यात व नवऱ्याच्या पगारात सर्व काही भागवावे. परदेशांतून चालत आलेली ही नोकरीची फॅशन स्त्रीने बाजूस ठेवून नवऱ्याच्या पगारात जे काही होईल त्यात आनंदाने संसार करावा. असे जर झाले तर ही भिंत उभी राहणार नाही असेही त्यांनी सांगितले.

साडेतीन तास रंगलेल्या या कार्यक्रमास मुलुंडमधील महिला मोठ्या प्रमाणावर उपस्थित होत्या. 'ज्ञानदीप'चे निर्माते आकाशानंदही या कार्यक्रमास उपस्थित होते. □

# केरळ

## विरोधी पक्ष धडा घेतील का?

वा. दा. रानडे

विरोधी पक्षांकडे सत्ता असलेल्या राज्यां-पैकी केरळमधील डाव्या आघाडीचे सरकार पाडून तेथे सत्तेवर येण्यात इंदिरा काँग्रेसने अखेर यश मिळविले. मंत्रिमंडळ केवळ इंदिरा काँग्रेसचे नसून संयुक्त लोक-शाही आघाडीचे आहे; पण त्यात प्रमुख घटक इंदिरा काँग्रेसच आहे. फोडाफोडीच्या तंत्राचा अवलंब करूनच हे यश इंदिरा काँग्रेसला मिळाले!

*इंदिरा काँग्रेसला ही संधी मिळाली याचा* दोष कोणाकडे याची आता चर्चा करण्यात

काय अर्थ आहे असे काहीना वाटेल; पण विरोधी पक्षानी एक आत्मपरीक्षणाचा धडा म्हणून त्याकडे पाहिले पाहिजे. डाव्यांच्या संयुक्त आघाडीतून कॉंग्रेस (एस) पक्ष बाहेर पडल्याने तिचे बहुमत संपुष्टात आले आणि मुख्यमंत्री नयनार यांच्या मंत्रिमंडळाने राजिनामा दिला. कॉंग्रस (एस) पक्ष आघाडीतून बाहेर पडला याचे एक कारण आघाडीतील मुख्य घटक मार्क्सवाद्यांशी त्याचे मतभेद झाले होते. राज्यातील हिंसाचाराला आळा घालण्यासाठी मार्क्सवादी गृहमंत्री परिणामकारक उपाय योजीत नाहीत अशी कॉंग्रेस (एस) ची तक्रार होती. काही महिन्यांपूर्वी कॉंग्रेस (एस)च्या कचेरीवर मार्क्सवाद्यांच्या प्रभावाखालील एका युनियनच्या समर्थकांनी हल्ला केला होता.सरकारने याबाबतीत संबंधित मार्क्सवाद्यांविरुद्ध प्रथम काहीच कारवाई केली नाही. त्यामुळे या दोन पक्षाचे संबंध बिघडले होते. पुढे कारवाई करण्याचे सरकारने मान्य केल्याने तात्पुरता समझोता झाला होता; पण तो फार काळ टिकला नाही. मार्क्सवादी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्या कार्यकर्त्यांतही चकमकी होऊन हिंसाचाराला दोन्ही बाजूचे काही कार्यकर्ते बळी पडले होते. हिंसाचाराबद्दल एकट्या मार्क्सवादी पक्षास दोष देता येणार नाही; पण आघाडीचा मुख्य घटक म्हणून ते टाळण्यासाठी पुढाकार घेऊन त्याने उपाय योजायला हवे होते. तेव्हा कॉंग्रेस (एस) पक्षाला बाहेर पडावे लागले याचा दोष काही प्रमाणात मार्क्सवाद्यांकडे येत असला तरी केवळ तेवढ्या कारणासाठी आघाडी फुटली असे म्हणता येणार नाही. इंदिरा कॉंग्रेसच्या नेत्यानी कॉंग्रेस (एस) आधीच आतून पोखरला होता. तुम्ही आमच्या आघाडीत या. मंत्रिमंडळात आम्ही तुम्हाला महत्त्वाचे स्थान देऊ असे आश्वासन इंदिरा कॉंग्रेसचे नेते करुणाकरन यांनी कॉंग्रेस (एस)चे नेते अँटनी याना दिले असले पाहिजे आणि अँटनी अखेर सत्तालोभाला बळी पडले! इंदिरा गांधीच्या एकाधिकारशाहीविरुद्ध आम्ही लढू ही त्यांची तात्त्विक भूमिका किती तकलुपी होती हे या प्रसगाने दिसून आले.

अँटनी यांनी तत्त्वनिष्ठा तर नाहीच; पण पक्षशिस्तही पाळली नाही! प्रथमपासूनच त्यांनी बंडाचा पवित्रा घेतला. शिस्त पाळीत असल्याचा बाह्यत: देखावा मात्र केला. डाव्यांच्या आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय त्यांनी केंद्रीय कार्यकारिणीच्या सल्ल्याशिवायच घेतला व कार्यकारिणीने पक्षातील फूट टाळण्याच्या उद्देशानेच त्यास मान्यता दिली. केरळच्या कॉंग्रेस (एस) पक्षाने इंदिरा कॉंग्रेसच्या नेतृत्वाखालील आघाडीत सामील होऊ नये असा स्पष्ट आदेश कार्यकारिणीने दिला; पण अँटनीनी तो मानला नाही. कार्यकारिणीचा आदेश आम्ही मानू असे आश्वासन त्यानी आधी दिले होते; पण ते त्यांनी मोडले. कॉंग्रेस (एस)चे अध्यक्ष या नात्याने शरद पवार यानी हा आदेश दिला होता; पण त्याला उत्तर देताना अँटनी यांनी पवारांना त्यांच्याच वागणुकीचा दाखला दिला आणि महाराष्ट्रात जनता पक्षाशी युती करून मंत्रिमंडळ बनविताना तुम्ही कोठे कार्यकारिणीला मानले असा सवाल केला.

जनता पक्षाने इंदिरा कॉंग्रेस आघाडीच्या मंत्रिमंडळास उघड विरोधाची भूमिका घेतली असली तरी मंत्रिमंडळ बनू शकत नव्हते; पण त्या पक्षाने तटस्थतेची बोटचेपी भूमिका घेतली. इदिरा कॉंग्रेस आघाडीच्या मंत्रिमंडळास आमचा पाठिंबा नाही; पण ते आम्ही पाडणारही नाही अशी जनता पक्षाची भूमिका आहे. मंत्रिमंडळ आम्ही पाडणार नाही हे त्या पक्षाचे आश्वासन राज्यपालांना पुरेसे वाटले असावे म्हणून करुणाकरन यांना त्यानी मंत्रिमंडळ बनविण्यास सांगितले. जनता पक्षात या प्रश्नावर मतभेद होते. केरळमधील जनता पक्षात बहुसंख्य सभासद कॉंग्रेसमधून आलेले असून समाजवाद्यांचा गट अल्पसंख्य आहे. बहुसंख्य गट बिगरमार्क्सवादी मंत्रिमंडळास पाठिंबा देण्याच्या बाजूचा होता. अखेर दोन्ही गटांत तडजोड म्हणून तटस्थतेची भूमिका ठरली. इदिरा कॉंग्रेस विरोध आणि मार्क्सवादी विरोध यातून निवड करण्याची कसोटीची वेळ येते तेव्हा जनता पक्षाचा इंदिरा विरोध बोथट ठरतो, हा अनुभव यापूर्वी आलेलाच आहे. तोच या प्रसंगाने पुन: एकदा आला!

केरळमधील कॉंग्रेस (एस) पक्ष आणि जनता पक्षाच्या भूमिका याप्रमाणे इंदिरा कॉंग्रेसला मंत्रिमंडळ बनविण्यास सहाय्यभूत झाल्या. दोन्ही पक्षाचे केन्द्रीय नेतृत्व त्यांना या निर्णयापासून रोखू शकले नाही पण सर्वसामान्य नागरिकापुढे यातून उपस्थित होणारा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे विरोधी पक्ष अशा पद्धतीने वागणार असतील तर इंदिरा कॉंग्रेस विरुद्ध प्रभावी पर्यायी आघाडी त्यांना उभारावयाची आहे यावर लोकांचा विश्वास बसावा कसा? अहमदाबादला जनता पक्षाच्या अधिवेशनात विरोधी पक्षाचे ऐक्य झाले पाहिजे असा ठराव पास होतो आणि त्याच वेळी केरळमध्ये मात्र नेमके विरोधी वर्तन घडते याचा मेळ कसा घालावयाचा? विरोधी पक्षांच्या दुबळेपणाचे मात्र त्यातून दर्शन घडले. केरळमधील या घटनांनी इंदिरा कॉंग्रेसविरुद्ध विरोधी पक्षांची प्रभावी आघाडी उभारण्याच्या प्रयत्नांची पीछेहाटच होणार आहे मार्क्सवादी व इतर डाव्या पक्षांच्या मनात कॉंग्रेस (एस) व जनता पक्षाबद्दल काहीशी कटुताच निर्माण होईल.

केंद्रातील सत्तारुढ पक्षास अनुकूल भूमिका राज्यपाल घेतात. अशी टीका यापूर्वी अनेकदा झाली आहे. केरळच्या राज्यपाल श्रीमती ज्योती वेंकटाचलम यांनी तीच परपरा पुढे चालविली आहे. केरळ विधानसभेच्या एकूण १४१ सभासदांत इंदिरा कॉंग्रेस आघाडी ६८, डावी आघाडी ६८ व जनता पक्ष ५ असे पक्षबळ आहे. दोन्ही आघाड्यांचे तुल्यबळ असता इंदिरा कॉंग्रेस आघाडीलाच मंत्रिमंडळ बनवायला सांगण्यात राज्यपालांनी कोणते निकष लावले? या आघाडी मागे बहुमत असल्याची आपली खात्री झाली आहे एवढेच त्यांनी सांगितले पण या खात्रीला आधार काय हे त्यानी सांगितले नाही. आम्ही मंत्रिमंडळ पाडणार नाही ही जनता पक्षाची भूमिका केवळ कॉंग्रेस (आय)आघाडीच्या मंत्रिमंडळाबाबतच आहे की, डाव्या आघाडीच्या मंत्रिमंडळाबाबतही त्यांची तीच भूमिका आहे हे राज्यपालांनी स्पष्टपणे जाणून घेतले का? जनता पक्षानेही या बाबत निस्संदिग्ध धोरण का जाहीर केले नाही?

करुणाकरन यांचे मंत्रिमंडळ सत्तेवर आले तरी ते फार काळ टिकणे कठीण आहे एक दोन सभासद गैरहजर राहिले तरी त्याचा पराभव होऊ शकेल. छोट्या गटाना आमिषे दाखवून बळ वाढविण्याचे प्रयत्न केले जातील. या अनिष्ट प्रवृत्तीना वाव देण्यापेक्षा निवडणुका घेणे हाच अधिक योग्य मार्ग होता. □

अवती भवती । शरद कृष्णन्

## ऐक्य प्रयत्नांना गती

इंदिरा कॉंग्रेसविरुद्ध टक्कर द्यायची असेल तर काही किमान कार्यक्रम निश्चित करून विरोधी पक्षाना एकत्र आणण्याच्या प्रयत्नांना पुन्हा एकदा चालना मिळाली आहे जनता पक्षाध्यक्ष श्री. चंद्रशेखर या दृष्टीने प्रयत्न करतच होते. त्यांच्या या प्रयत्नाना प्रारंभी मोरारजीभाईंचा विरोध होता; परंतु अलीकडेच या संदर्भात अहमदाबादमध्ये जे निर्णय झाले त्याचे स्वरूप पाहता ऐक्य प्रयत्नाना विरोध करणे सयुक्तिक नाही याची जाणीव मोरारजीभाईंना झाल्याचे दिसते. खेरीज आपल्या पक्षातही आपण अल्पमतामध्ये असून विरोधी पक्षाना एकत्र आणण्याच्या चंद्रशेखर यांच्या प्रयत्नांना वाढता पाठिंबा आहे याचीही जाणीव त्यांना झाली असावी. त्यामुळेच जनता पक्षाच्या यावाबतच्या निर्णयाना त्यांनी विरोध दर्शवला नाही. विरोधी पक्षानी एकत्र यायचे ठरवले तरीही ही प्रक्रिया सोपी नाही. ज्येष्ठ नेत्याना त्यासाठी बरेच प्रयत्न करावे लागतील आणि तशा प्रयत्नाना प्रारंभही झाला आहे. लोकदलाचे चौधरी चरणसिंग, जनता पक्षाध्यक्ष श्री. चंद्रशेखर व भाजपचे अध्यक्ष अटलबिहारी वाजपेयी हे येत्या आठ तारखेस हरियानामधील भिवनी येथे एकाच व्यासपीठावर एकत्र येत आहेत. जनता पक्षाकडून विरोधी पक्षाना एकत्र आणण्याच्या हालचाली सुरू झाल्या तरी त्याला सर्व विरोधी पक्षाकडून विशेषत –जनता पक्षाच्या सर्व घटकपक्षाकडून-पुन्हा पाठिंबा मिळण्याची शक्यता नसल्याने जनता पक्षाची पुन्हा फेरबाधणी होण्याची शक्यता कमीच आहे. जनता पक्षातून जी मंडळी फुटून निघाली त्यापैकी लोकदलाच्या झेंड्याखाली एक मोठा गट काम करतो आहे. या गटाचे नेतृत्व चौधरी चरणसिंग यांच्याकडेच आहे. चौधरीखेरीज जॉर्ज, मधु लिमये आदि आगलावी मंडळी या गटात आहेत. केवळ लोकदलाचा झेंडा नाचवून आपण काही करू शकत नाही याची त्याना जाणीव आहे. त्यामुळे इंदिरा कॉंग्रेसला टक्कर द्यायची असेल तर काही किमान कार्यक्रमाच्या आधारे विरोधी पक्षाची आघाडी उभी करणे हा एकमेव पर्याय सध्याच्या परिस्थितीमध्ये उपलब्ध आहे. अशी आघाडी उभी राहिली, तर जनता पक्षातून फुटून निघालेले बहुतेक सर्व घटक या झेंड्याखाली एकत्र येतील. जनता पक्षासारखा एक पक्ष निर्माण करण्याचा प्रयत्न होणार नाही. कारण जे घटक पक्ष या दृष्टीने सध्या प्रयत्न करत आहेत त्याना स्वत.चे स्वतंत्र अस्तित्वही टिकवायचे आहे आणि त्याचबरोबर इंदिरा कॉंग्रेसबरोबर टक्कर देण्यासाठी वाढत्या बळाची आवश्यकताही आहे. अटलजीचा भाजप हा जनता पक्षाच्या जुन्या घटकपक्षापैकी एक बलशाली पक्ष आहे. भाजप आणि संघ याचे संबंध आहेत. दोन वर्षांत या पक्षाने स्वतःची ताकद वाढवली आहे. आपला पक्ष विसर्जित करण्याची कल्पना अटलजी व त्यांचे सहकारी मान्य करणार नाहीत; परंतु जर काही राजकीय उद्दिष्टे साध्य होत असतील तर आपल्या एके काळच्या जुन्या सहकाऱ्यांशी सहकार्य करण्यास भाजपची हरकत नाही. प्रमुख विरोधी पक्षांनी एकत्र येण्यास वातावरण तसे अनुकूल आहे. चंद्रशेखरजी परिस्थिती कौशल्याने हाताळून एक एक पाऊल पुढे टाकत आहेत. आज तरी असे दिसते की, जनता, लोकदल आणि भाजप हे जुन्या जनता पक्षाचे तीन प्रमुख घटक काही किमान कार्यक्रमावर एकत्र येऊ शकतील. खेरीज केरळमध्येही वाताहत झाल्यानंतर शरद कॉंग्रेसला तसे फार मोठे स्थान उरलेले नाही. शरद कॉंग्रेसचे सरचिटणीसपद संभाळणाऱ्या सेविका अंबिका सोनी व श्री. बरुआ यानी चंद्रशेखर याच्या प्रयत्नाचे स्वागत केले आहे. जगजीवनराम याना या आघाडीमध्ये फारसा रस दिसत नाही. हेमवतीनंदन बहुगुणा याची ताकद मर्यादित असली तरी त्याच्या ताकदीचा उपयोग करून घेता येईल.

किमान कार्यक्रम घेऊन एकत्र काम करण्याची आपली इच्छा आहे हे या नेत्यानी सिद्ध केले तर एकदा या मंडळीनी दगा दिला असूनही सर्वसामान्य जनतेचा या आघाडीला पाठिंबा मिळेल. मात्र सत्तासंपादन एवढेच माफक उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून जर ही आघाडी काम करणार असेल आणि निवडणुकीच्या वेळी जागाच्या वाटपावरून वादळ उठवणार असेल तर या आघाडीला फारसा प्रतिसाद मिळणार नाही. आपल्या हेतूचा प्रामाणिकपणा, आघाडीची कल्पना लढवणाऱ्या नेत्यांना आपल्या वर्तनातून सिद्ध करून दाखवावी लागेल. या आघाडीला कम्युनिस्ट पक्षाची सहानुभूती मिळाली नाही तरी प्रादेशिक पक्ष आघाडीची ताकद वाढली तर या नवीन प्रयत्नाना सहानुभूती दाखवतील. राष्ट्रीय पातळीवर बलशाली पक्षाचा पाठपुरावा करायचा असे अण्णा डिएमकेचे धोरण आहे. स्वाभाविकपणे आघाडी किती बळ उभे करू शकते यावर प्रादेशिक पक्षाच्या पाठिंब्याचे स्वरूप अवलंबून राहील.

सत्ताधारी पक्षाकडून अशा आघाडीची उदंड टिंगल-टवाळी होईल. जनता पक्ष कसा फुटला याचा तपशील वारंवार सांगितला जाईल, आपण या आघाडीला भीत नाही असेही भासवले जाईल; पण अशी आघाडी आपल्या मुळावर येऊ शकेल याची जाणीव सत्ताधारी पक्षाला असल्याने या पक्षाकडून आघाडीला सतत विरोधच होत राहील. भाजपने सार्वजनिक जीवनातील लाचखोरीविरुद्ध आवाज उठवला असून हा पक्ष त्याबाबत आंदोलन उभारण्याच्या तयारीत आहे केंद्रस्थानी असलेल्या विद्यमान सरकारच्या अकार्यक्षमतेविरुद्ध आवाज उठवला तर आपण त्याचे नेतृत्व करू असे मोरारजीभाईंनी सांगितले आहे. लोकदलाकडूनही केंद्र सरकारविरुद्ध आंदोलन उभे करण्याचे प्रयत्न चालू आहेत. या सगळ्या प्रयत्नांना जर काही समान व्यासपीठ मिळाले तर शक्ती लाभणार असून सत्ताधारी पक्षाला वचक वाटावा इतपत वातावरण जरूर तयार होऊ शकेल. चंद्रशेखर आणि विरोधी पक्षाचे अन्य नेते पुढील पावले कशी टाकतात यावर पुष्कळशा गोष्टी अवलंबून आहेत.

# राज्यसभेमधील महिला खासदार

राज्यसभेमधील महिला खासदारांच्या कामगिरीवर स्टेटसमन या दिल्लीहून प्रसिद्ध होणाऱ्या दैनिकामध्ये अलीकडेच एक टिपण प्रसिद्ध झाले आहे. राज्यसभेमधील २८ महिला सदस्य कशा प्रकारे काम करतात याचा रंजक तपशील या टिपणामध्ये प्रसिद्ध करण्यात आला आहे. २४४ सदस्यांच्या या सभागृहामध्ये एकूण २८ महिला–सदस्य आहेत. त्यांचे पक्ष निरनिराळे असले तरी सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, विरोधी पक्षाचे काम करणाऱ्या महिला खासदारांपेक्षा सत्ताधारी पक्षाच्या महिला खासदारांचे गृहामधील काम जास्त लक्षणीय आहे. २८ महिलांपैकी १२ महिला सदस्य या विरोधी पक्षाच्या आहेत. त्यामध्ये शरद काँग्रेसच्या चार, भाजप व डाव्या कम्युनिस्टांच्या प्रत्येकी दोन, अण्णा डिएमकेच्या दोन, अकाली दलाच्या एक व नियुक्त सदस्य एक असा हा १२ महिला खासदारांचा ताफा विरोधी पक्षात आहे. १०८ विरोधी सदस्य असलेल्या या गृहामध्ये ११ महिला खासदार ही संख्या काही तशी कमी नाही; परंतु यापैकी बहुतेक खासदार हजेरी लावण्यापलीकडे फारसे काही करू शकत नाहीत. या बारा खासदारांच्या ताफ्यात त्यातल्या त्यात उठून दिसतात त्या शरद काँग्रेसच्या मार्गरिट अल्वा! अलीकडेच आंतरराष्ट्रीय प्रश्नावरील चर्चेमध्ये भाग घेताना त्यांनी केलेले भाषण चांगलेच प्रभावी होते. शरद काँग्रेसच्याच पुरवी मुखर्जी पूर्वी कामकाजामध्ये उत्साहाने भाग घेत असत; परंतु त्यांचाही उत्साह आता थंडावलेला दिसतो. शरद काँग्रेसच्या अन्य खासदार सौ उबीखाने व सौ. अझिझ इमाम, या तशा चिडीचिप असतात. भाजपच्या विजयाराजे शिंदे यांचे नाव मोठे असले तरी त्या खासदार आहेत याचेही विस्मरण व्हावे इतक्या त्या शांत शांत असतात. त्यांच्या सहकारी असलेल्या मोहिंदर कौर या भाजपच्या दुसऱ्या खासदारही जागा अडवण्यापलीकडे फारसे काही करत नाहीत. डाव्या कम्युनिस्टांचे प्रतिनिधी मोठे अभ्यासू असतात असा एक दावा केला जातो. या पक्षाच्याही दोन खासदार सभागृहामध्ये आहेत; परंतु त्यांचाही आवाज उमटत नाही. कदाचित् अति अभ्यासामुळे त्यांना बोलण्यास फुरसत नसावी. तरीही या पक्षाच्या कनक मुखर्जी निदान एखादी संधी तरी पकडतात. तथापि त्यांच्याबरोबर असलेल्या इला भट्टाचार्य गृहामधील एक जागा अडवण्यापलीकडे फारसे काही करत नाहीत. अण्णा डीएमकेच्या एस्. मुथ्थु या बाई चौधरी चरणसिंग यांच्या मंत्रिमंडळामध्ये राज्यमंत्री होत्या. एवढी एकच नोंद त्यांच्याबाबत करता् येण्यासारखी आहे. त्या आणि त्यांच्या सहकारी नूरजहाँ रझाक– गृहात बराच वेळ उपस्थित असतात इतकेच! डॉ. सौ. राजींद्र कौर या अकाली दलाच्या सदस्य पंजाब, अकाली दल, खलिस्तान यासारखे प्रश्न निघाले तर अवश्य बोलतात; पण प्रादेशिक प्रश्नापलीकडे फारसे लक्ष घालत नाहीत. या बाईंचे इंग्रजी बेताचे असले तरी पंजाबीचा मनमोकळेपणाने वापर करून त्या आपले विचार व्यक्त करतात.

राज्यसभेमध्ये सरकारी पक्षाच्या १८ खासदार आहेत. सरकारविरुद्ध आणि विशेषतः पंतप्रधानांविरुद्ध कोणी टीका करू लागले की, कु. सरोज खापर्डे जोरदारपणे पंतप्रधानांचे समर्थन करतात. काही वेळा त्यांची भूमिका इतकी आग्रही असते की, जणू काय ही आपली एकट्याची जबाबदारी आहे असे मानून त्या आपली कामगिरी बजावत असतात. राज्यसभेमध्ये ज्या वेळी अंतुले प्रकरण निघाले त्या वेळीही त्यांनी अशीच मौलिक जबाबदारीची भूमिका पार पाडली. विरोधी पक्षाने जरा टीकेचा सूर लावायचा अवकाश. सरोजबाई लगोलग समर्थनाला उठल्याच म्हणून समजावे! विशेषतः शरद काँग्रेसचे खासदार ए. जी. कुलकर्णी व पिलू मोदी यांच्यावर या बाईंचा विशेष राग. इंदिराजी आणि त्यांचे कुटुंबीय यांच्या विरुद्ध टीका झाली तर विशेष जागरूकतेने प्रतिवाद करणाऱ्या अन्य महिला खासदार म्हणजे उषा मोहित्रा, सौ. मोनिका सिंग व सौ. प्रतिभा सिंग. सत्ताधारी पक्षामधील तीस टक्के सदस्य हे फुटीर असल्याने या गृहामध्ये काही चांगले पायंडे पडतील अशी अपेक्षा मी का बाळगावी ? असा प्रश्न श्री. कुलकर्णी यांनी एकदा विचारून श्री. कुलकर्णी काही भाष्य करू लागताच सौ. उषा मल्होत्रा यांनी लगेच हरकत घेतली. त्याकडे दुर्लक्ष करून श्री. कुलकर्णी यांनी त्यांची विदूषक अशी संभावना करताच त्या चिडून उठल्या आणि विदूषक हा असंसदीय शब्दप्रयोग असल्याचे त्यांनी सांगितले. मग मूळ चर्चा बाजूलाच राहिली आणि विदूषक हा शब्द संसदीय आहे की नाही यावर खल करण्यात १२।१५ मिनिटे खर्ची पडली. अखेरीस त्या वेळी सभागृहाचे अध्यक्षपद भूषवणाऱ्या डॉ. रफिक झकेरिया यांनी हा शब्द संसदीय असल्याचे सांगितले.

सत्ताधारी पक्षाच्या अन्य महिला खासदारांपैकी हमीदा हबोदुल्ला या प्रश्नोत्तराच्या तासामध्ये विशेष भाग घेतात. क्वचित प्रसंगी भाषणही करतात; परंतु त्यांची तयारी पुरेशी नसते. खेरीज आपले सारेच्या सारे भाषण त्या वाचून दाखवत असल्याने भाषणामधील मुद्दे चांगले असले तरी ते पुरेसे परिणामकारक ठरू शकत नाहीत. त्यामानाने अधिक मुद्देसूद बोलणाऱ्या नजमा होतुल्ला याची कामगिरी जास्त सरस असते. त्यांच्या भाषणामध्ये सहजता असते व नेमकेपणाही असतो. ग्रामीण सुधारणा विलावरील त्यांचे भाषण अभ्यासपूर्ण होते. सत्ताधारी पक्षाच्या पंजाबमधील खासदार सौ. अमरजित कौर या अकाली सदस्यांबरोबर वादविवाद खेळण्यात विशेष लक्ष घालतात. सौ. सुशीला अडिवरेकर या अधून-मधून कामकाजामध्ये भाग घेणाऱ्या आणखी एक सदस्य; पण सत्ताधारी पक्षाचे मूक समर्थन करणाऱ्या महिला खासदार काही कमी नाहीत. सौ.एम्. चंद्रशेखर, सौ.रतनकुमारी, सौ.मिस्त्री, सौ.मनिमोना सुल्तान, सौ.मनोरमा पाडे आणि सौ.प्रमिलाबाई चव्हाण याचा समर्थनार्थ हात वर करणाऱ्या खासदार असाच उल्लेख करावा लागेल. अर्थात केवळ हात वर करायचे काम असल्याने या खासदारांपैकी बहुतेकांची उपस्थिती गरजेप्रमाणेच असते.

# प्रकाश पडुकोन म्हणतो

बॅडमिंटन म्हटले की, लगेच डोळ्यांसमोर नाव येते ते प्रकाश पडुकोन याचे. १९८० साली इंग्लंडमध्ये विश्वविजेतेपद संपादन केलेल्या प्रकाशने लगोलग भरपूर अपयशही पचवले आणि या अप-

यशावर मात करून पुन्हा तो यशस्वी टप्प्यावर उभा आहे. अगदी अलीकडेच दिलेल्या एका मुलाखतीमध्ये त्याने अनेक प्रश्नांना मनमोकळी उत्तरे दिली. या मुलाखतीमधील महत्त्वपूर्ण प्रश्नांची आणि प्रकाशने दिलेल्या उत्तरांची नोंद येथे करत आहे.

**प्रश्न :** उत्तुंग यश–अपयश आणि पुन्हा यश हा जो तुझ्या क्रीडाजीवनाचा आलेख आहे, त्याबाबत तुला काय म्हणायचे आहे ?

**उत्तर :** इंग्लंडमध्ये विश्वविजेतेपद मिळाल्यावर माझ्यावर मोठेच दडपण आले. हा सन्मान मिळवण्यापूर्वीही मनावर मोठे दडपण होतेच; परंतु ते दडपण वेगळे आणि एकदा यश मिळवल्यानंतर ते टिकावे यामुळे जे दडपण खेळाडूवर येते ते वेगळे. माझ्या मते मिळवलेले यश टिकवून धरण्यासाठी जे दडपण येते ते जास्त तीव्र व जाचक असते. तुलनेने बोलायचे तर या दडपणाची तीव्रता यश मिळवण्यापूर्वी असलेल्या दडपणाच्या दुप्पट ते तिप्पट असते. माझ्यावर हे मोठेच दडपण इंग्लडमधील विजयानंतर आले. माझा आत्मविश्वास काहीसा डळमळित झाला. खेळत असतानाही माझ्या मनात इतर विचार येऊ लागले. विलक्षण एकाग्रता आणि जबर आत्मविश्वास या दोन गोष्टी बॅडमिंग्टनसाठी अत्यंत आवश्यक आहेत. याबाबतीत मी विचलित झालो होतो; परंतु माझ्या मार्गदर्शकाने—एस. कार्लसनने—मला वेळोवेळी सल्ला दिला. तसेच मी काय करावे याचे वेळापत्रकच आखून दिले. राष्ट्रीय स्पर्धेमध्ये मोदीकडून पराभूत झाल्यानंतर मी त्यांचा सल्ला घेतला आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करून एकाग्रता व आत्मविश्वास या दोन्ही गोष्टी पुन्हा संपादित केल्या.

**प्रश्न :** आंतरराष्ट्रीय बॅडमिंग्टन स्पर्धेबाबत तुझा अनुभव काय आहे ?

**उत्तर :** गती व शक्ती यांचा सुंदर मिलाफ असलेला खेळाडू या स्पर्धेमध्ये प्रभाव पाडू शकतो. मी स्वतः स्ट्रोक प्लेअर आहे. गरजेप्रमाणे मी ताकदीचाही वापर करतो. कदाचित इंडोनेशियाच्या खेळाडूंइतका माझा स्मॅश जोरदार नसेल; पण माझी स्वत:ची अशी एक शैली आहे आणि मी माझ्या पद्धतीने प्रत्येक सामन्याला सामोरा जातो; प्रत्येक खेळाडूला आपल्या खेळात सुधारणा करण्यास नेहमीच वाव असतो; तसा तो मलाही आहे.

**प्रश्न :** आंतरराष्ट्रीय पातळीवरील विशेष कौशल्य दाखवणाऱ्या देशांच्या खेळाडूबद्दलचा आपला अनुभव कसा आहे ?

**उत्तर :** कोणत्याही आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये उतरल्यावर विशेष जबाबदारीनेच खेळावे लागते. चिनी आणि इंडोनेशियाचे खेळाडू प्रथमपासूनच आक्रमक धोरण स्वीकारतात. डेनिश खेळाडूंचे चापल्य विशेष वाखाणण्यासारखे असते; परंतु माझ्या मते चिनी खेळाडूंमुळे आंतरराष्ट्रीय स्पर्धांचा दर्जा विशेष उंचावला आहे. त्यांचा खेळ पहाणे हा एक आनंद असतो. स्पर्धांमधील चुरस प्रतिवर्षी वाढत असून खेळामधील रंगतही त्या प्रमाणात वाढत असल्याने स्पर्धांमध्ये यश मिळवणे सोपे राहिलेले नाही. एके काळी इंडोनेशियाची बॅडमिंग्टनच्या क्षेत्रात दादागिरी होती; परंतु आता परिस्थिती बदलली आहे. खेळाचा दर्जा खूपच उंचावल्याने बॅडमिंग्टनच्या प्रेक्षकाना अशा स्पर्धेमध्ये निर्विवादपणे उत्कृष्ट खेळ पहावयास मिळतो.

**प्रश्न :** स्पर्धेमध्ये खेळत असताना सामन्यामधील चढउताराचा तू स्वत:वर परिणाम होऊ देत नाहीस, याबाबत तुझी टेनिसपटू बोर्गबरोबर तुलना केली जाते. प्रतिस्पर्ध्याचे दडपण वाढल्यावरही तू शांतपणे खेळू शकतोस. ही अवघड बाब तू कशा प्रकारे साध्य केली आहेस ?

**उत्तर :** मी शांतपणे खेळतो किंवा पराभवही हसतमुखाने स्वीकारतो याचा अर्थ या गोष्टींचा माझ्यावर परिणाम होत नसतो असे नाही. बाह्यात्कारी माझे वर्तन कसेही असले तरी आतल्या आत मी निश्चितपणे झुरत असतो.

**प्रश्न :** विश्वविजेतेपदाचा सन्मान तुला—तसा उशिराच म्हणजे वयाची २५ वर्षे झाल्यावर मिळाला. वाढत्या वयामुळे खेळामधील सातत्य व मिळवलेले विजय टिकवणे अवघड जाते काय ?

**उत्तर :** तुम्ही कोणताही खेळ खेळत असा, विशिष्ट वय झाल्यावर तुम्हाला पुढील मंडळींना वाट करून द्यावीच लागते. मी देखील आणखी तीन ते चार वर्षे आंतरराष्ट्रीय पातळीवरील बॅडमिंग्टन खेळू शकेन. आता मला सन्मान उशिरा मिळाला असे जे तुमचे मत आहे, त्याच्याशी मी मोठ्या प्रमाणावर सहमत आहे; पण असे होण्यास मोठ्या प्रमाणात आपण ज्या देशाकडून खेळतो तेथील परिस्थिती कारणीभूत असते. मी जर इंडोनेशियामध्ये असतो तर मी विश्वविजेतेपद कदाचित पुष्कळच लवकर मिळवले असते; पण अर्थात या गोष्टी काही आपल्या हातात नसतात. मी ज्या वेळी खेळ सुरू केला त्यापेक्षा आता परिस्थिती पुष्कळच बदलली आहे; पण मलाही सातत्याने आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये भाग घेता आला नाही. मी ज्या वेळी अठरा वर्षांचा होतो, त्या वेळी म्हणजे १९७३ साली मला विश्वविजेतेपदाच्या स्पर्धेसाठी इंग्लंडला पाठवण्यात आले; पण त्यानंतर तीन वर्षे आर्थिक व राजकीय कारणासाठी माझी निवड झाली नाही. १९ ते २१ ही वर्षे कोणत्याही खेळाडूच्या कारकीर्दीत अतिशय महत्त्वाची असतात आणि बॅडमिंग्टन खेळाडूच्या आयुष्यामधील या महत्त्वपूर्ण वर्षांमध्ये मला आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये भाग घेता आला नाही. पुढे मला पाठवण्यात आले आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये मी यशही संपादन केले. मी जे यश मिळवले त्याबाबत मी निश्चितपणे समाधानी आहे.

**प्रश्न :** आता तू विवाह केला आहेस. त्यामुळे तुझ्या खेळावर परिणाम होईल असे तुला वाटते का ?

**उत्तर :** मुळीच नाही. तुम्हाला तसे का वाटले हे जर तुम्ही सांगितलेत, तर मी खुलासा करीन.

**प्रश्न :** आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये तुला जे उत्तुंग यश मिळाले, तसे यश अन्य कोणी भारतीय खेळाडू का मिळवू शकला नाही ?

**उत्तर :** खेळाचे प्रशिक्षण, सतत सराव आणि सर्वोत्कृष्ट खेळाडूंबरोबर खेळण्याची संधी या प्रत्येक बाबतीत भारतीय खेळाडूंच्या पदरी निराशा येते. खेरीज खेळाची साधनेही तशी निकृष्ट दर्जाची असतात; परंतु आता परिस्थिती झपाट्याने बदलत आहे. नवीन खेळाडूंपैकी मला पराभूत करणाऱ्या सयीद मोदीला उज्ज्वल भवितव्य आहे असे मला वाटते. एकंदरीतच या खेळाची आवड वाढीस लागली असल्याने आणखी खेळाडूही पुढे येतील अशी माझी अपेक्षा आहे.

□

## उत्तरमीमांसा : ३३

स. शि. भावे

# इतिहास : कुणाचा ? कुणासाठी ?

आज दोन जानेवारी. काल इसवी सनाचे एकोणिसशे एक्क्याऐंशी हे वर्ष संपले. १९८२ हे वर्ष सुरू झाले. परवाच्या मध्यरात्री किती लोकांनी जुन्या वर्षाला निरोप दिला. नव्या वर्षाचे स्वागत केले.

जुन्या वर्षाला निरोप व नव्याचे स्वागत हे नक्की काय असते ? वर्ष संपले हे आपण कसे ओळखतो, कसे लक्षात ठेवतो ? जाणारी वर्षे कशात मोजतो ?

वैयक्तिक जीवनात सुखदु:खांनी काळ मापला जातो. वाईट वर्ष गेले किंवा एक दुर्दैवी वर्ष मागे पडले, असे आपण म्हणतो; पण इतिहासकारांच्या कालमापनात मात्र अशा खाजगी, वैयक्तिक सुखदु:खाना महत्त्व नसते, स्थानही नसते.

इतिहासकार म्हणणार— 'रेगन याना अध्यक्ष होऊन एक वर्ष झाले. संजीव रेड्डी यांची चार वर्षे पुरी होऊन पाचवे, शेवटचे वर्ष ८१ साली सुरू झाले...तीस वर्षे चाललेले व्हिएतनाम युद्ध संपून सात वर्षे झाली.' म्हणजे राष्ट्र, समाज, महत्त्वाच्या सामूहिक घटना अशी इतिहासकारांची मापे असतात. या मापात व्यक्तिजीवनाला स्थान नसते.

काही व्यक्तीचा उल्लेख येतो, नाही असे नाही; पण त्या साऱ्या महानतेला पोचलेल्या व्यक्ती असतात. अमक्याची जन्मशताब्दी यंदा आहे असे इतिहासकार म्हणतात. हा अमका-तमका अर्थातच महान पुरुष (समानतेच्या या युगात समानतेच्या भाषेत बोलायचे तर महान व्यक्ती) असतो. शताब्दीचा उल्लेख महानतेला अनुलक्षून असतो. व्यक्तीच्या खाजगी अनुभवांना अनुलक्षून नसतो.

असे का व्हावे ? खाजगी अनुभव इतिहाकारांना महत्त्वाचे का वाटू नयेत ? भारत परतंत्र होता. भारत स्वतंत्र झाला. या वर्णनात व्यक्त होणारा अनुभव अधिक जिवंत ? की, 'गोविंद दुखी होता. गोविंद सुखी झाला.' या विधानातील अनुभव जिवंत आहे ? मला वाटते, 'भारता 'पेक्षा 'गोविंदा 'चा अनुभव अधिक जिवंत आहे, हे इतके स्पष्ट आहे की ते कोणासही सहज पटेल. ते स्वतंत्रपणे सिद्ध करण्याची जरुरी नाही.

तथापि, असे असूनही इतिहासकार मात्र गोविंदाविषयी काहीच बोलत नाहीत. ते सिकंदराचे विजय नोंदतात. छत्रपती शिवाजीमहाराजांच्या स्वाऱ्यांचे तपशील देतात. माओच्या 'लाँगमार्च 'चा गौरव करतात; पण सिकंदराच्या विजयी सैन्यातला कुणी एक, महाराजांच्या सैन्यातला कुणी एक किंवा माओच्या मार्चमधला कुणी एक— या कुण्या एकांविषयी ते काहीच सांगत नाहीत. असे का ?

शिवाजीमहाराजांनी सामन्यातील सामान्य मावळ्यांच्या मदतीने स्वराज्य मिळविले असे आपण इतिहासात शिकतो. यापैकी काही मावळ्यांचीच नावे आपल्याला कळतात. तानाजी, येसाजी, नेताजी, बहिर्जी, बाजी, हिरोजी— बस ! सहा झाले. आणखी मला आठवत नसलेले डझन-दीड डझन धरू. म्हणजे झाले दोन डझन! यांची समजा दुप्पट-चौपट केली तरी, उल्लेख झालेल्यांची संख्या शंभराच्या वर सरकत नाही !

आता छत्रपतीबरोबर लढलेले मावळे काय फक्त शंभरच होते ? लाखो म्हणता आले नाही तरी हजारो मावळे तर खासच त्यांच्याबरोबर होते ! मग त्यांचा उल्लेख इतिहासकार का करीत नाहीत ? त्या इतरांचा त्याग काय कमी होता ? त्याचा निधडेपणा काय कोठे कमी पडला ? त्याच्या अंगातून साडलेले रक्त काय वेगळे होते ? कडा चढून गेलेला तानाजी शूरच; पण त्याच्या बरोबरीने चढून गेलेले आणखी शेपन्नास मावळे तितकेच शूर नव्हते का ? मग त्यांचा उल्लेख वेगळा वेगळा का होत नाही ?

माझ्या मनात हा प्रश्न वारंवार सलतो. नेते, पुढारी याना तेवढी वेगळी व्यक्तिमत्त्वे असतात आणि सामान्य व्यक्तीना वेगळी व्यक्तिमत्त्वे नसतात का ? खचित असतात. मग त्यांचा उल्लेख तेवढा **'मावळे'**, **'मराठी लोक'**, **'जनता'** असा सामुदायिक रीतीने का होतो ?

इतिहासकारच नव्हे तर, वृत्तपत्रकारही हेच धोरण पत्करतात, 'अमक्या समारंभाला अमूक, तमूक, फलाणे, यांसह असंख्य×××× प्रेमी हजर होते' अशी वार्ता असते. येथे फुल्यांच्या जागी साहित्य, संगीत, क्रीडा, शिक्षण—असा कोणताही शब्द घालावा. वार्ता हीच असते. आता येथे, अमूक, तमूक, फलाणे याना वेगळे महत्त्व का असते ? 'आणि बाकीचे सगळे' (कथालेखक) श्याम मनोहर यांचे यासाठीच खास अभिनंदन करायचे !) एका गठ्ठ्यात का गोळा केलेले असतात ?

देणग्यांचा उल्लेख वृत्तपत्रात येतो. तेथेही हीच रीत दिसते. रु. २५,००० अशी ठळक ठशात सुरुवात होते. नंतर खाली येता येता शेवटी रु. १० वाले येतात ! हे सारे कधी बारीक टायपात एकत्र बसवलेले असतात, तर कधी, '१० किंवा ५ रु. देणारे एकूण दोनशेत्रेपन्न' असा सामुदायिक, अनामिक उल्लेख असतो !

देणग्याप्रमाणेच वार्ता देणाऱ्याचीही श्रेणी ठरविलेली असते. पॅरिसहून तलम, झुळझुळते वार्तापत्र आले की, by Dilip (or Latika) Padgaonkar असा, झोकात व्यक्तित्वसंपन्न उल्लेख असतो; पण सातारा, कोल्हापूर, सांगली अशा ठिकाणाहून कितीही महत्त्वाची वार्ता येवो. वार्ताहराचा उल्लेख फक्त 'वार्ताहर' किंवा 'टा. वृ.' एवढाच असतो. ¤

माझ्या मनात प्रश्न सलत असतो. असे का व्हावे ?

खेडोपाडी जाऊन जे वार्ताहर वार्ता जमवितात त्याचे काम सोपे असते का ? खरे म्हणजे, पॅरिसच्या प्रतिनिधीपेक्षाही याचे काम अधिक कठिण आणि जिकिरीचे असते. त्याच्या तब्येतीला आणि जिवाला धोकाही जास्त असतो. एखाद्या साथीत, वादळात, अपघातात स्वत: सापडण्याचा धोका असतो. खेड्यातल्या किंवा झोपडपट्टीतल्या दादा-

लोकांकडून मारहाण होण्याचा धोका असतो. जन्मभराचे अपंगपण माथी येण्याचा धोकाही असतो.

उन्हापावसात हिंडून वार्ता जमवायची, पुन्हा तालुक्याच्या गावी येऊन तारा करायच्या, तासनतास वाहनासाठी स्टॅण्डवर खोळंबून राहायचे. झोप महिन्यामहिन्यात निवांत मिळायची नाही. मुलामाणसात असण्याचे सुख अंगी लागायचे नाही. अशा या वार्ताहराचे महत्त्व निदान त्याच्या मालकाना जास्त पटायला नको का ? पण त्यांचा उल्लेख सामुदायिक आणि अनामिक असा होतो. वरिष्ठांच्या वाट्याला मात्र चढत्या श्रेणीने, अधिकाधिक जाड ठशाचे उल्लेख येतात !

जे वार्ताहरांचे तेच सैनिकांचे. मग हे सैनिक सिकंदराचे असोत, शिवाजीमहाराजाचे असोत, गाधीजीचे असोत, की जयप्रकाशजीचे असोत. लढाईतील साऱ्या हालअपेष्टा या सैनिकांच्या वाट्याला येत असतात.

शेवटच्या विजयानंतर सिकंदर रडला ! आता जिंकायला जग उरले नाही, असे दुःख त्याला झाले. असे सविस्तर वर्णन इतिहासकार करतात, पण त्याच्या सैन्यातला एखादा सैनिक कदाचित आधीच कंटाळला असेल. दुसरा एखादा घरी आजारी असलेल्या मुलाच्या आठवणीने व्याकुळला असेल. तिसऱ्याच्या मनावर पहिल्याच लढाईत भीतीचे एवढे मोठे दडपण आले असेल की नको ही लढाई असे त्याला झाले असेल. चौथ्याला तर चीडही आली असेल. दररोज आपले सिकंदरच्या हुकुमाप्रमाणे चालायचे म्हणजे काय ? त्याच्या अजिंक्यपणाच्या स्वप्नाला आपण काय म्हणून मदत करायची, अशी चीडही आली असेल. हे तर केवळ चार झाले. असे आणखी सगळे असणार. त्याचे काय ? त्यापैकी प्रत्येकाचे सुखदुःख कळावे, त्याच्या आशानिराशा कळाव्या, त्याचे मन उकलून मोकळे दिसावे अशी फार तीव्र इच्छा माझ्या मनात असते. इतिहास वाचून ही इच्छा तर पुरी होत नाहीच. उलट असे वाटत राहते की, या साऱ्या माणसाची वेगवेगळी माहिती न जमवण्यात इतिहासकाराची चूक झाली आहे ते कमी पडले आहेत आणि सिकंदराच्या मोठेपणाची वर्णनावर वर्णने करून ते स्वतःचा कमीपणा झाकण्याचा प्रयत्न करीत आहेत !

जे सिकंदराच्या सैनिकाचे तेच इतराच्या सैनिकांचे. सेनापतीपेक्षा त्यांचे हाल जास्त होतात; पण त्याचा साधा नावनिशीवार उल्लेखही होत नाही ! पुतळे वगैरे उभारून व्यक्तिगत गौरव होतो तो बऱ्याचदा कमी हाल सोसलेल्या पुढाऱ्यांचा. मधेच केव्हा तरी एखाद्या पुढाऱ्याला, एखाद्या सेनानीला या सैनिकाची आठवण होते. वरून आदेश सुटतो आणि, **'अनाम सैनिकांसाठी'** स्मारकस्तंभ उभा राहतो. एखादे कुसुमाग्रज अशा प्रसंगी **'अनाम वीरा'** अशी कविता लिहितात इतकेच ! सैनिकांचा गौरव एवढाच होतो.

गांधीजींच्या किंवा अलीकडे जयप्रकाशजींच्या, चळवळीत ज्यांनी भाग घेतला त्याना, मी कोणत्या सलण्यासंबंधी बोलतो आहे हे स्वानुभवाने कळेल. चळवळ तीस सालची असो, चाळीसची वैयक्तिक सत्याग्रहाची असो, बेचाळीसची ऑगस्ट क्रांतीची असो—की पंचाहत्तर–शहात्तरची असो. तुरुंगात पुढाऱ्याना 'अ' वर्ग. बाकीच्याना 'क' वर्ग ! पुढाऱ्यांना स्वतंत्र खोल्या, इतराना बराकी! बेचाळिसात तर छावणीचे तंबू. पुढाऱ्याना पत्रांची,घरच्या जेवणाच्या डब्याची, राजकीय व नातेवाइकाच्या भेटीची, वैद्यकीय मदतीची, अशा खास सवलती, 'क' वर्गातल्या सैनिकाना अशा वेगळ्या, 'पृथगात्म' सवलती कोठल्या ? त्याचे स्नान, जेवण, हिंडणे–फिरणे सारे काही सामुदायिक ! रोज सूत कातण्याचे व्रत पाळावे असे त्यांना काय वाटत नसणार ? तथापि, सामुदायिक दिनक्रमामुळे त्याना ती सवलत मिळू शकत नसे. पुढाऱ्याना स्वतंत्र खोल्या असत. त्याना स्वतःचे हे आत्मिक लाड पुरवता येत असत.

आत्मचरित्रात पं. नेहरूंनी म्हटले आहे : 'Whenever in doubt, spin.' आणखी असे म्हटले आहे : 'I came to respect the small section of the sky that I was able to see from my room'. असे भावगर्भ उद्गार शेकडो सामान्य सैनिकाच्या गळ्याशी येऊन गोठले असतील; पण पंडितजीच्या कठातून असे उद्गार बाहेर आले. कारण त्याना ते अनुभवता आले. कारण ते पुढारी होते. ते उद्गार पुढे कागदावर आले. त्यांचे खूप कौतुकही झाले. सामान्यापैकी अनेकानीही कुठे कुठे, काही काही लिहिले. त्याकडे फारसे कुणाचे लक्ष देखील गेले नाही ! मग कौतुक कसले होते ?

जयप्रकाशांविषयी मला परमादर वाटतो. त्याचे सात्त्विक, तेजस्वी, खडतर जीवन गौरव करावा असेच आहे; पण प्रभाकर शर्मांचे आत्मदहन त्याच कोटीतले नव्हे काय ? मग शर्मांचा उल्लेख आमचे इतिहासकार तेवढ्याच गौरवाने का करीत नाहीत ? माझ्या मनाचे हे सल आहे. आणि ते काही केल्या शांत होत नाही !

¤

थोडा उलटा विचार केला तर मला असेही वाटते की, सैनिकाचा त्याग हा सेनानीच्या त्यागापेक्षा अधिक मूल्यवान म्हणावयास हवा. कारण त्याच्याजवळ असते ते आणि जो आपखुषीने जे देतो ते, याचे प्रमाण जवळजवळ समान असते. पुढाऱ्यांचे हे प्रमाण बहुधा कमी असते. कारण ते देतात त्यापेक्षा त्यांच्याजवळ बरेच जास्त संचित असते. त्यामुळे पुढारी व सैनिक याच्या भोगण्यामध्ये जसा प्रमाणाचा, तसा प्रकाराचाही भेद पडतो.

पुढाऱ्याबरोबर त्याचे सारे कुटुब पुढारी होते. कारण पत्नी, कन्या, नातवडे सारीच पुढाऱ्याच्या कामात सहभागी होऊ शकतात. त्यांच्या सामान्य उपजीविकेसाठी एक तर त्यांच्यापाशी खाजगी संचय असते, किंवा एखादा विश्वस्त निधी किंवा एखादी संस्था त्यांच्यामागे उभी असतात.

सैनिकाच्या कुटुंबाचे असे नसते. तो लढाईत गुतल्याबर त्याच्या पाठी त्याच्या पत्नीमुलाना सामान्य लोकाच्या हालअपेष्टाना तोड द्यावेच लागते. कुटुबाच्या पोटापाण्यासाठी पत्नीला, किंवा मुलाना कष्ट करावेच लागतात आणि उपजीविकेसाठी कष्ट अपुरे पडले तर बहुधा दिवसाकाठी एक वेळ जेवूनही राहावे लागते ! पुढाऱ्यांची मुले बहुताशी (अगदी रशियन वा चिनी क्रांतिवीर पुढाऱ्याचीही मुले) परदेशीय उच्च विद्यापीठांत शिक्षण घेतात, म्हणजे घेऊ शकतात. सामान्य सैनिकाच्या मुलाना मात्र अनेक वेळा शिक्षण सोडावेही लागते. सैनिकांच्या दुःखाची कहाणी अधिक रंगविण्याचा किंवा ती अधिक हृदयद्रावक करण्याचा माझा इरादा नाही. ती

मुळातच इतकी द्रावक आहे की येथे केवळ दिग्दर्शन पुरेसे आहे. सारांश हा की, सैनिकांचे भोगणे हे प्रकारानेही वेगळे होते.

लढाई संपली आणि पुढाऱ्यांच्या सैन्याचा जय झाला म्हणजे मग तर फार मोठा फरक पडतो. पुढारी स्वतः सत्ताधीश होतो. इतकेच नव्हे तर त्याची बिरादरीही सत्ताधीश होते. सामान्य सैनिकाला मात्र स्वत:च्या मूळच्या किंवा दुसऱ्या एखाद्या सामान्य व्यवसायात परतावे लागते. कारण लढाईत पुढारी हा 'व्यावसायिक' असतो. प्रयोग यशस्वी होवो की अयशस्वी. त्याची 'नाइट' कायम असते. सैनिक हा हौशी म्हणून लढाईत येतो. लढाई संपली की त्याला स्वतःच्या व्यवसायात परत यावे लागते.

हा फरक ध्यानात आल्यामुळेच बहुधा आज-काल सैनिकही जास्त जास्त प्रमाणात 'व्यावसायिक' होताना दिसत आहेत. संसदेपासून ग्रामपंचायतीपर्यंत साऱ्या केंद्रातही 'व्यावसायिकते'ची प्रेरणा काम करू लागली आहे. या अर्थाने पुढारी आणि सैनिक हा भेदभाव जाऊन तिथे मोठे पुढारी आणि छोटे पुढारी अशी श्रेणीपरंपरा निर्माण झाली आहे.

परंतु होऊन होऊन अशा किती अनुयायांचे रूपांतर छोटया पुढाऱ्यांत होणार? यामुळे व्यावसायिक होऊ इच्छिणाऱ्या, पण अजून होऊ न शकलेल्या अनुयायांची संख्या अजूनही खूप आहे. सैनिक आणि सेनानी याच्या भोक्तृत्वातील फरक प्रमाणाने आणि गुणाने कायम आहे, नव्हे तो वाढतोच आहे. ¤

प्रश्न अजून कायमच आहे. या सामान्य सैनिकांच्या जिवंत अनुभवांचा इतिहास इतिहासकार का लिहीत नाहीत? जिवंत नसलेल्या अशा अनेक ढोबळ प्रसंगाचे, घटनाचे, मोठया पदाचे, घराण्याचे, राजवंशांचे इतिहास लिहिले जातात. हेच इतिहास वर्गात शिकवले जातात. आपल्याला ते घोकावे लागतात. तेच महत्त्वाचे मानावे लागतात. त्या मोठया पदांवरील चेहरे ओळखावे लागतात. त्यांचे जन्म, मृत्यू, त्यांनी केलेल्या सुधारणा लक्षात ठेवाव्या लागतात. थोडक्यात स्वत:च्या वैयक्तिक जीवनाचा बराचसा भाग या निर्जीव कवायतीसाठी खर्ची टाकावा लागतो. म्हणजेच तेवढया प्रमाणात स्वतःला निर्जीव बनवण्याची सवय करून घ्यावी लागते.

अशी सवय होते खरी; पण त्याने मनातला सल काही दूर होत नाही. तो बोचतच राहतो. सामान्य व्यक्तीचा जिवंत इतिहास केव्हा लिहिला जाणार? तो कोण लिहिणार? सध्याच्या इतिहासाचा व्यर्थपणा अधिकृतपणे केव्हा ओळखला जाणार?

असा जिवंत इतिहास जोवर लिहिला जात नाही तोवर इतिहासकाराचे १९८१ हे साल मला माझे, खास माझे वाटू शकत नाही. ते गेले काय आणि १९८२ हे नवे साल उगवले काय? तीनशेसहासष्टाव्या (किंवा दर चार वर्षांनी तीनशेसदसष्टाव्या) दिवसाला नव्या वर्षाचा पहिला दिवस म्हणायचे ठरले आहे इतकेच! मर्ढेकरांनी म्हटलेच आहे:

**अन् इसवी सन कवायतीचा**
**कदम उचलुनी पुढे सरकला.**

□





शेतकरी नेते श्री. शरद जोशी
यांचे व्यक्तिमत्त्व व विचार
सादर करणारे, तसेच त्यांच्या
व कै. माधवराव बोरस्ते,
श्री. प्रल्हाद पाटील,
श्री. माधवराव मोरे
इत्यादींच्या नेतृत्वाखाली
लढल्या गेलेल्या नासिकच्या
ऊस–शेतकरी–आंदोलनाचा
चक्षुर्वै सत्यं वृत्तान्त
कथन करणारे पुस्तक

लेखक : विजय परुळेकर

**सचित्र आवृत्ती । पंचरंगी मुखपृष्ठ । किंमत : रुपये छत्तीस**

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०.

# लता मंगेशकर–

# 'वरिले सावळे सुरब्रह्म'

चंद्रशेखर मराठे

एकतीस डिसेंबरच्या मध्यरात्री, सरत्या वर्षाला निरोप देतात व येत्या वर्षाचे स्वागत करतात. हिंदु, मुस्लिम, पारशी, शीख, सिंधी, जैन वगैरेंची वर्षे वेगवेगळ्या तारखांना संपतात व सुरू होतात. आर्थिक वर्ष ३१ मार्चला संपते तर शेतकी व सहकारी वर्ष ३० जूनला संपते. शैक्षणिक वर्ष केव्हा सुरू होते व संपते हे विद्यार्थ्यांनाही कळत नाही असे ऐकतो ! व्यापारी वर्ष दिवाळीत लक्ष्मीपूजनाच्या रात्री संपते. याशिवाय विविध भाषिकांची 'वर्षगणना वेगवेगळ्या दिवशी सुरू होते ते निराळेच. अशा या पाच-पंचवीस ' वर्षां 'च्या भाऊगर्दीतदेखील, सर्वसाधारण नागर माणसाला ३१ डिसेंबर व १ जानेवारी या दोन दिवसात कसली तरी हुरहुर लागते यात काही शंका नाही. डिसेंबर संपत आला की माणसे एकमेकांना हसून सांगतात की हे वर्ष संपत आले बरे का !

त्याचप्रमाणे एक जानेवारीला नव्या वर्षाचे स्वागत केले जाते. वास्तविक अनादी-अनंत अशा कालप्रवाहाच्या एका बिंदुमात्राचे स्वागत ते काय आणि एका बिंदुमात्राला निरोप तो कसला ? पण माणसे एखाद्या जिवंत व्यक्तीला, एखाद्या सुहृदाला निरोप द्यावा तशी सरत्या वर्षाला टाटा करतात आणि त्याच थाटात येणाऱ्या वर्षाचे स्वागत करतात एवढे मात्र खरे ! ज्या कोणी ही कल्पना प्रथम काढली असेल, ' रिंग आउट द् ओल्ड रिंग इन द् न्यू ' हे वचन प्रसृत केले असेल त्याची नाते जोडण्याची शक्ती अफाट म्हणायची ! बरे, वर्ष संपल्यावर निर्लेप मनाने, त्यातील बऱ्यावाइटाचा निरोप घ्यायचा हे एक वेळ समजू शकते. असे म्हटले तरी वर्षातल्याच काय, क्षणाक्षणाच्या आठवणीचाही निरोप घेणे तसे मुष्कीलच !

परतु नव्या वर्षाचे स्वागत म्हणजे काय ? कशाचे हे स्वागत ? येणाऱ्या वर्षाचाच काय, पण क्षणांचासुद्धा चेहरा आपल्याला 'परिचित' नसतो, तर या स्वागताचा अर्थ इतकाच की, त्या अनोळखी वर्षात मागच्यापेक्षा काही भले घडावे, दोन पावले पुढे पडावीत या सार्वत्रिक आकांक्षेचे, असे स्वागत हे दृश्य रूप आहे. विनोबाजी म्हणतात त्याप्रमाणे प्रत्येक 'कांक्षा' ही व्याख्यानुसारी शुभच असते. पुढे काय घडणार हे कोणालाच ठाऊक नसते म्हणून ते चागले असावे एवढी इच्छा प्रत्येकजण करू शकतो व करतो. वर्ष काय किंवा इतर गोष्टी काय, नव्याचे, अज्ञानाचे स्वागत करावे ही सहज भावनाच असावी. नवे म्हणजे काय हा चर्चेचा प्रश्न इतर बाबतीत होऊ शकतो; पण नवे वर्ष मात्र निरपवाद नवेच असते म्हणून त्याचे एवढे उस्फूर्त स्वागत !

इतर सर्व बाबतीत मात्र नवे म्हणजे काय व त्याला सामोरे कसे जावे हा एक यक्षप्रश्न आहे. आजवर नवे म्हणजे काय हे परंपरेने आप्त-वाक्यानी, भावनांनी व ज्याच्या त्याच्या अनुभवसंपन्नतेवर ठरत आले आहे. उजाडणारी प्रत्येक पहाट ज्या अर्थाने नवी असते त्या अर्थाने, वर चढत जाणारा प्रत्येक दिवस काही नवा नसतो. बहुतेकाच्या वाट्याला शिळाच, परिचित दिवस येत असतो. किंबहुना असे दिवसामागून दिवस येतात–जातात. या परिचितपणात एक संथ समाधान जरूर असते. काही दिवस भिरीभिरी प्रवास केल्यावर, बहुतेकांना पुन्हा केव्हा एकदा नित्यक्रमात जाऊन पडतो असे होऊन जाते ते या 'संथ समाधाना'च्या ओढीनेच !

या प्रकारामुळे दोन स्वरूपाच्या फसगती नेहमीच होत रहातात.

एक तर नवे म्हणून जुनेच आपले, मिरवत रहाते. दिवसक्रमाची गोष्ट सोडून देऊ; पण कला, वाङ्मय, शास्त्र, संगीत, तत्त्वज्ञान या क्षेत्रात जुन्यानेच नव्याचा आव आणून भारून टाकण्याचे किती प्रकार आजवर घडले आहेत याला काही मर्यादाच नाही. परिचितपणाच्या पदराला धरून नाविन्याची थोडी हौस 'करण्याची' वृत्ती ही या तोतयेगिरीस नेहमी चालना देते. अशी जुजबी नाविन्याची गंमत काही काळ चाखली की नतर आढळून येते की, अरे, हे तर जुनेच आहे. याने फारसे काही बिघडते असे नव्हे. एका दृष्टीने पाहिले तर हा माणसाचा एक खेळच असतो. प्रत्येक पिढी मागच्या पिढीवर कुरघोडी करण्याच्या ईर्षेने हे नवे आहे, ते नवे आहे, असा पुकारा करते तर प्रत्येक पिढी पुढच्या पिढीला खिजवण्यासाठी ' हॅं, यात नवे ते काय ?' असा मिस्किल सवाल करीत असते.

जीवनातील आधुनिकता जिला म्हणतात, तिच्या बाबतीत तर हा पिढ्यांचा खेळ भलताच रंगतो. पँटचे बॉटम कधी फताडेपणात आधुनिकता मिरवतात तर कधी हे बॉटम घोट्याभोवती गच्च आवळून राहिल्याखेरीज आधुनिकता येत नाही. म्हणून असे वाटते की- आजोबाचे कपडे नातू तद्दन आधुनिक म्हणून घालू शकेल. संगीताच्या बाबतीतही ही पिढ्यांची शिवाशिवी चालू असतेच. पंचवीस वर्षांपूर्वीची सिनेगीते, कोवळ्या तरुण-तरुणींना ' तुफान ' आवडतात. तर कुमार किंवा अभिषेकीसारखे भारदस्त निर्माणशील गायक, त्याच सात सुरातून नित्य नवीन गीत उभे करतात. त्याचे ते सूर दर क्षणी नवे रूप दाखवतात. ' दांडिया 'रास सारखे गुजराती पारंपारिक संगीतनृत्य, ' डिस्को दांडिया ' चपखलपणे बनते व त्या तालावर ' मॉड ' तरुणतरुणी ' लाईफ 'ची लय पकडतात.

सचिनदेव बर्मनसारखे अवलिये सत्तरीच्या घरातदेखील ' आराधना 'सारखे जवान संगीत भडकवतात !

आधुनिक, मॉड म्हटले जाणारे तसे जुनेच असते. याचे एक मजेदार उदाहरण देण्यासारखे आहे. विवाह ठरलेल्या पण त्यास काही अवकाश असलेल्या एका युवतीस एक हितचिंतक सुचवीत होते की, ' बाई, विवाहानंतरचे कार्यक्रम विवाहानंतरच करायचे बरं का ! आधी नाही !'

यावर ती युवती ' माफक ' लाजून म्हणते ' आम्ही काही तितके ' मॉड ' नाही बरं का !'

आता यात मॉड काय आणि ओल्डिश काय ? ही तर जगाच्या प्रारंभापासून चालत आलेली बाब ! तर ते असो !

दुसरी फसगत म्हणजे ' यात नवे काय ?' आणि ' हे सारे आता

जुने झाले' या दोन पिढ्यांच्या सोयिस्कर भूमिकांतून, नवे समोर येऊन उभे ठाकले तरी ते ओळखण्याची दृष्टी कोणाच्यातच रहात नाही. नवे हे बोलून-चालून नवेच असल्याने, त्याला ओळखण्याची खूण उपलब्ध नसते म्हणून ते नवे, समोर घडत असताना देखील, ओळख न पटताच हिरमुसले होऊन जुन्याच्या ढिगाऱ्यात अदृश्य होण्याची शक्यता असते.

तथापि नव्या-जुन्याच्या, आधुनिकता आणि परंपरा यांच्या दोन पिढ्यांमधील अंतराच्या अशा कोणच्याही द्वैतामध्ये न अडकणाऱ्या, अशा काही थोड्या गोष्टी मानवी जीवनामध्ये कधीकधी फार मोठा आनंद निर्माण करून जातात हे आपले केवढे भाग्य आहे!

आता या चिरंतन देणग्यांपैकी एक फार मोलाची चीज म्हणजे लताचा आवाज! लता मंगेशकरविषयी लिहिता-बोलताना बहुतेकांचा गोंधळ उडतो– तिला कशा प्रकारे उल्लेखावे? कोणी कु. लता मंगेशकर म्हणतात, कोणी लताबाई म्हणतात-कोणी लतादीदी म्हणतात, कोणी लताजी म्हणतात हे सारे कृत्रिम वाटते. गावेच्या गावे, प्रदेशाच्या प्रदेश, आपल्या जलौघाने सुखी करणाऱ्या नदीला नदीबाई किंवा नदीजी म्हणण्यासारखेच हे! गंगामाई, हे कानाला गोड वाटते; पण तेच गंगाबाई, गंगाजी असा गंगेचा उल्लेख केला तर तो बेढब वाटतो.

म्हणून मी आपला नुसते लताच म्हणतो.

खरे तर गेली पस्तीसहून जास्त वर्षे कानात गुंजणारा लताचा आवाज केव्हाही कानी पडला की, मग म्हणायला काही बाकी उरतच नाही. शब्दांचे कामच पडू नये, असा हा सुरांचा आणि श्रवणाचा प्रेमसंबंध आहे. या देशातील लोकांपुढे अनेक जटिल प्रश्न आहेत. या लोकांना दारिद्र्य, दु.ख, वंचना यानी गांजून टाकले आहे. हीन-दीन केले आहे! पण एका बाबतीत प्रत्येक भारतीय 'श्रीमंत'च आहे– तो लताच्या सुरांचा मुक्त आस्वाद घेऊ शकतो–घेतो. हा आनंदाचा खजिना केव्हाही रिता होत नाही. प्रतिदिनी तो वाढतच आहे. एवढी दैवी संपत्ती जवळ असल्यावर दारिद्र्याची काय मातब्बरी? वय, भाषा, वर्ग, वर्ण, प्रांतीयता यांचा कसलाही अडथळा न येता प्रत्येकास लताच्या आवाजाने मनसोक्त सुखविले आहे–संपन्न केले आहे.

अशा चिरतरुण स्वराच्या बाबतीत वर्षांचा हिशेब लटका पडतो; पण तरी नोंद करावीशी वाटतेच की, १९८१ साल संपताना लताच्या आवाजाला प्रायः तीन तपे होत आहेत. पस्तीसहून अधिक वर्षे या आवाजाने आपल्याला सोबत केली आहे.

१९७९ मध्ये लताच्या पन्नासावा वाढदिवस साजरा झाला. त्या वेळी प्रथम जाणवले की, लतालादेखील काळाचे बंधन आहे. हे बंधन लताला असेल; पण तिच्या आवाजाला नाही. तिच्या पन्नाशीबाबत माझी एक आठवण आहे. त्या सुमारास १९७९ मध्ये मी एक जिल्ह्याच्या ठिकाणी कामानिमित्त गेलो होतो. सकाळी सहाला लॉजमधल्या खोलीत जाग आली. आता करायचे काय? फिरत फिरत एस. टी. स्टॅंडवर गेलो. तेथे बुक स्टॉलमध्ये एक लता विशेषांक दिसला. तो घेऊन लॉजवर परत आलो. मग लताचे ते कौतुक वाचण्यात एका अनिर्वचनीय अशा आनंदात किती वेळ गेला ते कळलेच नाही. कामाला जाण्याची वेळ झाली तसा घडपडत उठलो. दिवसभर 'मनाच्या' मैफलीमध्ये लताची असंख्य गाणी ऐकू येत होती.

बाकीच्या लताच्या गाण्यांची आपल्याला संगत नसते केव्हा?

माझा दिवस सकाळी सहा वाजता, ज्ञानदेवाच्या 'अजि सोनियाचा दिनु' सारख्या, लताच्या एखाद्या गाण्याने सुरू होतो तर रात्री साडेअकरा वाजता 'लग जा गले के फिर ये हँसी रात हो न हो' सारख्या लताच्याच एखाद्या गाण्याने संपतो. माझा दिवस संपतो तरी जगाचा दिवस संपलेला नसतो. दूर कोठून तरी लताच्याच गाण्याचे सूर कानावर येत राहतात. 'सुबह न आयी कई बार नीदसे जागे.' त्यानंतरही कित्येकदा, झोपेतून अर्धवट जाग आल्यावर, लताचे सूर कानी आलेले आहेत, पहाटेची झुळुक अंगावर यावी तसे.

मी, लताचे गाणे प्रथम केव्हा ऐकले? वास्तविक असा प्रश्न म्हणजे आपल्या ताईला आपण प्रथम केव्हा पाहिले, यासारखाच काहीसा आहे, नाही का? तरी 'आठवणीची स्टेशने' काही वेळ, रेडियोच्या स्टेशनांप्रमाणे भराभर फिरवल्यानंतर हाती लागते ते असे.

दादरला एका इमारतीच्या टेरेसवर, आभाळातल्या चांदण्या निरखीत खाटेवर लोटली असता,

महेफिल में जल उठी शमा परवाने के लिये।
प्रीत बनी है दुनिया में मर जाने के लिये॥

–हे करुण गाणे कानावर आले. लताचा तो ओल्या वेलीसारखा (ही उपमा जी. ए. कुलकर्णींची!) आवाज, मे महिन्यातल्या, गरम झळांनाही एक आर्द्रता देऊन गेला. निराला (संगीत–सी. रामचंद्र) चित्रपटातील हे गाणे अजून कधी रेडियोवर ऐकू आले की, आठवतात त्या गरम झळा आणि त्यात मिसळलेले लताचे ते ओले चिंब सूर!

गरम झळा अजूनही आहेत, लताचे गुलाबपाण्यासारखे मवाळ सूरही अजून आहेत आणि चांदण्यांचा खचही मला खिडकीतून दिसतो आहे!

लताची गाणी या चांदण्यांइतकीच ओळखीची व असंख्य आहेत. –त्यांच्या सारखीच खुणावणारी!

मानवी भावभावनांच्या अगणित छटांची इंद्रधनुष्ये, लताच्या सुराचे किरण शब्दावर पडले की झगमगून उठतात, आठवावे तरी किती?

'चुपचुप खडे है जरूर कोई बात है' (बडी बहेन–हुस्नलाल भगतराम) या गाण्यातली मिस्किलता, 'शीशा हो या दिल हो, आखिर टूट जाता है' (आशा–लक्ष्मीकांत प्यारेलाल) या गाण्यातली हताश तात्त्विकता, 'दिल का खिलौना हाये टूट गया' (गूंज उठी शहनाई–वसंत देसाई) या गाण्यातली सर्वस्व गमावल्याची रिक्तता, 'यशोमति मैय्यासे बोले नंदलाला' (सत्यं, शिवं, सुंदरम–लक्ष्मीकांत प्यारेलाल) मधली रमणीय निरागसता, 'मै तुलसी तेरे आंगन की' (मै तुलसी तेरे आंगन की–लक्ष्मीकांत-प्यारेलाल) मधली समजूतदार शरणता, 'मै तो कारे बदरवासे हारी' (देवता–आर. डी. बर्मन) मधली लाडिकता, 'दिलमे तुझे बिठाके' (फकिरा–रविंद्र जैन) मधली उत्कटता, आयेगा आनेवाला (महल-खेमचंद प्रकाश) मधली सोत्कंठता, 'ना गंगामे डुबा, ना जमुनामे डुबा' (अपने रंग हजार-लक्ष्मीकांत प्यारेलाल) मधली समर्पणशीलता, 'दिल अपना और प्रीत पराई, किसने है ये रीत बनाई' (दिल

अपना प्रीत पराई-शंकर जयकिशन) मधील विकलता, 'सुन चंपा सुन तारा' (अपना देश-आर. डी बर्मन) मधील उत्स्फूर्तता ही काही सहज आठवलेली उदाहरणे.

सर्वसामान्यांसाठी बारा सूर असतात. लताच्या गळयात मात्र याहून किती तरी पट अधिक सूर आहेत. या सुरांचे खरे चीज केले मदनमोहन या संगीतकाराने. त्यांच्याकडे लताने गायिलेल्या गझलांना आजही तोड नाही! सी. रामचंद्र याना देखील लताच्या सुराची काही खास जाण होती. त्यांनी केलेल्या 'धीरेसे आजा री अँखियनमें, निंदिया आजा री आजा (अलबेला), या अंगाईगीताच्या जवळपास येणारे गाणे गेल्या तीस वर्षांत निर्माण होऊ शकले नाही! आजच्या जमान्यात लताच्या सुरश्रीमंतीचा पुरेपूर उपयोग करणारे राहुलदेव बर्मनच एकटे दिसतात! 'ना कोई उमंग है,'(कटी पतंग) 'रैना बीती जाये' (अमर प्रेम), 'करवटे बदलते रहे, सारी रात हम' (आपकी कसम), 'आपकी आँखोंमे कुछ' (घर), 'बितीना बिताई रैना' (परिचय), 'तेरे बिना जिंदगीमे कोई शिकवा, तो नही (आंधी) अशी काही गाणी चटकन् आठवतात.

काही काही संगीतप्रेमी लताची संभावना 'तीन मिनिटाची' गायिका अशी करतात हे मला माहिती आहे. मला असे वाटते की, या सज्जनाना संगीत कळलेले नाही व प्रेम तर त्याहून कळलेले नाही! तीन मिनिटेच काय पण लताचा सूर तीन सेकंद जरी कानी आला तरी तो आपले सारे वैभव घेऊन येतो! काही वर्षांपूर्वी 'आंधी' चित्रपटावर सरकारने बंदी घातली. त्यातील गाणीही ऐकू येईनाशी झाली. त्या चित्रपटातील एक अप्रतिम गाणे, 'इस मोड पे जाते है!' या गाण्याच्या प्रारंभी 'सा, ध, प, ग, अशी पाच स्वरांची एक छोटी सुदर तान आहे. ही तान त्या वेळी एका जाहिरातीत ऐकू यायची. तेवढ्या त्या पाच स्वरानीही मनाच्या तारा झंकारून उठत! 'नाम गुम जायेगा चेहरा ये बदल जायेगा, मेरी आवाजही पहेचान है गर याद रहेगा' हे 'किनारा' (राहुल देव बर्मन) चित्रपटातील विलक्षण जमलेले गीत लताचे स्वत.चेच दर्शन घडवणारे आहे.

लताचे 'नाम' या अर्थाने गुम झाले आहे की, सर्वसामान्य श्रोत्याच्या लेखी हे नाव सुराशीच एकजीव झाले आहे. विशेष नाम राहिलेले नाही. लताचा चेहराही खूपच बदलला आहे. प्रारंभीच्या काही मराठी चित्रपटात दिसलेला तिचा 'किनरा' चेहरा आता चागलाच गोवरा झालेला आहे; पण तिचा आवाज ही तिची खरी पहेचान आहे–अशी पहेचान की जान ओवाळून टाकली तरी तिचे मोल होऊ शकणार नाही!

'गर याद रहेगा' असे मात्र म्हणण्याची लतावर पाळी आलेली नाही, येणार नाही! कारण प्रत्येकाच्या 'यादों के' सूर, लताच्या 'सुराची याद' झाल्याखेरीज जुळूनही येत नाहीत. खंडाळघाला पावसात भिजल्याची 'याद' एखाद्या पावसाळी संध्याकाळी येते ती लताच्या 'रमैय्या वस्तावय्या'चे सूर घेऊनच!

प्रत्येक लग्नसमारंभात, रात्री, वधूच्या पाठवणीची वेळ आली की, सर्वांच्या मनात 'जा मुली जा दिल्या घरी तू सुखी रहा' या लताच्या साध्या व वत्सल गाण्याचे आवर्तन सुरू होते. रोजच्या प्रसंगात, लताच्या गाण्याची हटकून आठवण व्हावी असे कित्येकदा घडते. खरी गोष्ट अशी की, लताची गाणी आपल्या अस्तित्वाचाच एक भाग बनली आहेत. या अजरामर स्वराच्या स्पर्शाने आपले नाशवंत अस्तित्व अमृतमय झालेले आहे.

देखो मैंने देखा है, अिक सपना फुलोके शहेर में हों घर. अपना' या 'लव्ह स्टोरी'मधील रोमँटिक संवादगीतात, (संगीत-आर. डी. बर्मन) लता 'मैं आयी, आयी, आयी, आयी,' असे आवेगाने म्हणत असतानाच, पुढे अस्फुट हसू दाबीत विचारते 'ये तो बोली होगी कहाँपे लडाई?' या प्रश्नातील खटयाळपणा कधी जुना होईल का?

लताचे हे हास्य कधी कोमेजणे शक्य आहे का?

दुसऱ्या एका द्वंद्वगीतामध्ये (एक दुजेके लिये–संगीत लक्ष्मीकांत प्यारेलाल) लता मान हलकेच वेळावून म्हणते 'जैसे सब समझ गये' या फुरंगटलेल्या, लाघवी शब्दांमध्ये घरघरच्या 'लक्ष्म्यां'नी आपापल्या 'धन्या'च्या घेतलेल्या गोड फिरक्याचे प्रतिबिंब आहे.

लता अशी आपल्याबरोबर असते! हसत असते, कुजबुजत असते!

आपल्याबरोबर असताना, एकटी असताना, गाताना किंवा मौनावताना लताबरोबर आणखीही कोणी एक असते. कोण ते?'

तुकाराममहाराज म्हणतात–

'घररिघी जाले, पट्टराणी बळे,

वरिलें सांवळें, परब्रह्म!'

लतानेच हेही गाणे म्हटले आहे ('हाचि नेम आता, न फिरे माघारी' संगीत–श्रीनिवास खळे.)

मी म्हणतो, महाराजांच्या शब्दात थोडा फेर करून आपल्या सर्वांच्या लाडक्या लताबद्दल असे म्हणता येईल–

**वरिले सावळे, सुरब्रह्म**

ही सुरब्रह्माची सुरलक्ष्मी, 'प्रेमा'ची पट्टराणी, लता प्रत्येक भारतीयाच्या मनाला आपल्या सुराच्या साक्षात्कारी सान्निध्याने सतत, सहज, सुखवीत राहो!

□

सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही.
–डॉ. य. दि फडके

# महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०,

## सैबेरियातून केलेल्या चित्तथरारक पलायनाची कथा ( लेखांक सहावा )




**अनुवाद : श्रीकांत लागू**

### तिबेट

आता थोडा मागचा विचार करताना वाटतं की, आमची जेव्हा त्या धनगराशी भेट झाली, तेव्हा तिबेटमध्ये प्रवेश केला नव्हता, तर तिबेट आणि गोबी यांच्यामध्ये तिबेटच्या ईशान्येला चीनचा कान्सु प्रांत आहे, त्यात कुठे तरी होतो. त्या वेळी १९४१ च्या ऑक्टोबरचा सुमार असावा आणि त्याच्यानंतर हिमालयापर्यंत पोचायला, म्हणजे सुमारे १०७० मैल–जवळजवळ तीन महिने जावे लागले. थोड्या कमी-जास्त प्रमाणांत, सरासरी दिवसाला वीस मैलांची चाल आम्ही ठेवली होती. कधीकधी विश्रांतीचे संपूर्ण दिवस जायचे. त्या भागातल्या तिबेटी आदरातिथ्यात आम्हाला नवा हुरूप मिळायचा. ताजेतवाने होण्यासाठी एखादा दिवस पूर्ण विश्रांती घ्यायचो. तिबेटी खेडुतांचं एकूणच आणि विशेषत: प्रवाशांकरता केलं जाणारं आदरातिथ्य औरच होतं ! अत्यंत दिलखुलास, मनमोकळं स्वागत ते करत असत. तेसुद्धा कसल्याही परतफेडीची अपेक्षा न करता. त्यांच्या या कृपेशिवाय आमचा प्रवास अशक्यप्राय झाला असता !

त्या धनगराचा निरोप घेतल्यानंतर पाच दिवसांनी आम्हाला पुन्हा मनुष्यवस्तीचं दर्शन झालं. सकाळी नेहमीप्रमाणे वाटचाल सुरू झाल्यावर सुमारे तासाभरानं डाव्या हाताला दहाएक मैलावर धुराची वलयं वर उठलेली दिसली. भुकेनं पोटात कावळे कोकलत होतेच. अंगात ऊबही पुरेशी आलेली नव्हती. आम्ही त्या जागेचा शोध घ्यायचं ठरवलं. त्या उतारावर सुरुवातीला भुरटं, कोरडं गवत होतं. जसजसे खाली उतरू लागलो, तसतसा हिरवळीचा दाटपणा वाढू लागला. मेंढ्या चारायला योग्य जागा होती. लांबवरची धुराची वलयं अधिक स्पष्ट दिसू लागली. केवळ एखादी झोपडी नसून बडी वसाहत असावी अशी चिन्हं दिसू लागली.

आम्ही खेड्यात पोचलो तेव्हा मध्यान्ह टळून गेली होती. हिरव्यागार टेकाडाच्या कुशीत खुराड्यांसारखी दहाएक घरं विसावली होती-२०×१२ फुटांचं एकएक घरटं असावं. सपाट पण थोडं तिरकं छप्पर. छप्पर उडू नये म्हणून त्यावर धोंडे ठेवलेले होते. घरांच्या आजूबाजूला हिरवळीवर बरीच मेंढरं चरत होती. आम्ही पूर्वपश्चिम वाटेनं खाली उतरत होतो. उतरताना मुद्दाम थांबून इकडे तिकडे पहात होतो. उद्देश एकच–आमच्या आगमनाची तिथल्या खेडुतांना पुरेशी पूर्वसूचना मिळावी. आमचं स्वागत कुठल्या पद्धतीचं आणि कितीसं होईल याची काहीच कल्पना नव्हती.

आणखी जवळ गेल्यावर तिथं लहान मुलं खेळत असल्याचं दिसलं. कोंबड्या–शेळ्याही तिथंच वावरत होत्या आणि फक्त प्राणिसंग्रहालयात पाहिलेला एक प्राणी ' याक ' तिथं मोकळ्यावर मौजूद होता. जोड्या–जोड्यांनी आम्ही पहिल्या घराजवळ पोचलो. तिथं चाललेल्या एका प्रकाराकडे आम्ही कुतूहलानं पहात राहिलो. एक मनुष्य दांडग्या ' याक ' ला तिथंच असलेल्या दुचाकी गाड्याला जुंपण्याचा आटोकाट प्रयत्न करत होता. त्यानं आम्हाला बरंच आधी पाहिलं होतं; पण आम्ही पोचायच्या आत हातातलं काम पुरं करण्याचा त्याचा इरादा होता; पण त्या याकला आमचा वास आलेला होता.

आणि आमच्या अंगाच्या दुर्गंधीमुळं तो बिथरला होता. कुठल्याही परिस्थितीत गाड्याला जुपून घ्यायचं नाही यासाठी त्याची प्रचंड धडपड चालू होती. दरीत वहाणाऱ्या वाऱ्यानं त्याच्या अंगावरची सुंदर लाबसडक सोनेरी केसांची झूल भुरभुरत होती. सहा–सात पोरं तिथं जवळच उभी राहून आमच्याकडे कुतूहलानं पहात होती. सगळयात मोठा दहा वर्षांचा असेल !

एकाएकी त्या खेडुतानं तो जुंपणीचा प्रयत्न सोडून दिला. तो याक उसळी घेऊन दूर पळाला. त्या खेडुतानं मान वळवून आमच्याकडं पाहिलं. आम्ही खाली वाकून अभिवादन केलं. वाकताना त्याच्या तरुण तरतरीत सपाट चेहऱ्यावर आमची नजर खिळलेली होती. त्यानं तसाच प्रतिसाद दिला. मी आणि कोलो पुढं झालो. कोलोची भरदार शरीरयष्टी, त्याची लांबलचक दाढी आणि अमाप वाढलेले केस यामुळं ती पोरं खूष झाली होती. मी काही बोललो. तो खेडूतही काही बोलला आणि एकच लक्षात आलं की, एकमेकांना बोली भाषेनं समजून घेणं अशक्य आहे. त्याला काय वाटलं कोणास ठाऊक, तो वळला आणि त्यानं मागोमाग येण्याची आम्हाला खूण केली. सगळया वस्तीला आमची बातमी देण्यासाठी पोरं पळत पळत तिकडे विखुरली.

घरांच्या ओळीत साधारण मध्यावरच्या एका घरासमोर तो थांबला. बाकीच्या घरासारखंच घर ते दिसत होतं. थोडं मोठं आणि घरासमोर देवडीसारखा थोडासा भाग होता.

'मजेशीर दिसतंय एकूण प्रकरण !' स्मिथ

'तो बहुधा गाव प्रमुखाला बोलवायला गेला असणार.' झारो.

आम्हाला फार वाट पहावी लागली नाही. कारण आमचीच वाट पहात दारामागे उभा असल्यासारखा एक इसम बाहेर आला. पन्नाशीचा असावा. अंगावरच्या केसाळ जाकिटासह इतर पोशाख तिकडच्या भागातला नेहमीचाच होता. अभिवादनाचा कार्यक्रम झाल्यावर तिथल्याच बोलीत तो बोलू लागला. काही कळलं नसल्याचं दाखवून मी सावकाश रशियनमध्ये बोलू लागलो. त्याचा चेहरा एकदम फुलला आणि माझ्याकडं तो अतिशय कौतुकानं पाहू लागला.

'तुमचं मी स्वागत करतो !' 'आता आपल्याला नीट संभाषण करता येईल !' तो रशियनमध्ये म्हणाला.

आम्ही चकितच झालो. तो खूपच सफाईनं रशियन बोलत होता. मी माझ्या मनाला बजावलं की, रशियापासून इतक्या दूर दक्षिणेला भेटलेल्या या रशियन-माणसापासून कसलाही धोका पोचण्याची शक्यता नाही. आगे बढो !

माझ्या प्रत्युत्तराची वाट पाहून त्यानंच पुन्हा सुरुवात केली. 'मी सरकॅशियन आहे. गेल्या कित्येक वर्षांत रशियन बोलणारं कुणीच मला भेटलं नव्हतं !'

'सर्कॅशियन, फारच आश्चर्यकारक आहे !' पण मी पुढे फारसं बोलू शकत नव्हतो. कारण तो ज्या कॉकेशस प्रांतातून आला होता त्या भागाची मला काहीच फारशी माहिती नव्हती.

त्याला किती बोलू आणि काय काय विचारू असं झालं होतं. 'तुम्ही यात्रेला निघालात काय'? 'बुद्ध धर्म स्वीकारलेले रशियन फार थोडे आहेत. तुम्ही गोबीच्या वाळवंटातून चालत आलात की काय ?' त्यानं प्रश्नांची सरबत्तीच लावली.

'होय, आम्ही चालतच आलो.'

'बाप रे ! भलतंच भयानक आहे ते वाळवंट. मी स्वतः त्यात मरायचाच बाकी राहिलो होतो!'

त्याला आणखी काही विचारावंसं वाटत होतं; पण आपण यजमान आहोत या गोष्टीची आठवण होताच, त्यानं आमची माफी मागितली आणि आत–घरात येण्याची विनंती केली. आम्ही घोळक्यानंच आत शिरलो. आत एक बाई ३।४ पोरांना हाकलत मागच्या बाजूला, बहुधा स्वैपाकघराकडे घेऊन जाताना दिसली. ती त्याची बायको असावी.

अर्ध्या तासाच्या आत चहा आणि ओटचे पापगे यांनी आमचा पाहुणचार सुरू झाला. अन्नब्रह्माचं दर्शन होताच आमची बोलणी थांबली आणि समोरच्या पदार्थांचा समाचार घेण्यात आम्ही मग्न झालो. मग आमच्या यजमानानं मोठ्या आदरानं तंबाखू आणि चिलीम फिरवली आणि थोड्याच वेळाच सगळं घर निळसर धुरानं भरून गेलं.

चिलीम ओढता ओढता तो म्हणाला, 'अच्छा, म्हणजे तुम्ही मंडळी आता ल्हासाला जाणार तर !' काही तरी बोलायचं म्हणून तो बोलत होता. आम्ही बुद्ध असून खरंच यात्रेला चाललोत, यावर त्याचा विश्वास नसावा असं वाटत होतं.

'एक गोष्ट नीट लक्षात ठेवा. या भागातल्या रात्री, विशेषतः डोंगरमाथ्यावरच्या रात्री–भयानक थंड असतात ! योग्य त्या निवाऱ्याशिवाय झोपायचा प्रयत्न करू नका. रात्री शेकोटी पेटवण्याचा आळस करू नका पुरेसं झाकून घेतल्याशिवाय या पर्वतात रात्री निजलात तर सकाळी फक्त प्रेत झालेले असाल ! तुम्ही ल्हासाला जाताना पुढच्या टप्प्यापर्यंत इथून सहज सापडेल अशी वाट आहे. आजची रात्र तुम्ही सगळे इथं रहा. उद्या सकाळी कसं जायचं ते मी तुम्हाला सांगेन. प्रवासात रात्रीच्या सुमाराला खेडं लागलं तर तिथंच मुक्काम करा. तुम्हाला तिथं जेवण आणि रात्रीपुरता आडोसा नक्की मिळेल. कोणीही एक पैसाही मागणार नाही !'

'आमची अडचण अशी आहे' स्मिथनं तोंड उघडलं, 'की, आम्हाला कोणालाही इथली भाषा येत नाही !'

यजमान हसून म्हणाला, 'त्यानं काहीही बिघडत नाही. कुठल्याही तिबेटीला तुम्ही खाली वाकून नमस्कार केलात तर तोही तुम्हाला तसाच प्रतिसाद देईल आणि तुमचा मित्र म्हणून तात्काळ स्वीकार होईल !'

संध्याकाळी जरा लवकरच मटण पार्टीचा कार्यक्रम झाला. आम्ही आल्या-आल्याच त्या सरकॅशियन यजमानाच्या मुलानी मेंढरू मारून ठेवलं होतं. मीठ लावलेलं, सुरेख भाजलेलं मास आम्ही पाहुण्याला न शोभेल अशा अधाशीपणेच चापलं! भोजनानंतर सहा-सात गावकरी आमच्यात सामील झाले. प्रत्येकानं आपल्याला अतिशय प्रिय असलेल एक एक सुरेख लाकडी भांडं आणलं होतं. 'अन्नपूर्णे'नं तिबेटी पद्धतीचा चहा केला होता. सर्वजण त्या वाडग्यांतून अत्यंत चवीनं फुर फुर करून चहा प्यायले. चहा झाल्यावर धूम्रपानाचाही झकास कार्यक्रम झाला. आमच्या यजमानाला आमचं संभाषण त्याच्या गावकऱ्याना भाषांतरित करून सांगणं हा एक उद्योगच झाला! बाह्य जगाची इतर माहिती, एकापेक्षा जास्त भाषाचं ज्ञान यामुळं सरकॅशियन यजमानाला त्या गावकऱ्यात फार मानाचं स्थान असलेलं कळत होतं

आणि ते स्थान तोही मोठ्या रुबाबात सांभाळत होता.

आम्हाला विदा करून रात्री सर्व मंडळी अत्यंत समाधानानं आपापल्या घरकुलाकडे परतली. काहीच न घडणाऱ्या त्यांच्या त्या छोटचाशा जगात आम्ही फार आनंदाचं आणि उत्साहाचं वातावरण निर्माण केलं यात शंकाच नाही !

त्या रात्री आम्ही आमच्या सुटकेच्या दिवसानंतर प्रथमच छपराखाली झोपलो! संपूर्ण सुरक्षिततेच्या जाणिवेनं आम्हाला अत्यंत शात, सुखाची झोप लागली होती. आमची गात्रं खूप शिथिल झाली होती. सूर्योदयामुळं नेहमीप्रमाणे जाग आली; पण शरीर आळसावलेलं होतं. यजमानानंही दिवस चांगला उजाडेपर्यंत आमच्या झोपेत व्यत्यय आणला नाही.

आमची जाग, दाराआडून डोकावणाऱ्या पोरांनी बाहेर जाहीर केली. यजमान खादीचे काही रुमाल घेऊन आला आणि त्यानं आमच्या प्रातर्विधीचा, आंघोळीचा बदोबस्त केला.

'अरेच्या, हे तर हॉटेलसेवेच्या वरताण झालं !' झारो विनोदानं म्हणाला, 'आता आम्हाला प्रसाधनगृह दाखवा बरं कुठंय ते !'

यजमानही आमच्या हास्यविनोदात सामील झाला. 'दाखवतो ना ! गावाच्या टोकाला आहे. सुरेख निर्मळ वहातं पाणी आहे !'

आम्ही सहाहीजण त्या झुळझुळ झऱ्यावर गेलो. हवेतील थंडाई कमी झाली नव्हती. आम्ही वरचे कपडे काढून सुरेख ओंबळून घेतलं. जाकीट वगैरे धुवायचा विचार होता; पण ती वाळेपर्यंत थांबायचं म्हणजे उशीर झाला असता.

त्यानंतर मटण, ओटच्या वड्या, चहा यांची फेर झाली आणि निघायची वेळ झाली.

यजमान गहिवरून म्हणाला, 'परत जाताना याच वाटेनं आलात तर हे घर विसरू नका. तुमचेच आहे याची खात्री असू द्या.'

स्मिथ 'आम्ही तुमचे अत्यंत आभारी आहोत.'

मी 'तुमच्या पत्नीनं आमच्यासाठी इतकं केलंय की त्याचे उतराई आम्ही कसे होऊ ? आमच्यासाठी तुम्ही तिचे आभार मानाल का ?'

तो 'नाही, आभार मानणार नाही ! कारण तिला ते समजणार नाही. त्याऐवजी ती खूष होईल असं काही तरी मी तिच्याशी बोलेन. तुम्ही निश्चित रहा !'

त्यानं वळून तिच्याशी थोडं हितगुज केलं. त्याबरोबर तिला खुदकन हसू लोटलं. ती आत पळाली आणि बाहेर येताना मोठ्या वाडग्यात ओटच्या वड्या आणल्या. आपल्या नवऱ्याच्या हातात देत हळूच काही तरी त्याला म्हणाली.

'ती म्हणतेय, या वड्या तुम्ही घेऊन जाव्या.' तो म्हणाला. त्याबरोबरच एक मेंढीचं केसाळ कातडं त्यानं आम्हाला भेट म्हणून दिलं. म्हणाला, 'त्याचा उपयोग जोडे करायला किंवा आहेत ते दुरुस्त करायला होईल.' आम्ही प्रत्यक्षात त्याचा उपयोग पुढे हिमालयातील थंडी निवारण्यासाठी पंजे झाकले जातील अशा पंजोड्यासाठी केला !

तो आमच्यावरोबर खेड्याबाहेर वाट दाखविण्यासाठी आला. आमच्या संपूर्ण प्रवासात इतकी व्यवस्थित मार्गदर्शक माहिती प्रथमच मिळत होती. 'वाटेतल्या बऱ्याचशा पाऊलवाटा सापडणं फार सोपं नाही !' तो सागत होता, 'आपली नजर पाऊलखुणावर न ठेवता समोर डोंगरखुणांवर ठेवा म्हणजे वाट सापडायला सोपं जाईल!'

त्यानं वाटेतल्या मार्गदर्शक, दिशादर्शक खुणा नीट समजावून सांगितल्या. चार दिवसांच्या अंतरावर मुकुटाकार डोंगर दिसेल. त्या मुकुटाच्या उत्तरेकडच्या दोन टोकांना जोडणाऱ्या खोगिरासारख्या भागाकडे जाणारी दिशा धरा. तिथून टोकेरी पेरूच्या आकाराचा डोंगरमाथा दिसेल. त्या दिशेनं चला ! हा माथा अतराबाबत तुमची फसवणूक करील. तिथं पोचायला सुमारे दोन आठवडे लागतील !

त्याच्या पुढच्या खुणा मात्र फार नीटपणे तो सांगू शकत नव्हता; पण त्याच्या अंदाजानं वाटेत पूर्वेला ल्हासाकडे जाणारा रस्ता आणि नैऋत्येकडे हिमालयाच्या तळटेकड्यांकडे जाणारा रस्ता याचा तिठा लागेल. आम्ही तिथेच त्याचा निरोप घेतला. पायात घोटाळणाऱ्या पोराचा घोळकाही मागे वळला. जाताना त्यानं मंगोलियन पद्धतीत न बसणारं अभिवादन केलं. चक्क हात हलवून निरोप घेतला !

मार्चिनकोनं आमच्या सगळ्यांच्याच मनातला विचार बोलून दाखवला, 'ही मंडळी आपल्याला नतमस्तक व्हायला लावतात. याच्या वागण्यानं, ज्या नरपशूनी माणुसकी या शब्दाची वाट लावली आहे, अशा घृणास्पद माणसाच्या आठवणी पुसून टाकायला फार मदत होते.'

आमच्याजवळ असलेल्या प्रत्येकी तीन तीन ओट वड्या तीन दिवसपर्यंत अस्पर्शित ठेवल्या होत्या. त्यानंतरसुद्धा अत्यंत कठोर नियंत्रणाखाली त्यांचं सेवन करू लागलो. वाट त्या मानानं सोपी होती. चौथ्या दिवशी 'मुकुटाच्या' पायथ्याशी आम्ही मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी भल्या पहाटेच चढायला सुरुवात केली. चढ अवघड नव्हता. तरी खोगीरभाग पार करायला दोन दिवस लागले.

खऱ्या अर्थानं भोजन झाल्याला एक आठवडा उलटला आणि एक दिवस तिबेटी लोकांची दोन घरं दिसली. आजूबाजूला चक्क रानटी कुरणात मेंढरं होतीच. हवेतला गारवा थोडा ओसरला होता. गंमत म्हणजे आजूबाजूला चक्क रानटी गुलाबाचे, पिवळ्या, लाल-पांढऱ्या गुलाबांचे ताटवे मन वेधून घेत होते.

आधीच्या यजमानसारखंच पण थोडं लहान आणि सामानही जरा कमीच असलेलं घर होतं. पण आदरातिथ्यात मात्र जराही कमतरता नव्हती. दोन वेळा खच्चून मांसाहार झाला. दुधाचाही आग्रह झाला. रात्री मुक्कामालाही ठेवून घेतलं. दुसऱ्या पहाटे निरोप द्यायला सर्व कुटुंब प्रेमानं हजर होतं.

¤

## हिमालयावर

सुरकॅशियन यजमानानं सांगितलेल्या सर्व ढोबळ खुणा आम्ही पार केल्या. शेवटचा पेरूसारखा डोगरही पार केला आणि पलीकडचा प्रदेश त्यामानानं वाटचालीला कमी त्रासदायक दिसू लागला.

आठवड्यावर आठवडे यात्रा चालू होती. ऑक्टोबर सरून नोव्हेंबर चालू झाला. दिवस थंडावू लागला. रात्री तर गोठवणाऱ्या जाणवू लागल्या. वाळवंट नव्हे पण प्रदेश वैराण, कुणाचा मागमूस

नाही. त्यामुळं मेंढयांचे कळपही नाहीत. चार-चार दिवस अन्नावाचून जाऊ लागले. अत्यंत कुंद, धुकेरी वातावरणातल्या सकाळी अत्यंत अनुत्साही जाऊ लागल्या. शरीराच्या हालचालीत अत्यंत आळसावलेपणा येऊ लागला. वाटेत लागणाऱ्या क्वचित खेड्यात रेमटून खायला मिळे; पण वाट सुधारली की, पुन्हा फाके पडत. ताजा भाजीपाला दिसायचा सुद्धा नाही; त्यामुळे रक्तपितीचा त्रास जाणवायचा ! सुदैवानं एकाचीही प्रकृती धोकादायक अवस्थेला पोचली नाही आणि पदयात्रा चालूच राहिली. वाटेत फुसाटत जाणाऱ्या नद्या ओलांडल्या. प्रथम दर्शनी बिकट वाटणारे डोंगर-माथे सहज सोपे झाले आणि याउलट किरकोळ वाटणाऱ्या टेकड्यांनी दम काढला !

याच प्रवासात आम्हाला आमच्याजवळच्या तारांच्या वळ्यांचा उपयोग समजला. तो सुद्धा गरजेपोटी एक ठिकाणी आमचा मार्ग एका दुभंगलेल्या टेकडीनं रोखला. तो प्रचंड दरीतला खड्डा ओलांडायचा तर थोडासा वळसा घालायला हवा होता आणि तिकडे तर गिर्यारोहकांची डोकेदुखी ठरते असा खडकाचा लोंबकळणारा टोकेरी सुळका होता. त्याच्यावर चढण्यासाठी त्या ताराचा उपयोग करण्याची कल्पना सुचली. तीन-चार वळी एकात एक अडकवून दहा फुटांचा तारखंड तयार केला आणि कोलोला त्याची उची वापरायला लावून त्या सुळक्याला प्रयत्नपूर्वक तो तारखंडाचा गळ अडकवला आणि त्याची ताकद अजमावून हळूहळू एकेक जण त्या सुळक्यावर चढला आणि अडचणीतून आमचा मार्ग फत्ते केला !

वाटेत कसलंही वैशिष्टय लक्षात न येणारी अशी अनेक खेडी, खेडुली, आम्हाला लागली. वस्ती कशीही असली तरी आदरातिथ्य मात्र नंबरी होतं !

शेवटी एकदाचा ल्हासाला जाणाऱ्या रस्त्याचा तिठा लागला. नैर्ऋत्येकडे जाणारी वाट भारताकडे जाणार याबद्दल आमच्या मनात शंका उरली नाही. ल्हासाच्या दिशेनं, म्हणजे आम्हाला जी वाटत होती, त्या दिशेनं एका मोठा तांडा दूरवरून जाताना दिसला. एवढ्या मोठ्या जमावाचं दर्शन आम्हाला प्रथमच होत होतं.

या प्रदेशात उंच-सखलपणाबरोबर मोठमोठी सरोवरं असल्याचंही आमच्या लक्षात आलं. असंच एक प्रचंड सरोवर आम्हाला लागलं. त्याच्या काठावर सरत्या नोव्हेंबरची एक रात्र काढली. शेकोटी पेटवली होती; पण तेवढयान जाणाऱ्या-येणाऱ्या गारव्याचा प्रतिकार होऊ शकत नव्हता. त्यानंतर, काही दिवस बऱ्याच सपाटीच्या प्रदेशात वाटचाल झाली. एका खेड्यात फक्त एकच जेवण घेतलं आणि रात्री मुक्काम करायला नकार दिल्यावर आम्हाला शिधा बांधून देण्यात आला. आमचा प्रवास सुरेख चालला होता. आमचं नीतिधैर्य वेगळ्याच पातळीवर पोचलं होतं.

त्या मोठ्या सरोवरानंतर तीन-चार दिवसांनी एका बोडक्या खडकाच्या दरीत आम्ही मुक्काम केला. एका छोट्याशा गुहेचा आश्रय घेतला. जे काय होतं ते सगळं आणि ऊब येण्यासाठी एकमेकाला बिलगून बसलो. त्या रात्री आणखी एक शोकांतिका साकार होणार आहे याची सुतराम कल्पना आम्हाला नव्हती !

नेहमीप्रमाणेच आम्ही झोपलो. कुणाला तरी अर्धवट स्वप्नात जाग यायची आणि तो शेकोटी फुलवायचा. दुसऱ्या दिवसाची पहाट होण्याच्या सुमारास झारो जागा झाला आणि बाहेर चक्कर मारून आला. तो परतला तेव्हा मीही जागा होऊन कोपर टेकून हाताच्या पंजावर डोकं टेकून इकडेतिकडे पहात होतो. तो जवळ येत म्हणाला, 'अजून धुकं आहे आणि थंडीही फार आहे. तरी आपण निघू या !' असं म्हणत एकेकाला ओलांडत प्रत्येकाला तो उठवू लागला. माझ्यापलीकडे पालुको होता. कोलो आणि स्मिथ यांच्यामध्ये मार्चिनको घुसडून पडला होता. मी उठून उभा राहिलो. हातपाय झाडून आळस झटकत होतो. एकूण हालचाल सुरू झाली होती. कोलोनं उगाचच मला त्याचा हत्तीधक्का देऊन गंमत केली.

तेवढयात झारोचा जरा कडक आवाज आला, 'मार्चिनको ऊठ !' पुढच्या हाकेत जरा काळजी डोकावली. 'मार्चिनको ऊठ ना. किती वेळ लोळतोयस !' झारो मार्चिनकोच्या खांद्याला धरून हलवत होता.

मी झटकन गुडघ्यावर होऊन मार्चिनकोला हलवू लागलो. तो अत्यंत विश्रांत पडल्यासारखा दिसत होता. एक हात कपाळावर होता. मी तो हात धरून हलवायचा प्रयत्न केला. तो आपला डोळे मिटून निपचित होता. मी नाडी तपासली. छातीला कान लावला. पापण्या उचकटून बुबुळं पाहिली. सगळ्या तपासण्या एकापाठोपाठ झपाट्यानं उरकल्या आणि त्या खुणाचा विश्वास बसणार नाही असा संदेश माझ्या अंगावरून शहारत गेला. अंगात थोडी उष्णता होती; पण बाकी सगळं स्तब्ध !

मी उठून उभा राहिलो. माझं मलाच आश्चर्य वाटेल इतक्या हळुवार आवाजात मी पुटपुटलो, 'मार्चिनको गेला !' सगळ्यांच्यापर्यंत हे पोचलं की नाही याची खात्री न पटून मी पुन्हा म्हणालो, 'मार्चिनको मेलाय !'

कोणी तरी उसळून म्हणालं, 'हॅट्, कसं शक्य आहे हे ? त्याला काहीही झालेलं नव्हतं. काही तासापूर्वीच तर मी त्याच्याशी बोललो होतो, तेव्हा तर झकास होता. कसलाही कुरकुर नव्हती. कसलंही...'

'तो मेलाय, खरंच !' मी.

स्मिथ त्या प्रेताजवळ बसला. त्यानं चाचपणी केली आणि शांतपणे मार्चिनकोचे दोन्ही हात छातीवर एकत्र जुळवून ठेवले आणि म्हणाला, 'रावीज म्हणतो ते खरंय !'

पालुकोनं आपली टोपी डोक्यावरून खाली खेचली आणि आपल्याच छातीपुढं क्रूसाची खूण फिरवली.

अॅकॅरिअस मार्चिनकोवास अठ्ठावीस-एकोणतीस वर्षांचा तरुण, रशियन लोकांनी पकडलं नसतं तर कदाचित लिथुआनियात यशस्वी वास्तुशिल्पी म्हणून नाव काढलं असतं, त्यानं आपलं आयुष्य जगण्याची धडपड थांबवली होती ! आम्ही अवाक् झालो होतो. आम्हाला काही कळेचना ! त्याला मृत्यु कसा आला असावा हे आम्हाला कळण्यापलीकडचं होतं. कदाचित आम्हाला वाटत होतं त्यापेक्षा तो फार जास्त थकून गेला होता. त्याच्या हृदयाला कसलाही ताण यापुढं झेपला नसता. मीच काय इतरही सगळे या प्रकारामुळं अगतिक

**वस्ती कशीही असली तरी आदरातिथ्य मात्र नंबरी होतं !**

झाले. मार्चिनको आपल्याच विचारात गढलेला. क्वचितच केव्हा हास्यविनोद, तोही थोडासा तिरकस करणारा, ज्याला फक्त ख्रिस्तिनानंच थोडंसं खेळकर बनवलं होतं, हसायला लावलं होतं, असा हा मार्चिनको आमच्यातून कायमचा गेला !

त्या खडकाळ भूमीत त्याला पुरायला खड्डा खणणंही दुरापास्त झालं होतं. दोन खडकांच्या एका फटीत आम्ही त्याला ठेवलं आणि लहानमोठ्या दगडगिट्टयांनी ते प्रेत झाकून टाकलं. कोलोनं, नेहमीप्रमाणं क्रूस करून त्यावर रोवून टाकला. सर्वांनी आपापल्या परीनं देवाची करुणा भाकली आणि अत्यंत जड अंतःकरणानं आणि पावलांनी आम्ही पाचजण तिथून निघालो !

प्रदेश पुन्हा पालटला. आमच्या मनाची आणि कष्टाची कसोटी पहाणारा पहाडी प्रदेश पुन्हा सुरू झाला. अवघड दरडी चढून जाण्यासाठी आमच्याजवळच्या तारखंडाचा उपयोग आम्हाला चांगलाच होत होता. दिवसअखेरीला कुठली तरी वस्ती शोधण्याचा आमचा प्रयत्न असे; पण बरेच वेळा अंधार पडल्यावरसुद्धा मनुष्यवस्तीचा मागमूसही दिसायचा नाही !

एके दिवशी एका उंच शिखरावरून पूर्वेकडे नजर गेली असता अनेक मैल दूर अंतरावर सूर्याच्या परावर्तित किरणानी घराची छपर चकाकताना दिसली. आम्ही मनोमन समाधान मानल की फार दूरवरून का होईना आम्हाला ल्हासा शहराचं दर्शन घडलं !

थंडीचा जोर वाढू लागला. रात्री तर असह्य होऊ लागल्या.. हिमालयाच्या तळटेकड्यांवर हिमभरे ढग वहाताना दिसू लागले. एका रात्री एका बुद्रुकामध्ये दगडी घरात मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी बराच वेळ खपून पंजाड्या तयार केल्या.

एके दिवशी स्वच्छ प्रकाशात हिमालयाच्या हिममाथ्याचं दर्शन घडल. ते शिखर अत्यंत फसव्या रीतीनं जवळ वाटत होतं. आम्ही त्या पर्वतापासून फारच लाब होतो, अस अत्यत त्रासदायक प्रवासानंतर लक्षात आलं.

हिवाळ्यानं आम्हाला चागलं ग्रासलं होत. रात्रीचं तपमान निश्चितच शून्याच्या खाली जात होतं. मधूनच बर्फुलाचा जोरदार पाऊस व्हायचा. सोबतीला बर्फाळ डोंगरावरून येणारे थंडगार वारे असायचेच. अर्थात सैबेरियातील थंडीच्या कडाक्याची सर नव्हती; परतु आमच्यासारख्या अर्धपोटी, सतत नऊ महिन्याच्या वाटचालीनंतर अधमले झालेल्याना जेरीला आणायला एवढी थंडी पुरेशी होती.

फेब्रुवारीमध्ये आम्ही शेवटच्या खेड्याला भेट दिली. आठ-नऊ घराच बुद्रुक ! दरीच्या तळापासून डोंगरउतारावर साधारण दोनशे फुटावर वसलेलं होतं. त्या खेड्यापर्यंत पोचायला आम्हाला दोन दिवसाची मजल करावी लागली होती. दरीच्या पलीकडे हिवाळ्यातल्या दुपारच्या धुकट वातावरणात वर ढगापर्यंत पोचलेली पर्वताची राग दिसत होती. या घराचं एक वैशिष्टय होतं. ही घर दुमजली होती. तिबेटमध्ये आम्ही अशी घर पाहिली नव्हती. कशाला ! सैबेरिया सोडल्यापासूनच अशी दुमजली घरं आम्हाला दिसली नव्हती. त्या खेड्यापर्यंतचं दोनशे फूट अंतर चढून जाताना आमच्या नाकीनऊ आले ! पालूको तर फारच थकलेला दिसत होता. घोट्याला एका टोकेरी दगडामुळं झालेल्या दुखापतीमुळं तो थोडा लगडत होता.

आमच्या खाणाखुणावरून त्या तिबेटी मडळींना आम्ही कुठल्या दशेनं आलोत आणि कुणीकडे जायचंय हे कळलं आणि आमच्या मूर्ख धाडसामुळं ते अचबित झाले. त्यांनी आमचा नेहमीप्रमाणे मटण, चहा, ओटच्या वड्या यानी पाहुणचार केला. पालुकोला कसलं तरी मेणमलम पायाला लावण्यासाठी दिलं. अजूबाजूच्या घरातील सगळी मंडळी आम्हाला पाहयला आली. असे कुणी पाहुणे येणं ही अत्यंत आश्चर्याची, अघटित गोष्ट होती. सगळेजण खाली वाकवाकून, खुणा करून एकमेकाना समजून घेण्याचा प्रयत्न करीत होतो. आमचं वास्तव्य हा त्याना चर्चेसाठी नक्कीच फार दिवस पुरणारा विषय होता.

आम्ही जेव्हा त्या डोंगरी वस्तीचा निरोप घेतला तेव्हा आमच्या थैल्या शिध्यानं भरल्या होत्या. त्यात खरपूस भाजलेली अर्धी मेंढीसुद्धा होती ! या वेळपर्यंत आमच्याजवळचा शिधा एकाच थैलीत ठेवून, ती आलटून-पालटून खांद्यावर वाहात होतो; पण या पुढच्या प्रवासात नजर पोचणार नाही अशा खोल दरीत समजा त्या थैलीचा वाहक गडप झाला तर सगळ्याची पंचाईत होईल, हा धोका ओळखून आम्ही अन्न-पुरवठ्याचं सामान वाटप करून वेगवेगळ्या थैल्यांतून वाहू लागलो.

त्या दिवशी शेकोटीभोवती बसून किती वेळ कुणास ठाऊक; पण आम्ही आमच्या सध्याच्या परिस्थितीची, अजून किती जायचंय, याची चर्चा करत बसलो होतो. हळहळू संभाषण थंडावत गेलं आणि आजूबाजूच्या अक्राळ-विक्राळ पर्वतामधली जडशील भयानक शातता अंगावर येऊ लागली. मला स्वतःची आणि इतर सोबत्याची कीव येऊ लागली. मनात विचारांचा प्रचंड झगडा चालू होता. हजारो मैल हृदय विदीर्ण करणारं अंतर मागं टाकल्यावर शेवटचा टप्पा जीवघेणा ठरू नये या एका विचाराशी प्रचड झगडा द्यावा लागत होता. रात्रीच्या वेळी हा विचार खायला उठायचा. माझी खात्री आहे, इतराचीही परिस्थिती वेगळी नसणार ! दुसऱ्या दिवसाची सकाळ दिसली की, हे सगळे विचार मागं टाकून, शरीराची आणि मनाची साफसफाई करून पुढचा मार्ग आक्रमत असू. पूर्वी कधी नव्हे एवढी पुढं चालत रहाण्याची आच लागली होती. 'चला निघू या !' असं कुणी तरी म्हणताच पुढं जाण्याचं वेड जागं होऊन नव्या जोमानं वाटचाल सुरू व्हायची.

आमचा नियंत्रित आहार एकभुक्त राहून सुद्धा दोन आठवडेच पुरला. अशा उत्तुग पर्वताच्या चढणीमधे आणि तितकाच पायाचा थरकाप उडवणाऱ्या उतरणीच्या चालीसाठी हा आहार अत्यंत अपुरा होता तरी पण त्यातला शेवटचा कण असेपर्यंत आपण भुकबळी होणार नाही असा विश्वास वाटत होता. अनेक वेळा आम्ही अंधार पडायच्या वेळेला डोंगरमाथ्यावर अडकून पडत असू. सैबेरियात शिकलेला धडा इथं उपयोगी पडत असे. बर्फातच खणून गुहा करायची आणि त्यात बसून रात्र जागून काढायची !

या प्रवासात गिर्यारोहणाचे अनेक धडे स्वाध्याय-पद्धतीनं शिकायला मिळाले. मी पोलंडमधे पूर्वी तसं थोडंसं गिर्यारोहण शिकलो होतो; पण हिमालयातल्या गिर्यारोहणाला त्याचा काहीच उपयोग नव्हता. त्या वेळी आमच्याकडे खिळेदार बूट, मार्गदर्शक आणि इतर आधुनिक सोयी उपलब्ध होत्या. उन्हाळ्यातला एक करमणुकीचा कार्यक्रम म्हणून करत होतो. इथ आमच्याजवळ काय होतं ? जीर्ण

झालेल्या मोजड्या आणि अंगावर लक्तरलेली जुन्या कातड्यांची वल्कलं! इथं म्हणजे जीव तोडून हातांच्या नखाचा वापर करून एखादा चढ चढावा आणि वर गेल्यावर लक्षात यावं की पुढचा मार्ग एखाद्या सरळ उभ्या तुटलेल्या कड्यानं रोखला आहे! पुन्हा मांजरासारखं लटकून, हाता-पायांना आकडी येण्याची परिस्थिती असतानासुद्धा मागं फिरावं लागे आणि मग दुसरी वाट शोधण्यापासून तयारी!

या परिस्थितीत वेग अतिशय मंदावला होता. आमच्याजवळ गिर्यारोहणोपयोगी सामान काय होतं,तर चामड्याची वादी! आखूडपणामुळं तिचा फारसा उपयोग नव्हता. नंतर कुऱ्हाड हे सर्वांत उपयोगी आयुध, मोठा सुरा, तारखंडाची वळी आणि थोडेसे लाब खिळे. बस, एवढंच!

आम्ही एकांडे चढत असू; निश्चित रचनेनं. झारो वजनानं सगळ्यात हलका! तो पुढं असायचा. कुऱ्हाड वर खोचून भक्कमपणाचा अंदाज घ्यायचा. आमच्यासाठी वाट तयार करून वर जायचा. नंतर माझा नंबर. पाठोपाठ कोलो, स्मिथ आणि पालुको. आमच्यातल्या दोघा वयोवृद्धांना शक्यतो त्रास कमी होईल असा आमचा प्रयत्न असे; पण ते दोघे दाद देत नसत. निदान उतारावर तरी पुढं रहाण्याचा त्यांचा आग्रह असे.


एक गोष्ट विसरलो. आमच्याबरोबर काठ्याही होत्या. त्यांचा उपयोग वर्फानं झाकल्या गेलेल्या खाचखळग्यांची चाचपणी करण्यासाठी होत असे. झारो हा कुठल्याही गटात अव्वल गिर्यारोहक म्हणून सहज वावरू शकला असता. या कलेत त्यानं चांगलंच प्राविण्य मिळवलं होतं. डोक्यावर आडवे येणारे सुळके पार करण्यासाठी आम्ही एक क्लृप्ती लढवली होती. दोन बाजूंना गोळेदार आणि मध्ये बारीक साधारण डंबेलसारखा एक दगड बाळगला होता. त्याला तारखंड बाधायचा आणि वरच्या सुळक्यावर फेकायचा. केव्हा तरी तो वर कुठे तरी अडकायचा की मग कोलो त्याला लोंबकाळून त्याची ताकद अजमावायचा. मग झारो एखाद्या धाडसी वीरासारखा वर चढायला सुरुवात करायचा. तो चढत असताना आमचे प्राण कंठाशी आलेले असायचे. कारण जराशी चूक म्हणजे मृत्यूशी गाठ! वर चढल्यावर कधीकधी असं लक्षात यायचं की ज्याच्या आधारावर आमचा गळ अडकलेला असे तो इतका फुसका असायचा की ते पाहून जिवाचा थरकाप उडत असे!

एखाद्या उघाडीच्या दिवशी सूर्यकिरण परावर्तित होऊन तो उजेड डोळ्यांना सहन व्हायचा नाही. चमत्कारिक ताण पडायचा. एकीकडे कडक उन्हाची तिरीप आणि त्याच वेळी कडाक्याची थंडी! थोबाडाचं रक्षण करण्यासाठी आम्ही कातड्याच्या माकडटोप्या तयार केल्या. डोळ्यासाठी बारीक फटी ठेवल्या. त्या टोप्या म्हणजे एक नमुनाच होत्या! उगाच आपलं तोंड झाकलं जाईल एवढाच त्यांचा आकार होता; पण आपलं काम मात्र त्यानी चोख बजावलं. एक वेगळाच त्रास त्यातून व्हायचा. श्वासोच्छ्वासाबरोबर बाहेर येणारा दमटपणा थंडीमुळं पाणसर होऊन ओघाळायचा आणि पुन्हा बाहेरच्या थंडीमुळंच नाका-तोंडाभोवती गोठून कडक व्हायचा. तो असा जमलेला बर्फ थोबाडावरचा काढायचा म्हणजे एक कामच होऊन बसलं. हातावर पंजोड्या होत्या. हात शक्यतो जाकिटाखाली नाही तर काखेत झाकून ठेवायचा प्रयत्न करायचो; पण कडा चढायची वेळ आली की त्या काकडलेल्या बोटांवरची पंजोडी केवळ वादीमुळं टिकून रहायची.

तोंडांवरचे चित्रविचित्र बुरखे, त्यांच्या लोंबणाऱ्या कनाती यामुळे कान झाकले जाऊन एकमेकांच बोलणंही नीट ऐकायला यायचं नाही.

चिडचिड वाढू लागली. मरणप्राय थकवा आला होता. भुकेनं जीव कासावीस व्हायचा. माझ्या सगळ्या नाड्या तर एखाद्या पियानोच्या तारांसारख्या टणक झाल्या होत्या!

(क्रमशः)



पुस्तके

# आणखी गडकरी

## भाष्य मात्र नेहमीचेच

नाटककार राम गणेश गडकरी यांनी आपल्या चौतीस वर्षांच्या आयुष्यात निर्माण केलेल्या कलाकृती उत्कृष्ट मराठीचा नमुना म्हणून जतन करण्यासारख्या आहेत. त्यांच्या निधनानंतर त्याच्या व्यक्तिगत जीवनाचा कलाकृतीशी असलेला संबंध शोधण्याचा प्रयत्न अनेकानी केला, त्यावर शोधप्रबंधही लिहिण्यात आले.

कै. गडकऱ्याच्या अप्रकाशित साहित्याचा संग्रह कै. प्र. के. अत्रेनी प्रसिद्ध केला; पण त्यानंतरही गडकऱ्याचे आणखी काही अप्रकाशित साहित्य डॉ. मधुकर अष्टीकर याच्या हाती आले आणि त्याचे 'आणखी गडकरी' या नावाचे पुस्तकही प्रसिद्ध करण्यात आले. कै. गडकऱ्याचे चुलते श्री. रा. वि. गडकरी याच्याकडून हे साहित्य प्राप्त झाले आहे.

डॉ. अष्टीकर यांनी 'प्रासंगिक' या सदराखाली लिहिलेल्या मजकुरात कै. गडकऱ्यांवर आजवर लिहिलेल्या साहित्याचा एका वाक्यात परामर्श घेतला आहे. ते वाक्य असे— 'गडकऱ्याच्या मृत्यूनंतर ते एकदम मोठे झाले. त्याचे वाङ्मय शाळा-कॉलेजातून अभ्यासिले जाऊ लागले, तेव्हा त्याच्या जीवनाबद्दल आणि वाङ्मयाबद्दल काही लिहिल्याने आपल्यालाही पुण्य आणि द्रव्य मिळविणे शक्य आहे हे लक्षात येताच गडकऱ्याबद्दल 'पुण्याहवाचन' व लेखन सुरू झाले. शाळकरी शैलीत, रूढ समीक्षेच्या चौकटीत, परीक्षापद्धतीचे मुद्दे ध्यानी ठेवून वाङ्मयीन टीका लिहिल्या गेल्या.' एवढे वाचल्यावर या पुस्तकात वरीलपेक्षा काही वेगळे वाचायला मिळेल असे कुणाला वाटेल हे खरे; पण त्याच्या पदरी निराशाच येईल. या प्रासंगिकात डॉ. अष्टीकरांनी कुणा एका 'अनामिक' समीक्षकाचा हवाला देऊन त्यावर सरधोपट टीका केली आहे. त्या समीक्षकाचे नाव त्यांनी का दिले नाही याचे कारणही ते देत नाहीत! जी समीक्षा त्यांना कॉकटेली, दुर्बोध वाटते तिचे किते त्यांनी आपल्याही लेखनात गिरविले आहेत. त्यामुळे अर्थ वैफल्यकारीसारखे शब्द आणि शब्दवंबाळपणे गडकऱ्यांचे साहित्यगुण दाखविण्याची हातोटी त्यांच्याजवळ दिसून येते.

या पुस्तकात 'आणखी गडकरी' म्हणून काही कविता, पत्रे व त्यांच्या वह्यांतील काही पाने यांचा समावेश आहे.

गडकरी मास्तराचे वैवाहिक जीवन सुखी नव्हते या समीक्षकाच्या शोधाला उत्तर म्हणून या पुस्तकात 'मथळा नसलेली कविता' प्रसिद्ध करण्यात आली आहे. थोडक्यात समीक्षकाच्या समीक्षेला उत्तर म्हणून हे 'नवे' साहित्य प्रकाशित करीत आहोत असा सूर डॉ. अष्टीकरानी 'भाष्य' करताना ठेवला आहे.

या कवितेत म्हटले आहे—

'उचंबळूनी हृदय–सिंधु हा खळबळला
या क्षणी।
सुदरि, प्राणेश्वरी ये झणि॥
दूर किती तव वसति माझिया नशिबी
आली दरी।
देवते दयाच मजवरि करी॥'

गडकऱ्याच्या लेखनावर भाष्य करताना म्हटले आहे की, त्याच्या सर्वच लिखाणामागची प्रेरणा 'स्पर्धाळू' आहे. न्यूनगंडाची जाणीव सतत तिला डाचते आहे. अनुकरणाने मात करण्याची तीव्र इच्छा जाणवते आहे.

कै. गडकऱ्यानी 'पुण्यप्रभाव' नाटक किर्लोस्कर कंपनीला न देता शिवराज नाटक मंडळीला दिले. त्या वेळी झालेला पत्रव्यवहार पुस्तकात समाविष्ट आहे. मित्राला पत्र लिहीत असतानाच एकदम कविता स्फुरल्याने त्या पत्राच्या मागील बाजूसच गोविंदाग्रजांनी लिहिलेली कविता येथे देण्यात आली आहे.

'कोण असा जादूगार
रक्षितसे त्या अनिवार
उघड्यावरती टाकुनिया
राखी ही फुलती दुनिया'

अशी ही कविता त्यांच्या काव्यदर्शनात मोलाची भर टाकणारी आहे.

गडकऱ्यांच्या वह्यांतून संवाद लिहिलेले दिसतात, त्याचा उपयोग ते नाटकातून करीत. त्याचीही काही उदाहरणे संग्रहात समाविष्ट आहेत.

एकूण या पुस्तकातील 'अप्रकाशित गडकरी' साहित्यात काही भर टाकणारा आहे; पण त्यावरील भाष्य मात्र नेहमीच्याच वळणाने केलेले आहे! ◻

**आणखी गडकरी**
संकलन व भाष्य : डॉ. मधुकर अष्टीकर
प्रकाशक : विदर्भ साहित्य संघ, नागपूर,
पृष्ठे : ५५, मूल्य : १० रु.

# क्षितिजा : गंधवेडी कविता

'क्षितिजा' हा श्री. मधु जामकर यांचा पहिलवहिला काव्यसंग्रह. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदान योजनेखाली या संग्रहाच्या प्रकाशनार्थ अनुदान प्राप्त झाले आहे.

आपल्या काव्यप्रवृत्तीबद्दल श्री. जामकर यानी संग्रहाच्या सुरुवातीलाच म्हटले आहे की,

'स्मृतिगंध पाकळ्यांचा,
क्षितिजा पल्याड गेला। मी पाहतो किनारी
आकाश चादण्याचे।
पाऊल पल्लवीचे,
जाते खुणा मिटोनी।
ही धून गंधवेडी,
अवशेष जीवनाचे।'

ही गंधवेडी धून या संग्रहात ऐकू येते.

गझल, अभंग, वृत्तात्मक कविताप्रकार हे या कविताचे वैशिष्ट्य, क्वचित एखादा शब्दपूर्ण मुक्तछंदही दिसतो; पण कवितेचा स्थायीभाव हा अभंग, गझल या प्रकारचा. त्यामुळे काही ठिकाणी ही कविता नवेपण घेऊन येते, तर काही ठिकाणी पहिलेपणाच्या खुणा घेऊन येते.

'मी कोण आहे सांगू कुणाला
मी कोणी नाही उमजू शकेना'

असा स्वत:चाच शोध घेणारा हा कवि जगण्याची बळस्थाने शोधत राहतो. मग 'जगायचे म्हणून जगत आहे अनेक मरणामरणातून। चालायचे म्हणून चालत आहे अनेक वळणावळणातून' असे शब्द भावरूपाला येतात; पण पुन्हा जीवनातल्य

लुटुपुटीच्या खेळांची याद कवितेतून आकाराला येते.

'तुझी मुकी मुकी सत्य
थोडे दूर दूर जाणे
चालताना वाटेवरी
उभे दोन दिवाणे'

किंवा,

'स्मृतित बसतो कोटीत
जेव्हा धुक्यात येती इजा बहाणे।
डोळयामधला चंद्र टिपावा
लख्ख जयाचे नवे चांदणे'

अशा शब्दांतून ही कविता नवनव्या वाटांच्या शोधात राहते.

पण त्याचबरोबर

'इतके दिवस घोकून घोकून
शब्द कुणाचे कळत नाही।
इतके दिवस चालून चालून
धुक्यात वाट वळत नाही'

यासारखी शब्द बेबाळ कविताही लिहिण्याचा सोस कवीला आहे.

देहाचा पाळणा
जगाच्या बाजारी
जगण्याची दोरी ताणलेली

किंवा

लटक्या प्रपंची
दैव पाखडले
सार्थक जाहले जन्मोजन्मी

यासारख्या आर्त कविता आहेत. जीवनाचा अर्थ शोधणारा हा कवी उदासपणाबरोबरच आनंदाचे कवडसे, शब्दबद्ध करतो आहे! या पहिल्याच संग्रहाबद्दल श्री. जामकर याना शुभेच्छा! ¤

क्षितिजा (काव्यसंग्रह)
मधु जामकर
पृष्ठे : ६३, मूल्य : १० रुपये.

---

फिनिक्स निवड

# My Own Boswell

(Memoirs) M. Hidayatullah
Arnold–Heinemann
Pages 304, Rs. 85/—.

हे सेक्युलर मुस्लिम त्याच्या पुस्तकाना काय छान नाव देतात! छगलाचं 'रोझेस इन् डिसेंबर' आणि आता या अल्लाचं (सॉरी तुल्लाचं) बॉसवेल!

जगात सर्वात चरित्र उत्तम कोणते? तर सॅम्युएल जॉन्सन (इ.स. १७०९-१७८४) याचे. ते एक तोड नसलेले डायरी लिहिणारे होते. सॅम्युएल जॉन्सन हे 'Dictionary of The English Language' वाले. त्यांनी शेक्सपिअरचे साहित्यसुद्धा सपादित केले होते. इ. स. १७६३ मध्ये ते बॉसवेलला भेटले. (बॉसवेल हे स्कॉटलंडमध्ये वकिलीचा व्यवसाय करीत असत.) त्यानंतर ते जॉन्सनच्या कंपूत कायमसाठी राहिले. व्हर्जिनिया वुल्फ ब्लूम्सबेरी ग्रुपमध्ये होती ना, तसे. या ब्लूम्सबेरी साहित्यिकासारखा कंपू पृथ्वीच्या पाठीवर कुठेच झाला नाही! त्यात व्हर्जिनियाचा नवरा लिओनार्ड, लिटन स्ट्रॅची, इ. एम्. फॉर्स्टर, डंकन ग्रँट केनेस आणि बर्ट्रांड रसेल हे सर्व होते. कला आणि दोस्ती या विषयाकडे अगदी सवेदनाशीलपणाने बघणारा म्हणजे ब्लूम्सबेरी ग्रुप. असं काही बॉसवेल कंपूबद्दल ऐकिवात नाही. बॉसवेलनी स्वतः १८ खंडांत हे आत्मचरित्रात्मक 'प्रायव्हेट पेपर्स ऑफ जेम्स बॉसवेल फ्रॉम मालाहाईड कॅसल' पुस्तक प्रसिद्ध केले होते.

एखादा माणूस अष्टपैलू असला, किंवा एखाद्या माणसाने आयुष्यात विविध प्रकारचे अनुभव घेतले असतील, किंवा त्याने पुष्कळशा कला अंगीकारल्या असतील, अशा माणसाला आपण इंग्रजीमध्ये 'मॅन ऑफ मेनी पार्टस्' असे सबोधतो. हिदायतुल्लाचं आयुष्य असेच गेले. कित्येक क्षेत्रात त्यानी प्रवेश केला. ते एक नंबरचे वकील, प्रोफेसर, अॅडव्होकेट जनरल, चीफ जस्टिस, भारताचे काहीं दिवसांसाठी प्रेसिडेंट (आणि आता व्हाइस प्रेसिडेंट!), चॅन्सलर अशा विविध भूमिकांतून त्यांनी काम केलं.

आमच्याकडील एक वकील–वाचक बी. आर. रानडे यांनी हिदायतुल्लाचे हे पुस्तक वाचून त्याना एक पत्र लिहिले होते.. रानडे यांना उत्तर पाठवून श्री. तुल्लांनी त्याच्याविषयी असे लिहिले होते की Nobody can be uniformly good!

तसेच त्यांचे हे पुस्तक 'युनिफॉर्मली' वाचनीय नाही. कित्येक विषयावर या पुस्तकात माहिती असूनही 'अनेक्डोटस्' (anecdotes) चा इथे 'ओव्हरकिल' झाला आहे! म्हातारपणी 'आठवणी' हा एकच दिलासा असतो का?

राज्यसभेत सभा टाकीन असे सागणारे हिदायतुल्ला अति सौम्य, शिस्तीचे भोक्ते व भ्रष्टाचारापासून नेहमीच चार हात लाब राहणारे आहेत!

छगला याचे 'गुलाब' १९७४ मध्ये प्रसिद्ध झाले. हे दोघेही कायदा कानूनामधले. दोघेही मुस्लिम. दोघेही आपापल्या परीने अष्टपैलू, दोघेही सेक्युलर. असे अनेक प्रकारचे साम्य या दोघात असताना त्याना लिहिलेल्या पुस्तकाची तुलना केल्याशिवाय रहावत नाही.

प्रसगांची वर्णने अर्थात्' छगला याच्या पुस्तकातसुद्धा आहेत; पण तिथे अनेक प्रसंगांच्या वर्णनांची कोंबाकोबी झालेली वाटत नाही. छगलानी एक एक प्रसंग सुटसुटीत व आटोपशीर मांडून ते रंगवले आहेत; तर श्री. तुल्लाची वर्णने मॅटर ऑफ फॅक्ट व सत्याची अति चाड असणारी वाटतात. छगलांच्या पुस्तकात पत्रांचा सुळसुळाट आहे. 'नेहरू रोट टू मी...' वगैरे वगैरे प्रकार तिथे फार आहेत. हा सुळसुळाट सध्याच्या व्हाइस प्रेसिडेंटच्या पुस्तकात नाही. छगलाच्या पुस्तकातील विनोदाची झालर उपराष्ट्राध्यक्षाच्या पुस्तकाला नाही. छगलांच्या गुलाबाच्या पुस्तकातील फोटो C+ आहेत, तर श्री. तुल्लाच्या पुस्तकातील C– आहेत!

'रबिंग शोल्डर्स वुइय ग्रेट मेन' हे छगलांच्या पुस्तकात अधिक आहे, तर हिदायतुल्लाचं थोडं 'अनुॲश्युमिंग' आहे. वाचनीयता छगलांच्या पुस्तकात A+ आहे तर हिदायतुल्लाच्या पुस्तकात A– नसून B+ आहे. ही निव्वळ मास्तरकी नाही; पण आमच्या ग्रंथालयातील वाचकांच्या मागणीवरून व त्याच्या प्रतिक्रियेवरून बांधलेले मत आहे.

श्री. हिदायतुल्ला हे ३५ दिवसासाठी औट घटकेचे राष्ट्राध्यक्ष झाले. त्या वेळी ते ऑस्ट्रेलियाला जायला निघाले होते; पण चक्कर येण्याच्या व्याधीने ते ग्रस्त झाले होते म्हणून ते गेले नाहीत. म्हणून ते राष्ट्राध्यक्ष झाले असे ते लिहितात. Thanks to चक्कर!

हिदायतुल्ला हे २५ फेब्रुवारी १९६८ रोजी भारताचे 'चीफ जस्टिस' झाले. त्या वेळी बऱ्याच नियतकालिकांनी त्यांच्या जीवनाचा परिचय करून दिला होता. तेव्हा 'द हिंदू'नी

त्यांच्यावर एक छान लेख लिहिला होता. त्या वेळेला त्यांना लाल शाईत एक पत्र आले. त्यात लिहिले होते की, पुढच्या महिन्यात म्हणजे मार्च १९६८ च्या अखेर त्याचा खून केला जाईल! पत्र निनावी होते. श्री. तुल्लानी ते फाडून टाकले. हे एखाद्या रिकामटेकड्याचे काम असेल असे त्यांना वाटले.

पण पुढे सुप्रीम कोर्टात खरोखर जॉन कावस–नादिया झाले! ता. १३ मार्च १९६८ रोजी महात्माजींच्या नावासारखे नाव धारण करणारा कुणी एक माथेफिरू मनमोहनदास सुप्रीम कोर्टात जस्टीस ग्रोव्हर व हिदायतुल्लावर चाकू घेऊन तुटून पडला! हल्लेखोराचा मुख्य रोख ग्रोव्हरवर होता. हिदायतुल्लांनी त्याचा हात धरून ठेवून चाकूची दिशा कारपेटकडे वळवून चाकू कारपेटमध्ये अडकवून ठेवला! हे वर्णनही हिदायतुल्ला जजमेन्टसारखे करतात! ते लिहितात की,चाकू कारपेटमध्ये 'imprison-ed'झाला! म्हणजे बघा. ज्युरिस्प्रुडन्स किती भिनली आहे या माणसाच्या रक्तात! इथे मधाळ आणि रसाळ वर्णन करण्यासाठी भरपूर वाव होता.

परवा अरुण शौरीच्या विषयावर जे वादळ झालं होतं, त्यातही हिदायतुल्ला फ्लाइंग कलर्स घेऊन बाहेर आले नाहीत. काटेकोरपणा, शिस्त, प्रामाणिकपणा वगैरे बरेच गुण या माणसात भरपूर आहेत हे,या पुस्तकावरून सिद्ध होते; पण अलीकडे हे(च) गुण कुणाला फारसे पुढे येऊ देत नाहीत. आधीच खुद्द राष्ट्राध्यक्षाला, रबरस्टँप म्हणतात, तर मग उपराष्ट्राध्यक्षाला स्टँप-पॅड म्हणावे काय? हिदायतुल्लांच्या डिग्र्या इतक्या आहेत व ते इतक्या संस्थाचे सभासद होते की, त्यांच्या वजनाखालीच ते दबून गेलेले दिसतात.

पण या सर्वांतून एकच एक माणूस सारखे डोकेवर काढीत असतो. रिफाइन्ड, प्रामाणिक, साधा, शिस्तबद्ध, वक्तशीर, संकट आल्यास न डगमगणारा, सदा औचित्याची चाड असणारा, परिपक्व सेक्युलर, टु गुड टु बी ट्रु वगैरे अनेक पैलू दाखवणारा!

आणि म्हणूनच त्यानी वर उल्लेखिलेल्या श्री. बी. आर. रानडे यांच्या पत्राला उत्तर देताना लेटरहेड न वापरता एक साधा कागद वापरला आहे. ही त्याच्या साधेपणाची पावती! ती झेरॉक्स केलेली तुम्हाला 'फिनिक्स' च्या सुधारित आवृत्तीत सापडेल. कारण ती श्री. रानडे याच्या सौजन्याने 'बॉसवेल'मधे लावली आहे. परत सांगतो, पुस्तकाचे नाव मात्र छान आहे!

—जे. एन. पोंडा

रंगभूमी । सदानंद बोरसे

# मित्राची गोष्ट

'सध्याच्या यांत्रिकीकरण आणि आधुनिकीकरण झालेल्या अवाढव्य शहरांना कॉंक्रीटचे आणि माणसांचे जंगल म्हणतात; पण हे तितकेसे बरोबर नाही. खरे म्हणजे ही शहरे म्हणजे जंगले नसून मोठमोठी प्राणिसंग्रहालये आहेत! 'जंगल' हा प्रकार संपूर्णतः नैसर्गिक आणि त्यामुळेच संतुलित असल्याने त्यात राहणारे सर्व प्राणी त्यांच्या शारीरिक आणि मानसिक अवस्थेच्या दृष्टीने त्यांच्या निसर्गदत्त आरोग्यसंपन्न स्थितीत असतात. उलट या प्राण्यांना संग्रहालयाच्या कृत्रिम वातावरणात आणल्यानंतरच त्याची ही शारीरिक आणि मानसिक 'normality' बदलून त्याची जागा विकृतीने घेतली जाते. माणसांच्या बाबतीतही हे खरे आहे. निसर्गापासून दूर जाऊन जितकी कृत्रिमता तो स्वतःवर लादून घेईल, तितकी त्याच्यात विकृती बळावत जाणार!' डेस्मॉड मॉरिस या विख्यात मानसशास्त्रज्ञाचे हे विचार आहेत. आपले म्हणणे सिद्ध करण्यासाठी त्याने प्राण्याना वेगवेगळ्या विशिष्ट वातावरणामध्ये ठेवून त्याच्यावर निरनिराळे प्रयोग केले. या प्राण्यामध्ये मुख्यतः लैंगिक विकृती निर्माण झाल्या.

माणसामध्ये निर्माण होणाऱ्या लैंगिक विकृतीची कारणमीमासा करताना आणखीही एक कारण दिले जाते. ते म्हणजे मुळातच असलेला शारीरिक वासनेचा अतिरेक किंवा वैचित्र्याबद्दलची आवड / आकर्षण / जिज्ञासा.

विजय तेंडुलकरानी लिहिलेल्या 'मित्राची गोष्ट' या नवीन नाटकाचा विचार करताना या आधी उल्लेख केलेल्या कारणांचा संदर्भ ध्यानात घ्यायला हवा; कारण 'मित्राची गोष्ट' हे तेंडुलकराचे नाटक अशाच एका लैंगिक विकृतीवर–स्त्रियांमधील समलिंगी संभोग (lesbinism)–आधारित आहे.

नुसता ऐकायलाही हा विषय आपल्याकडे ठासून भरलेल्या दारूच्या कोठाराइतका प्रक्षोभक आहे. अर्थात नाटक 'फक्त प्रौढांसाठी' असणार, हे उघडच आहे; तरीही नाटकापूर्वी 'प्रौढ प्रेक्षकहो,' अशी हाळी देऊन सगळ्यांना नीट बजावण्यात आले, 'हे नाटक गुदगुल्या करणारे नसून गंभीर आहे. तुम्ही 'तसलं' काही पाहायला आला असाल; तर निराशा होईल!' वगैरे वगैरे. हल्ली ही एक नाटकाआधीच प्रेक्षकाला सल्ला देण्याची वा 'आम्ही असं–असं दाखवणार आहोत, बरं का.' (तेव्हा ते तसं नसलं तरी तुम्हं असल्याचं वाटून घ्यायचं.) असा दम भरायची एक टूमच निघाली आहे. तर तसेच करून भूमिकानिर्मित 'मित्राची गोष्ट' ला सुरुवात होते.

ही मित्राची गोष्ट आहे–म्हणजे हरीकात मराठे ऊर्फ बापूच्या (मंगेश कुलकर्णी) मित्राची–किंवा मैत्रिणीची अर्थात सुमित्राची–सुमित्रा देवची (रोहिणी हट्टंगडी) गोष्ट आहे. अंगापिंडाने थोराड आणि वागायला अत्यंत पुरुषी अशी सुमित्रा देव. आपल्यात काही तरी वेगळं आहे, याची जाणीव तिला फार पूर्वीपासून होती. आपण स्त्री असूनही पुरुषाबद्दल आपल्याला आकर्षण वाटत नाही, पुरुषाबरोबरच्या शरीरसंबंधांच्या बाबतीत आपण frigid आहोत, हे तिला अनुभवांती लक्षात आले होते. त्यामुळे तिने स्वत.चे ठरलेले लग्न मोडले, एकदा आत्महत्येचा प्रयत्नही केला; पण पुढे तिच्या आणखी एक गोष्ट लक्षात आली,–तिला दुसऱ्या एका स्त्रीबद्दल-नमा देशमुखबद्दल (उज्ज्वला जोग) प्रेम वाटते, शारीरिक आकर्षण वाटते–जसे एखाद्या पुरुषाला नमाबद्दल वाटावे तसे. हे लक्षात आल्यानतर सुमित्राने नमाला मिळवण्याचे, उपभोगण्याचे पद्धतशीर प्रयत्न सुरू केले. नमाच्या प्रियकराचा-मनोहर दळवीचा-(सतीश पुळेकर) ती आत्यतिक दुस्वास करू लागली, त्याच्याबद्दल खोटी पत्रे लिहून तिने त्याला नमापासून तोडले. नमाला

बापूच्या खोलीवर नेऊन तिला एखादी वस्तू मानून तिच्या अवस्थेचा, भावनांचा काहीही विचार न करता तिचा उपभोग घेणे यात सुमित्राला विलक्षण सुख मिळत होते. बापूने सुमित्राला समजावण्याचा खूप प्रयत्न केला, स्वत:ची खोली देणे बंद केले; पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. अखेर या प्रकरणाचा प्रचंड बोभाटा झाल्यानंतर नमा कायमची कलकत्याला निघून गेली! सुमित्राने तिथेही तिला गाठण्याचा प्रयत्न केला; पण ते जमले नाही. हताश होऊन ती परतली; तेव्हा तिचा उरलासुरला मित्र बापू–त्यानेही तिला झिडकारून लावले. या धक्क्याने सुमित्रा पार कोलमडली, प्रचंड दारू पिऊ लागली आणि अखेर एक दिवस तिने आत्महत्या केली. अशी ही थोडक्यात मित्राची म्हणजे सु–मित्राची गोष्ट!

नाटकाच्या संहितेबद्दल अधिक लिहिण्यापूर्वी प्रत्यक्ष प्रयोगाबद्दल आणि प्रयोगाच्या अनुषंगाने दिसणाऱ्या संहितेच्या वैशिष्टयांबद्दल आधी लिहितो. विजय तेंडुलकरांच्या अन्य नाटकांप्रमाणेच हे नाटकही प्रयोगक्षमतेच्या दृष्टीने बेतलेले आहेच. नाटकाची सुरुवात होता क्षणीच मला त्यांच्याच 'अशी पाखरे येती'ची आठवण झाली. नाटकात घडणाऱ्या प्रसंगांमध्ये भाग घेणारा, कथानक पुढे सरकवण्यासाठी मधूनच त्या प्रसंगांमधून बाहेर येऊन कथाकथन करणारा निवेदक-कम-सूत्रधार अशी योजना 'अशी पाखरे येती' प्रमाणेच 'मित्राची गोष्ट' मध्येही आहे. त्याच्या कथाकथनाचा धागा मदतीला घेऊन एखाद्या पटकथेप्रमाणे तेंडुलकरांनी नाटक लिहिले आहे. नाटकाचे दिग्दर्शक आहेत विनय आपटे. नेपथ्यकार आहेत रघुवीर तळाशीकर आणि प्रकाशयोजना आहे दिलीप कोल्हटकराची. या तिघांच्या संयुक्त कामगिरीतून रंगमंचावर बापूची खोली, टेकडीचा माथा, कॉलेजचा कट्टा, कँटीन, लायब्ररी, सैनिकी अधिकाऱ्यांचा बार, नाटकातील नाटकाचा रंगमंच इत्यादी अनेक ठिकाणे नीट लक्षात येण्याइतकी वेगवेगळी उभी राहतात. (अपवाद फक्त अभिनेत्यांकडून काही वेळेस होणाऱ्या चुकाचा, उदाहरणार्थ–कॉलेजच्या लायब्ररीत बसण्यासाठी खुर्च्या असतात याचे भान न ठेवता खुर्च्या म्हणून ठेवलेल्या स्टुलावरून त्या खुर्चीच्या पाठीची व असल्यास हाताची पर्वा न करता सतीश पुळेकर बेधडक पाय फिरवतात; पण अशी उदाहरणे म्हणजे किरकोळ अपवाद). हाच वेगळेपणा तो तो प्रसंग घडत असलेल्या वेळेबाबतही राखला गेला आहे. शक्य त्या ठिकाणी पात्रांच्या वेशभूषेतील आणि रंगभूषेतील बदलानेही दाखविला गेला आहे. या सगळयाला वाव देण्यासाठी आवश्यक ती कामगिरीपूर्ण रचना अर्थातच विजय तेंडुलकरांनी उपलब्ध करून दिलेली आहेच. प्रेक्षकाचा हमखास प्रतिसाद घेणारे खास तेंडुलकरी संवादही पेरलेले आहेतच. प्रामुख्याने उल्लेख करायला हवा तो नाटकातील अभिनेत्यांचा. पहिले नाव येते ते अर्थातच सुमित्रा देव झालेल्या रोहिणी हट्टंगडीचे. सर्वार्थाने वेगळी आणि (बहुधा) मराठी रंगमंचावर प्रथम सादर होणारी ही व्यक्तिरेखा रंगवायला चांगलीच अवघड. हे आव्हान रोहिणी हट्टंगडींनी समर्थपणे पेलले. दुसरी प्रमुख व्यक्तिरेखा सूत्रधार कम निवेदक झालेल्या म्हणजे श्रीकांत मराठे झालेल्या मंगेश कुलकर्णीची. सुमित्राला सहजगत्या स्वत:वर प्रभुत्व गाजवू देणारा, सतत सुमित्राबरोबरची मैत्री आणि स्वत:ला न पटणारे तिचे वागणे या झगडयात अडकलेला. शक्यतो स्वत:ला तोशीस लागू न देता सुमित्राची पाठराखण करण्याचा प्रयत्न करणारा श्रीकांत मंगेश कुलकर्णींनी योग्य उभा केला; पण त्या व्यक्तिरेखेच्या अतिभाबडेपणामुळे येणारा तोच तोचपणा कंटाळवाणा होऊ लागतो. शिवाय पुढे नाटकातही काही घडेनासे होऊ लागल्यानंतर तर हा कंटाळवाणेपणा चढत्या भाजणीने वाढत जातो. हा दोष अर्थात मंगेश कुलकर्णीचा नाही, आपल्या अभिनयात शक्य तितकी विविधता आणून हा तोचतोचपणा कमी करण्याचा ते प्रयत्न करतात; पण मुळातच कच्च्या पायाचा हा डोलारा फारसा तग धरू शकत नाही. तिसरे पात्र आहे श्रीकांतच्या मित्राचे–पाडेचे. हे काम दस्तुरखुद्द विनय आपटयांनीच केले आहे. स्वत: उनाड आणि टवाळ असूनही सुमित्रामध्ये प्रथम प्रचंड गुतून पडलेला, ती lesbian आहे हे कळल्यानंतर उध्वस्त होऊन सैन्यात भरती होऊन युद्धावर निघून जाणारा आणि तिकडून परतल्यानतर सुमित्राबद्दल संपूर्ण अलिप्तच नाही तर जाणीवपूर्वक, हेटाळणीपूर्ण वागणारा पाडे विनय आपटयांनी उत्तम उभा केला. मुख्य म्हणजे हा पांडे अनया पालेकरी शाळेतील शैलीत संवाद न म्हणता व्यवस्थित पाडेसारखाच बोलत होता. या तिघाही अभिनेत्यांच्या तुलनेत सतीश पुळेकर आणि उज्ज्वला जोग मात्र फारच कमी पडले. सतीश पुळेकरांचा मन्या दळवी हिंदी चित्रपटातील नायकाच्या स्टायली मारणारा 'हा: हा: हा:' खलनायक वाटत होता; तर उज्ज्वला जोग यांनी सुंदर दिसणे आणि अधूनमधून नखे कुरतडण्यापलिकडे फारसे कष्ट घेतले नाहीत एकूण या सर्व गोष्टी विचारात घेता नाटकाचा प्रयोग तिसऱ्या अंकात भयंकर कंटाळवाणा होऊनही एकदा बघणेबल होण्याइतपत दर्जाचा होतो.

प्रयोगाबद्दलची ही चर्चा थांबवून आता नाटकाच्या संहितेकडे वळतो. विषयातील प्रक्षोभकतेनंतरही नाटकानंतर अपेक्षित वादळ न उठल्याने कदाचित तेंडुलकर नाराज झाले असतील; पण वेगळया विषयाच्या निवडीबद्दल ते अभिनंदनास नक्कीच पात्र आहेत. दुर्दैवाने त्याचे हे अभिनंदन एवढयावरच थांबवावे लागते. या नाटकापूर्वीच तेंडुलकरांचे 'कमला' हे नाटक आले होते आणि त्याचा पुरेसा सविस्तर ऊहापोहही यापूर्वी 'माणूस'-मध्ये झाला होता. 'कमला' प्रमाणेच 'मित्राची गोष्ट'मध्येही एक वेगळा विषय निवडल्यानतर त्याला थोडेसे वरवर ओरखडून–खरे म्हणजे खरवडूनच तेंडुलकरांनी नाटक आणि त्यावरोबरच तो विषयही संपवून टाकला. या प्रकारामुळे 'कमला'मध्ये आशयाला बटबटीतपणा आला होता; तर 'मित्राची गोष्ट'मध्ये हा आशय अत्यंत उथळ झाला आहे. आपल्या माध्यमप्रभुत्वामुळे कारागिरीला अनुसरून तेंडुलकरानी आशयाच्या या उथळपणासाठी स्वत:ला एक पळवाट ठेवलेली आहेच. निवेदक हा मानसशास्त्रज्ञ नाही, त्याला मानसशास्त्राची तोंडओळखही नाही. (बी. ए.ला सुद्धा त्याचे विषय पॉलिटिक्स, इकॉनॉमिक्स आणि हिस्टरी.) तेव्हा तो संपूर्ण नाटक घडलेल्या हकिगतीच्या इतिवृत्ताप्रमाणेच सागणार; तो सुमित्राचे मनोविश्लेषण वगैरे करून तिच्या विकृतीची कारणमीमांसा कशी करू शकेल? पण त्यामुळे संपूर्ण नाटक हे lesbinism या समस्येभोवती न फिरता बापू आणि सुमित्राची मैत्री, प्रेमात येणारे अडथळे आणि ते पार करण्यासाठी प्रेमिकाची चाललेली धडपड याभोवती फिरते. संपूर्ण कथानकात सुमित्राच्या जागी एखादा सौमित्र टाकला असता; तर संदर्भ बदलले असते, हे मला मान्य आहे; पण केवळ सुमित्रा आणि नमाचे सबध दाखविल्याने नाटक इतिवृत्ताच्या पातळीपलीकडे पोहचत नाही. शिवाय थोडेसे समुद्रापलीकडील

ग्राचन असलेल्या माणसाला lesbinism असा प्रकार असतो हे ठाऊक असते. त्याचेच एक उदाहरण फक्त नाटकातील इतिवृत्तातून प्रेक्षकाला पुन्हा सांगण्याने काय साध्य होणार ? साहजिकच 'मित्राची गोष्ट' हे समस्या-नाट्य न बनता केवळ घटना-नाट्य बनते; त्यामुळे जेव्हा त्यातील थोड्याफार उत्कंठावर्धक घटना संपतात, तेव्हा त्याच्यातील रसही संपून जातो आणि नाटक विलक्षण कंटाळवाणे बनते. नाटक पाहिल्यानंतर ते विजय तेंडुलकराचे म्हणून लक्षात न राहता रोहिणी हट्टंगडीचे म्हणून लक्षात राहते ! तेंडुलकरांनी प्रमुख विषय म्हणून दाखवलेला lesbinism काहीसा मागे पडतो आणि रोहिणी हट्टंगडीचा अभिनय भाव खाऊन जातो. lesbinism ही त्या अभिनयाचा एक भाग म्हणून उभा राहतो. मानसशास्त्रीयतेबाबत नाटकात शोधलेल्या पळवाटेचा मी यापूर्वी उल्लेख केलाच. संपूर्ण नाटकातच घेतलेल्या या वरवर खरवडलेपणामुळे नाटकातील पात्र जेव्हा 'ही विकृती म्हणावी की माणसांचाच एक प्रकार?' असा संभ्रम व्यक्त करते; तेव्हा हा सभ्रम खरा न वाटता खऱ्या मुद्द्याला बगल देऊन नकळत टाळण्याचा प्रयत्न वाटतो. नाटकाच्या शेवटच्या काही भागात बापूला सुमित्राचा राग येतो, का तर ती नमाकडे माणूस—एक जिवंत व्यक्ती म्हणून न पाहता एक स्वतःच्या उपयोगाची वस्तू म्हणून पाहत होती. बापूद्वारे माणसाच्या भावनाबद्दल, जिवंतपणाबद्दल व्यक्त केलेला हा आदर आणि हे जितेपण झिडकारणाऱ्या, त्याला अवमानित करणाऱ्या विकृतीबद्दल व्यक्त केलेला हा राग पाहिला की वाटते, हे अतिशय वरवरचे पाहणारा बापू सामान्य कुवतीचा असेल; पण तेंडुलकरांमधील प्रतिभावंताला याहून खोल डोकावून सुमित्राच्या भावनांचा, या जिवंत विकृतीच्या मुळांचा वेध घेण्याची गरज भासली नाही का ? या विकृतीच्या पारंव्या म्हणून सुमित्राचे घडीघडी बदलणारे रंग आणि विस्तार म्हणून तिचे व नमाचे संबंध एवढे दाखवण्यावरच त्यांनी समाधान का मानावे ? स्वतःचाच शोध घेण्याच्या प्रयत्नात असलेली सुमित्रा जेव्हा जेव्हा तेंडुलकर रंगवतात—आपल्या चमत्कारिकपणाचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करणारी, तो नाकारून दडपण्याचा प्रयत्न करणारी पण त्यात अयशस्वी ठरल्याने तडफडत राहणारी, एक वेळ तर त्या बदल्यात मृत्यूला जवळ करायला तयार असणारी, ही अस्वस्थता, तडफड लपवण्यासाठी स्वतःजवळ निरनिराळे मुखवटे बाळगणारी आणि ते स्वतःला व इतरांना फळविणारी—तेव्हा तेव्हाचा नाटकाचा भाग अतिशय सुरेख; पण हा भाग एकूण नाटकाच्या जेमतेम पंचवीस टक्के ! बाकी वेळ एक रटाळ निवेदन आणि फिरकोळ घटनाच चालू असतात. □

# अपंग वर्ष : चित्रपटसृष्टीचे मौन

आंतरराष्ट्रीय 'अपंगवर्षा'ची सांगता जगभर होत आहे. त्या निमित्ताने या वर्षात अपंगांच्या पुनर्वसनासाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेतला जात आहे. १९८१ साल हे संयुक्त राष्ट्रसंघाने अपंग वर्ष म्हणून घोषित केलं आणि जगभर पसरलेल्या कैक कोटी अपंगाची आठवण झाली. देशातही या वर्षात अपंगांची दखल घेणारे कार्यक्रम, विविध योजना वेळोवेळी जाहीर करण्यात आल्या. काहींची कार्यवाही सुरू झाली. विविध ठिकाणी 'या' ना 'त्या' निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या सार्वजनिक कार्यक्रमातून 'अपंगां'विषयीची तळमळ अनेकानी व्यक्त केली. त्याच्या पुनर्वसनासाठी काही 'आर्थिक मदत' करण्याचे आश्वासन अनेकानी दिले. त्यात लब्धप्रतिष्ठितांसह राजकीय पुढारी आणि चित्रपटसृष्टीतील मातब्बर मंडळींनीही हातभार लावायचं कबूल केलं. काहींनी त्याची पूर्तताही केली.

पण हिंदी चित्रपटसृष्टीकडून याहीपेक्षा वेगळं अपेक्षित होतं. 'अपंगां'च्या जीवनाविषयी, त्याच्या 'समस्येचा' खोलवर वेध घेणाऱ्या, 'काही' चित्रपटाची निर्मिती अपेक्षित होती. त्याच्या व्यथा आणि त्याच्याविषयी समाजाने कोणता दृष्टिकोन स्वीकारावा त्याबाबत दिशा दाखविणाऱ्या चित्रपटांची निर्मिती अपेक्षित होती.

पण 'ग्लॅमर' आणि पैशाच्या वलयांकित साम्राज्यात 'डोळस'पणा हरवून बसलेल्या, पलायनवादाची कास धरून ज्वलंत सामाजिक प्रश्नांबाबत आपणहून 'बधिर'ता स्वीकारलेल्या हिंदी चित्रपटसृष्टीने याही वर्षात (बोलपटाचा सुवर्णमहोत्सव असूनही) या प्रश्नाबाबत 'मौन' पाळले. दरवर्षी नेमाने दोनशे चित्रपटाची निर्मिती करणाऱ्या या बबैय्या चित्रपटसृष्टीनं 'अपंगां'चं जीवन रेखाटणारा एकही चित्रपट सादर न करून आपलं बौद्धिक 'अपंगत्व' मात्र सिद्ध केलं आहे !

अर्थात 'अपंगवर्ष' जाहीर होण्यापूर्वी या चित्रपटसृष्टीने फार जाण दाखविली असे मुळीच नव्हे ! हिंदी चित्रपटांतून अपंगांची व्यक्तिरेखा उभी करण्याचे काही साचे ठरलेले आहेत. एखाद्याला लंगडेपण, आंधळेपण किंवा मुके-बहिरेपण देऊन दया, सहानुभूती मिळविणाऱ्या भिकाऱ्याचं रूप दिलं जातं तर दुसरीकडे त्याला 'अपराधी' म्हणून खलनायकाच्या रूपात उभं केलं जातं !

'दस लाख'मध्ये आंधळा लाचार भिकारी दोन निरागस बालकांसमवेत 'गरीबोंकी सुनो वो तुम्हारी सुनेगा' हे गाणं गात गल्लोगल्लीत फिरताना दाखविला आहे. त्या वेळी या गाण्याने आणि दृश्याने भारत नामक भावनाप्रधान देशातील 'भावनाशील' लोकांची मने हळुवार केली आणि ते गाणं भिकाऱ्यांचं 'राष्ट्रगीत' बनलं ! मुंबईच्या लोकल गाडीतच नव्हे तर देशभर कुठेही हे गाणं गाणारे 'भिकारी' 'तुम एक पैसा दोगे, वो दस लाख देगा' असं गात असतात ! या गाण्याची लोकप्रियता इतकी वाढली की, संगीतकार रवीला 'भिकाऱ्यांचा संगीतकार' ही उपाधीही मिळाली होती; पण खरं तर या व अशा गाण्यानी आंधळ्याच्या लाचारीची केवळ चेष्टा केलेली नाही तर त्यांच्याबाबत हीन भावना जोपासण्यासही मदतच केली आहे !

'स्पर्श', 'दोस्ती', 'कोशिश' आणि इतर अपवादात्मक चित्रपट वगळता बाकी सर्वच चित्रपटांतून आंधळ्याची व्यक्तिरेखा आत्मसन्मानासाठी जीवनात संघर्ष करणारा म्हणून दाखविली जात नाही तर भिकारी म्हणूनच जगणारा अशीच दाखविली जाते किंवा प्रियकर-प्रेयसी जन्मोजन्मीची वाट पाहात असल्याचं दाखविलं जातं.

अपंग व्यक्तिरेखा म्हटली की, त्याभोवती अगोदरच एक सहानुभूतीचं वलय निर्माण झालेलं असतं. त्यात हिंदी चित्रपटाचे कथा-पटकथाकार या व्यक्तिरेखेला अधिकाधिक संकटाच्या भोवऱ्यात आणतात. त्या व्यक्तिरेखेला इतर व्यक्तिरेखाकडून मिळणारी वागणूक यावरच जास्त करून प्रसंग बेतलेले असतात. त्यामुळे सहानभूती, दया यांना अधिकच वाव दिला जातो.

'मदर इंडिया' मध्ये एका मोठ्या दगडाखाली हात सापडून शामू (राजकुमार) आपले दोन्ही हात गमावतो. हात नसलेला शामू इतका परावलंबी बनतो की त्याची पत्नी राधा (नर्गीस) त्याला आपल्या हाताने घास भरविते, त्याची मुले रामू आणि बिरजू त्याला बिडी पेटवून देतात. गावचा सावकार सुखीलाल शामूला लाथाडतो आणि भीक मागण्याचा सल्ला देतो. इतकं सहन करून शामू अचानकपणे निघून जातो !

'मदर इंडिया'तील दृश्यामध्ये भावनाप्रधान नाट्य सरस वठलं असलं तरी अपं-

गांचं ते एक निराशाजनक चित्र आहे. त्यापेक्षा शोलेमधील ठाकूर (संजीवकुमार) दोन्ही हात नसताना गब्बरसिंगसारख्या नराधम डाकूशी मुकाबला करतो. त्यामुळे हे चित्र अधिक आशावादी ठरतं.

अभिनेता - निर्माता-दिग्दर्शक मनोजकुमारच्या 'उपकार' या चित्रपटातील लंगडा मंगलचाचा म्हणजे प्राणच्या आयुष्यातील निर्णायक अशी उत्कृष्ट व्यक्तिरेखा; 'कसमे वादे प्यार वफा, सब बातें है बातोंका क्या' या गाण्यातून जीवनातील निरर्थकता व्यक्त करणाऱ्या मंगलचाचाच्या भूमिकेत प्राणने आपल्या अभिनयाच्या विविध पैलूंच दर्शन घडविलं होतं. हिंदी चित्रपटांतून उभ्या केलेल्या अपंगांच्या व्यक्तिरेखेबाबत प्राण म्हणतो, 'याबाबत माझं मत चागलं नाही. व्यावसायिक हिंदी चित्रपटात अपंगांना खलनायकाच्या विकृत रूपात सादर केलं जातं. चोर, डाकू, स्मगलर अशाच काही घृणास्पद धंद्यात वावरताना त्यांना दाखवलं जातं. अपंगत्वाच्याभोवती रहस्यमय जाळं विणलं जातं. आणि या ठिकाणी खलनायकच उभा केला जात असल्यामुळे त्याचा प्रभाव रोजच्या जीवनात अवमानकारक असाच पडतो. यामुळे शारीरिकदृष्ट्या अपंग असणाऱ्या व्यक्तीलाच नव्हे तर त्यांच्या साऱ्या बिरादरीलाच क्लेशकारक अनुभव मिळतो. चित्रपटाबाहेर त्याची प्रतिमा डागाळली जाते.'

व्यावसायिक चित्रपटातील व्यक्तिरेखाटनाबाबतची खंत व्यक्त करून प्राण पुढे म्हणतो की, 'कलात्मक किंवा वास्तववादी, चित्रपटांतून त्याची प्रतिमा निराशावादी हताश किंवा दुसऱ्याच्या आधाराने जगणारी अशाच स्वरूपात सादर केली जाते. या स्वरूपातही प्रतिम सादर करणं चुकीचं आहे. जरी काही बाबतीत त्यात सत्यतेचा अंश असला तरी !

'माझ्या दृष्टीने अपंगांची व्यक्तिरेखा उभी करायची असेल तर ती आशावादी उत्साही, आत्मनिर्भर अशी दाखवली गेली पाहिजे.'

हिंदी चित्रपटाकारांनी काय करावे याबाबत 'प्राण' ने स्पष्टच सल्ला दिला आहे; पण ते काय करतात ते जरा पाहू या.

इंग्रजी नाव असलेला 'हॅपिनेस ऑफ अस अलोन' ह्या जपानी चित्रपटावर आधारित गुलजारने 'कोशिश' चित्रपट काढला. मूकबधिर जोडपं, त्याची जगण्याची ईर्षा आणि उर्मी अनंत अडचणी आणि अपमान सहन करूनही जगण्याची उमेद बाळगणारं आणि जगणारं हे जोडपं 'कोशिशमध्ये' सक्षम अभिनयानं साकार केलं होतं संजीवकुमार आणि जया भादुरीनं. मात्र 'कोशिश' संपूर्णत: जपानी चित्रपटावर बेतला असूनही त्यांची कथा 'लग्नाच्या' घटनेपुरतीच सीमित होती, तर जपानी चित्रपट जीवनात संघर्ष देत, श्रमाचं मूल्य उमजलेल्या दोन व्यक्तिरेखांच्या सुख-दु:खांचं जाळं विणतो, त्यामुळं गुलजारचा प्रयत्न स्वागतार्ह होता. कौतुकास पात्र ठरला होता; पण जपानी चित्रपटाची सर त्याला नव्हती !

हिंदी चित्रपटांच्या तुलनेत 'कोशिश' चं महत्त्व नाकारता येत नसलं तरी गुलजारने 'हॅपिनेस' पाहणाऱ्याच्या दृष्टीने अपेक्षाभंग केला ! पण तरीही गुलजार परवडतो. कारण इतर बरेच 'पहुँचे हुए' आहेत.

१९४१ साली प्रदर्शित झालेल्या रणजित मुव्हिटोनच्या 'शादी' चित्रपटात पागळ्या पतीची सेवा करणाऱ्या पत्नीची 'हृदयद्रावक' कहाणी होती. त्यात ही पत्नी आपल्या *पतीला अनेक अडचणीतून तीर्थक्षेत्राच्या* यात्रेला नेते. याच्याच परिणामी 'नानक नाम जहाज' या पजाबी चित्रपटाने पुढची मजल गाठली. यातील नायिका आपल्या आधळ्या पतीला ठिकठिकाणच्या गुरूद्वाराला घेऊन जाते आणि अखेर त्याला 'दृष्टी' येते ! म्हणजे पुन्हा अंधश्रद्धेला खतपाणी आहेच !

'अमर अकबर अॅन्थोनी' मध्ये मुलगा (ऋषीकपूर) कव्वालीच्या लयीमध्ये शिर्डीच्या साईबाबांची आराधना करतो आणि त्याच्या आंधळ्या आईला बाबाच्या चमत्कारातून डोळे येतात ! या व अशा प्रकारच्या चित्रपटातून डोळे जाणे व डोळे येणे हा नशिबाचा भाग आहे हीच 'परावलंबी भावना' जोपसली जाते ! इथे नेत्रदानांची आवश्यकता कोणी व्यक्त करीत नाही किंवा त्यामुळे 'डोळे' येऊ शकतात हेही कोणाला पटवावं असं वाटत नाही !

मग त्यापेक्षा 'सगीता' तच आपले अपंगत्व विसरणाऱ्या व्यक्तिरेखा उभे करणारे 'दोस्ती,' 'दासी' सारखे चित्रपट जगण्याची उमेद, निर्मितिक्षमतेचा आनंद देतात. ताराचद बडजात्या यांच्या 'दोस्ती' या चित्रपटात एक आधळा तर दुसरा लंगडा! गाण्यामध्येच सर्वस्व हरपून परिस्थितीवर मात करणारी ही अतूट मैत्री हृदयस्पर्शी होती. तरी सहानभूतीची 'दृष्ट' या चित्रपटाला लागली होती मात्र त्यातील भाबडी बालिका आणि हे दोघे अपंग यांच्यातील निरगस नातं व्यक्त करणारे प्रसंग संस्मरणीय होते.

नेत्रहीन लोकांच्या जीवनाचं 'डोळस' चित्रण सई परांजपे यांनी आपल्या 'स्पर्श' या चित्रपटांत केलं आहे. नवजीवन अधविद्यालयाचा नेत्रहीन मुख्याध्यापक अनिरुद्ध (नसीरुद्दीन शहा) काहीसा मानभावी; परंतु अंध बालकांना साऱ्या सुविधा कशा मिळतील या चिंतेत असणारा कुशल प्रशासक. त्याच्या जीवनात एक कविता (शबाना आझमी) येते. कविताचा पती काही वर्षांपूर्वीच दुर्घटनेत मरण पावला आहे–एकांतात राहणारी कविताही अनिरुद्धकडे आकर्षित होते; पण पुढे परिस्थिती बदलते ! कविताशी लग्न करून आपण तिच्या असहाय्य परिस्थितीचा फायदा घेत आहोत असं समजून अनिरुद्ध लग्न मोडतो. तणाव वाढत जातो. मात्र शेवट गोड !

साधी सरळ कथा असूनही कुठे सहानुभूतीचं वलय नाही की दयेची याचना नाही. तरीही 'स्पर्श' उत्कृष्ट चित्रपट ठरतो तो अपंगाची व्यक्तिरेखा असूनही ती सामान्य व्यक्तिरेखाटनाप्रमाणेच उभी केली जाते. तिला 'खास महत्त्व' दिले जात नाही. त्यामुळे तो एक सहज, संवेदनाशील आविष्कार ठरतो.

*पण 'कोशिश', 'स्पर्श' असे काही* हाताच्या बोटावर मोजण्याइतके चित्रपट सोडले तर इतर हिंदी चित्रपटातून 'अपंग' व्यक्तिरेखेला एक वेगळी 'treatment' दिली जाते. त्यांच्या 'अपंगत्वाचे' भाडवल करण्याचा प्रयास केला जातो.

'आदमी' या चित्रपटात दिलीपकुमारने 'पांगळ्या माणसाचं' मनोगतच व्यक्त केलं ! एका स्वप्नदृश्यात तर प्रचंड पायावर उभं असणारं बुरुजासारखं त्याचं एक मन आणि 'व्हीलचेअर' मध्ये अडकून पडलेलं त्याच दुसरं मन ! या दोन्हीतील संवादातून 'पांगळेपणाची तगमग' दिलीपकुमारने व्यक्त केली. 'आदमी' निराशाजनकअसूनही तो एक मनोविश्लेषणात्मक अभ्यास होता !

दिलीपकुमार 'व्हीलचेअर' वर बसल्याबरोबर त्या चेअरला हिंदी चित्रपटसृष्टीत स्थान प्राप्त झालं आणि आजतागायत या 'चेअरची' ची चेष्टा करणारे अनेक प्रसंग विविध चित्रपटांतून पेरले जात आहेत.

*खलनायकानं आपल्या स्वार्थासाठी* कड्यावरून अथवा जिन्यावरून ढकलून देण्याची एक गोष्ट म्हणजे 'व्हीलचेअर' याच दृष्टिकोनातून अपंगांकडे पाहिले जात आहे. (उदा. रॉकी, चोरावर मोर) याचा पुरावा त्या खुर्चीत बसणाऱ्या माणसाचं नेमकं मागणं काय आहे, त्याच्या अपेक्षा काय आहेत आणि आपल्या जबाबदाऱ्या काय आहेत याचा विचार न करता हे चालू आहे. 'अपंगवर्षा' च्या निमित्तानं या 'व्हीलचेअर' च्या प्रवासाला योग्य दिशा मिळाली आहे ! त्या दिशेनं वाटचाल करावयाची का पुन्हा 'ये रे माझ्या मागल्या' याचा निर्णय आज ना उद्या हिंदी चित्रपटसृष्टीला घ्यावा लागेल !

—बिलंदर

**MANOOS** (Marathi Weekly) 100 Paise Regd. No. PNC–W 28
(Licensed to post without prepayment of postage–No. 11)




यांच वर्षानंतर पैसे परत

# ठराविक हप्त्यांनीं रोख रक्कम तर मिळवाच खेरीज आयुर्विम्याचें संरक्षणही मिळवा.



दहा वर्षानंतर पुन्हां पैसे परत



पंधरा वर्षानंतर पुन्हां पैसे परत



वीस वर्षानंतर पुन्हां पैसे परत

## पैसा परतीची योजना (मनी बॅक पॉलिसी)

### आधुनिक जीवनाच्या गरजा पूर्ण करणारी आदर्श योजना.

ठराविक हप्त्यांनीं रोख रक्कम आणि त्याखेरीज पॉलिसीच्या मुदतींत आपल्या कुटुंबाला आयुर्विम्याचे संपूर्ण संरक्षण पुरवणारी योजना.

मनी बॅक पॉलिसी ही १२ वर्षे, १५ वर्षे, २० वर्षे किंवा २५ वर्षे मुदतीची मिळते. विमेदाराला विम्याची संपूर्ण रक्कम त्यानें निवडलेल्या मुदतीनुसार तीन किंवा चार हप्त्यांत मिळते. मुलांचे शिक्षण, त्यांचे विवाह, त्यांच्या आयुष्याची सुरुवात, घर बांधणे-आदि कामासाठीं लागणारा एकरकमी पैसा किंवा दुसऱ्या कोणत्याही तातडीच्या गरजपूर्ति-साठी लागणारा पैसा ह्या ठराविक मुदतीनें मिळणाऱ्या रक्कमांतून उभा राहतो.

पॉलिसीच्या मुदतींत केव्हांही विमेदाराचा मृत्यु ओढवल्यास संपूर्ण विम्याची रक्कम अदा केली जाते. त्याशिवाय ज्या मुदतीचे हप्ते भरलेले असतात त्या मुदतीचा बोनसही मिळतो. विमेदाराला आपल्या हयातींत आधींच परत मिळालेल्या रोख रक्कमा विचारांत घेतल्या जात नाहींत.

उज्वल भविष्याकडे ज्यांची दृष्टि असते अशा दूरदर्शी व्यक्तिसाठी ही आदर्श योजना आहे.

आपल्या एलआयसी एजन्टशी किंवा जवळच्या शाखा कार्यालयाशीं सविस्तर माहितीसाठी संपर्क साधा.

## भारतीय आयुर्विमा महामंडळ

SADEUS/LIC/AS-29